म.ग्रं.सं., संग्रह शाखा, ठाणे.
विषय :..... निबंध .....
क्र. : २९९०



REFBK-0023923

संदर्भ ग्रंथ (शिक्षण विषयक)
२९९०
२३९२३
११।८।८३

आजच्या शिक्षणातील विचारप्रवाह



REFBK-0023923

संपादक

प्राचार्य रा. तु. भगत,

अध्यापक महाविद्यालय, अरण्येश्वर, पुणे–९

चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर ४१६ ००२

प्रथमावृत्ती
१९ जुलै १९८२

प्रकाशक
संजय भगत
चैतन्य प्रकाशन
२०३२ 'ए' वॉर्ड
कोल्हापूर

मुद्रक
मेघनाथ भगत
ललित मुद्रणालय
२०९८ 'ए' वॉर्ड
कोल्हापूर.

सर्वाधिकार
सौ. ललिता भगत

मुखपृष्ठ
अनन्त सालकर

मूल्य : १५-००



पिढ्यान् पिढ्या अज्ञानाच्या
अंधकारात बुडालेल्या,
मावळ खो-यातील सामान्य
माणसांच्या अंगणापर्यंत
ज्ञानगंगा पोहचविण्याच्या
ध्येय-ध्यासाने उभी हयात
धडपडणारे, शिक्षण प्रेमी,
गुरुवर्य बाबूरावजी घोलप यांच्या
पुण्य स्मृतीस
सादर—

प्रेरणा



माननीय मामासाहेब मोहोळ

अध्यक्ष, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे

दोन शब्द

आजचे शिक्षण, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षण संस्था आणि शासकीय जबाबदारी याविषयी समाजाच्या सर्व थरांवर विचार–मंथन चाललेले दिसते. समाज समृद्ध व्हावा यासाठीच शिक्षणाची गरज असते. यासाठी आजच्या शिक्षणातून सर्वार्थाने समर्थ, प्रामाणिक, कष्टाळू, विनयशील, देशप्रेमी आणि सत्यप्रिय असा मनुष्य निर्माण होणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु शिक्षण घेऊन बाहेर पडलेली माणसे अप्रामाणिक,व्यसनाधीन,भ्रष्टाचारी, सत्ता-पिपासू,सुखलोलुप,स्वैर आणि हिंसक वृत्तीची जेव्हा दिसून येतात तेव्हा आजचा शैक्षणिक आकृतिबंध समाजाला एक समर्थ मनुष्य देण्याच्या बाबतीत किती असमर्थ आहे, हे सहज दिसून येते. शिक्षित समाजातील सर्व प्रकारच्या दुष्टाचाराचे लोण अशिक्षित समाजापर्यंत संक्रमित झालेले दिसून येते. अशा वेळी शिक्षणाच्या सर्व थरांवर सदाचाराच्या प्रचाराचा विचार झाला पाहिजे. शिक्षण प्रसाराच्या मागील ही सदाचाराची बैठक जेवढी बळकट असेल, तेवढी ती आचारामध्ये प्रतिबिंबित होईल. मग सर्वच शिक्षणप्रक्रिया आनंददायक, चैतन्यमय, उत्साहवर्धक आणि गतिशील ठरेल. शिक्षण प्रक्रियेच्या विविध अंगांना स्पर्श करून जाणाऱ्या उद्‌बोधक अशा विचार संपदेचे हे संकलन याचसाठी चोखंदळ वाचकांपुढे सादर केले आहे.

' आजच्या शिक्षणातील विचार प्रवाह ' या पुस्तकात एकूण सात विभाग आहेत· या सात विभागांमध्ये क्रमशः शिक्षण आणि प्रशिक्षण, संस्कार धर्म, नीती आणि लोकसंख्या शिक्षण, ग्रामीण, प्रौढ आणि स्त्री शिक्षण, संस्कृत आणि इंग्रजी भाषाविषयक शिक्षण, क्रीडा आणि चित्रकला शिक्षण, आचार्यकुल आणि वृत्तविषयक शिक्षण विचारांचा समावेश असून शेवटच्या विभागात शिक्षणप्रेमी गुरुवर्य बाबूरावजी घोलप यांची मुलाखत आहे.

शिक्षणातून खरेखुरे समाज परिवर्तन घडावयाचे असेल तर सर्वप्रथम शिक्षकांत आमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे. शिक्षण शास्त्राचा निर्माता व समाजाचा शिल्पकार

म्हणून शिक्षकाकडे बोट दाखविले जाते. कारण शिक्षकापासूनच गुणांचा, मूल्यांचा नियमांचा आणि तत्त्वांचा विचारप्रवास सुरू होतो. हा विचार-प्रवास शेवटी समाजापर्यंत जाऊन पोहचत असतो. म्हणून आजच्या समाजाचा चेहरा-मोहरा जर बदलायचा असेल तर प्रथम शिक्षक बदलला पाहिजे. समाजाच्या सर्व थरांपर्यंत शिक्षकांचे सद्‌गुण पाझरत गेले पाहिजेत; रुजले पाहिजेत. समाजविकासाच्या ध्यासाशी,विचाराशी आणि जाणिवे शिक्षक समरस झाला पाहिजे आणि म्हणून त्याला देण्यात येणारे प्रशिक्षण हे केवळ चाकोरीबद्ध असता कामा नये. त्यामध्ये वस्तुस्थितीचे भान पाहिजे, समाजाच्या गरजांच्या पूर्तीचे सामर्थ्य पाहिजे, आणि समाजजीवनातील कालबाह्य ठरलेल्या गोष्टींना पुसून टाकण्याची ताकद पाहिजे. साचेबंद शिक्षण प्रशिक्षणातून साक्षर माणसे निर्माण होतील. मग साक्षरः इति राक्षसः याची प्रचीती येईल. यासाठी शिक्षणातून ज्ञानी आणि सदाचारी माणसे तयार झाली पाहिजेत.आणि म्हणूनच 'मी एक शिक्षक आहे,अध्ययन हा माझा धर्म आहे, विद्यार्थी हा माझा देव आहे, सरस अध्यापनाची सतत धडपड ही त्याची पूजा आहे, 'जो जे वांछील तो ते लाहो' ही माझी प्रार्थना आहे, सर्व थरांवरील समाजविकास हा माझा ध्यास आहे आणि समाज मंगल भावनेतून मिळालेले आशीर्वाद हाच माझा प्रसाद आहे,' या व्यापक सारग्राही भावनेशी शिक्षक जेव्हा समरस होईल, तेव्हा खऱ्या अर्थाने शिक्षण सुरू झाले असे म्हणता येईल.

शिक्षणाने मनुष्य विचारी झाला पाहिजे, त्या विचाराला आचाराचा आधार पाहिजे. असा आचार समाजहितास पोषक पाहिजे. 'मी समाजासाठी आहे' ही भावना बळावत गेली पाहिजे. त्याप्रमाणे कृती केली पाहिजे. कृतीशिवाय विचार आंधळाच. कृतीमुळेच मूल्य प्राप्त होते. त्या विचारांची उंची व व्याप्ती वाढते. असा विचार भावनेबरोबर जोडला तर दुधात साखर पडल्यासारखे होईल. कारण बुद्धी आणि भावना यामधील एकरूपतेवरच समाज उन्नत होत असतो. जेव्हा बुद्धी आणि भावना यात भेद निर्माण होईल तेव्हा ते समाजाचे दुर्दैव ठरेल. शिक्षणातून विचार व भावपरिपोष झाला पाहिजे. व्यक्ती आणि समाजातील अनुबंध बळकट झाले पाहिजेत. यासाठी संस्कारसंपन्न शिक्षणाची जरुरी असते. असे संस्कारी शिक्षणच नवनिर्मितीची प्रेरणा देते, गुणांची आणि मूल्यांची जाणीव करून देते. अशी जाणीव-जागृती करणारे शिक्षण पाहिजे. त्यामुळेच जाणता मनुष्य निर्माण होईल.

अजूनही आपल्यामधील अज्ञान आणि अंधश्रद्धा दूर झाली नाही. त्यामुळे विज्ञानाचे अध्ययन करून देखील अंधश्रद्धा, भोळसटपणा, कर्मकांड, विधिनिषेध आणि धर्मभोळेपणाच्या मगरमिठीतून मनुष्य सुटला नाही. त्यामुळे धर्म, कर्म, वर्ण, प्रदेश, भाषा आणि वंशपरंपरा ही भांडणाची कारणे होऊन बसतात. भेदभावाच्या पलिकडे नजरच पोहचत नाही. मग सर्व धर्मसमभाव दूरच राहतो. आपण सारे बांधव आहोत. हे शब्द-रूप केवळ सांगण्यासाठीच उरते. मतभेदांच्या, भेदभावांच्या आणि भेदनीतीच्या आहारी गेलेला समाज शेवटी विनाशाकडे वाटचाल करणार ! यासाठी शिक्षणातून विश्लेषणात्मक व वस्तुनिष्ठ दृष्टीचा विकास होणे आवश्यक आहे. यामुळे शेवटी माणुसकी हेच सर्व

धर्माचे खरे सार आहे, हे पटेल. पटलेले आचरणात येईल. असे आचरण आनंददायक वाटेल आणि शिक्षण अशा आनंदाचा अविभाज्य भाग बनेल.

सदर ग्रंथाचे प्रणयन शिक्षणप्रेमी कै. बाबूरावजी घोलप यांच्या आस्थापूर्ण शिक्षण प्रसाराच्या गुणगौरवार्थ केलेले आहे. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अखंड एक्केचाळीस वर्षे मानद सचिव म्हणून काम करणारे बाबूरावजी घोलप हे महाराष्ट्राच्या शिक्षण-प्रसाराच्या कार्यातील एक ऋषितुल्य, निरलस, कष्टाळू, मायाळू, जिद्दी, उत्साही आणि चिकाटीने नटलेले असे एक व्रतस्थ व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या ठिकाणी साधेपणा होता, भोळेपणा नव्हता. कामाची तळमळ होती, टंगळमंगळ नव्हती, गरीबांविषयी कळकळ होती, मळमळ नव्हती. विचारावर निष्ठा होती, प्रतिष्ठा नाही. आणि वृत्ती निःस्वार्थी होती, स्वार्थी नाही. एकूण हे समंजस, सोज्वळ, सात्त्विक आणि जाणते व्यक्तिमत्त्व आज आपल्यात नाही, ही अतीव दुःखाची गोष्ट आहे. जन्मभर प्रसिद्धीकडे पाठ फिरवून अहर्निश काम करणारे 'One man army' सारखेच त्यांचे निरलस जीवन होते सेवाभाव हा त्यांचा स्थायी स्वभाव होता. प्रेमभाव हा त्यांचा धर्म होता. प्रयत्न हीच त्यांची मूळ प्रकृती होती. शांत, संयत आणि धीरोदात्त मनाने त्यांनी सर्वांनाच अभिमंत्रित केले होते. खेड्यापाड्यातील अज्ञ जनांच्या उन्नतीप्रीत्यर्थं चंदनासारखे ते झिजले. आणि म्हणूनच शिक्षणप्रेमी बाबूरावजी घोलप यांच्या पुण्यस्मृतीस हा ग्रंथ सादर समर्पित केला आहे.

सदर ग्रंथातील विविध लेखांचे लेखक हे शिक्षण क्षेत्रातील जाणते अभ्यासक आहेत. त्यांच्या या वैचारिक देणगीबद्दल मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून ते स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षण प्रसाराची लाट ज्या प्राणवायूच्या बळावर उंचावत राहिली, तिचा अर्थ समजावून घेऊन आजच्या शिक्षणातून सामर्थ्यसंपन्न समाज कसा निर्माण होईल, याचा शोध-बोध घेऊन ध्येय ध्यासाने काम करणारी चार माणसे जरी निर्माण झाली, तरी या ग्रंथाच्या प्रणयनाचे चीज झाले असे म्हणता येईल.'

अध्यापक महाविद्यालय
अरण्येश्वर, पुणे-९

प्राचार्य रा. तु. भगत.

अनुक्रम

विभाग पहिला : शिक्षण आणि प्रशिक्षणविषयक विचार

१. शिक्षण : स्वभाव सुधारण्याचे ज्ञान : डॉ. ग. श्री. खैर.
२. शिक्षणाचे पंचप्राण : वि. वि. चिपळूणकर.
३. महाराष्ट्रातील शिक्षक- प्रशिक्षणाच्या नव्या दिशा ; डॉ. मो. ह. पिंपळखरे.

विभाग दुसरा : संस्कार, धर्म, नीती व लोकसंख्याविषयक शिक्षण विचार

४. शिक्षण आणि संस्कार : यदुनाथ थत्ते.
५. शिक्षणातील धर्मशिक्षण : प्राचार्य चंद्रकुमार डांगे.
६. नैतिक शिक्षण : प्रा. गो. के. भानगावकर.
७. लोकसंख्या शिक्षण : प्रा. अ. दि. सदावर्ते

विभाग तिसरा : ग्रामीण प्रौढ व स्त्री शिक्षणविषयक विचार

८. ग्रामीण शिक्षणाच्या समस्या : प्राचार्य डॉ. मा. गो. माळी.
९. ग्रामीण शिक्षणाचे शिल्पकार : डॉ. श्री. रा. आचार्य.
१०. माझ्या कल्पनेतील स्त्रीशिक्षण : डॉ. सरोजिनी बाबर.
११. प्रौढ शिक्षण : दिशा आणि ध्यास : प्राचार्य रा. तु. भगत.

विभाग चौथा : संस्कृत व इंग्रजी भाषा शिक्षणविषयक विचार

१२. संस्कृत भाषेचे अध्ययन आणि अध्यापन : काही विचार : डॉ गं वि. कुलकर्णी.
१३. इंग्रजी भाषेचे अध्यापन : आव्हान आणि समस्या : डॉ. सी. जे. दासवानी
(अनुवाद : डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर)

विभाग पाचवा : क्रीडा व चित्रकला शिक्षणविषयक विचार

१४. क्रीडा : यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली : डॉ. प. म. आलेगावकर.
१५. चित्रकला शिक्षणाचे महत्त्व : डॉ. भय्यासाहेब ओंकार

विभाग सहावा : आचार्यकुल व वृत्तविद्याविषयक विचार

१६. आचार्य कुल : एक शाश्वत शैक्षणिक विचार : प्राचार्य प्र. द. पुराणिक.
१७. वृत्तपत्र आणि लोकशिक्षण : प्रा ल. ना. गोखले.

विभाग सातवा : शिक्षण प्रेमी बाबूरावजी घोलप : एक मुलाखत

मराठी ग्रंथ संग्रहालय पुणे
२००
दा. क्र. २३८२३
दिनांक ११।८।८३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

शिक्षण : स्वभाव सुधारण्याचे ज्ञान

डॉ. ग. श्री. खैर

" शिक्षणातून सदाचारी माणसे निर्माण व्हावीत त्यांच्या वाणीतून व कृतीतून हा सदाचार दिसावा. त्यामुळे त्या माणसाचे व पर्यायाने समाजाचे जीवन मंगलमय व्हावे. " गीतेच्या संदर्भात डॉ. ग. श्री. खैर यानी मांडलेले हे विचार आजच्या विद्यार्थी-शिक्षक व समाजाच्या जडणघडणीसाठी आवश्यक वाटतात.

गुन्हेगारी, भ्रष्टाचार, अनैतिकता, व्यसनाधीनता इत्यादीचे लोण प्रौढ समाजाकडून तरुण वर्गाकडे व विद्यार्थी वर्तनाकडेही आल्यामुळे समाजात धार्मिक शिक्षण, नैतिक विचार इत्यादि विषयाबद्दल थोडी जागृती आपणास दिसते ! स्वातंत्र्य मिळवून देऊन गेल्या ३६ वर्षात राधाकृष्णन, प्रकाश, कोठारी कमिशन इत्यादी व्यक्तींनी व आयोगांनी नैतिक शिक्षणाची गरज प्रतिपादन केली, पण शासनाने या क्षेत्रात काही केले नाही. विद्यापीठे, शिक्षणसंस्था यांनीही काही केले नाही. त्याचा प्रभाव आज तरुण पिढीवर दिसू लागला आहे. अप्रामाणिकता, हिंसावृत्ती, उद्धटपणा स्वैरता, व्यसने सुखलोलुपता इत्यादी मनोवृत्तीचा उद्भव विद्यार्थी वर्गात होत आहे.गुन्हेगारी,मारामारी चोरी इत्यादी वर्तन अशिक्षितांकडून शिक्षित लोकांपर्यंतही आलेले आहे. व्यसनाधीनता पालक–शिक्षकवर्गातही पसरत चाललेली आहे. म्हणून सदाचाराच्या प्रचाराचा विचार, प्रथम शिक्षणसंस्थामध्ये व कौटुंबिक जीवनामध्ये झाला पाहिजे.

जाणीव ज्ञान व शिक्षण

आजपर्यंत धर्माचे व नीतीचे असे अतूट नाते होते. परंतु धर्माभिमानी लोक व धर्मनेतेही दुराचारापासून अलिप्त राहू शकले नाहीत. त्यामुळे धर्मावरची श्रद्धाही उडत चालली आहे. धार्मिक शिक्षणापेक्षा खऱ्या धर्मज्ञानाची आज आवश्यकता आहे. नैतिक शिक्षणापेक्षा नीतिज्ञानाची अधिक जरुरी आहे; आणि चारित्र्यशिक्षण (कॅरॅक्टर एज्यु–केशन) देण्याऐवजी स्वभाव जाणीव निर्माण करण्याची आवश्यकता फार आहे. शिक्षण–संस्थांच्या वेळापत्रकातील वेळ अत्यंत मर्यादित असतो. तो बौद्धिक ज्ञान देण्यातच खर्च होतो. ज्ञानाचे उपयोजन ज्याने त्याने आपल्या जीवनात प्रसंगोपात करावयाचे असते.

त्याचप्रमाणे सदाचार, सद्वर्तन, नैतिकता, स्वभावाचा प्रभाव या विषयांचे ज्ञान आलेले आहे, या विषयाची जाणीव निर्माण करून ठेवणे एवढी गोष्ट अध्यापक–प्राध्यापक-शिक्षक यांना शक्य आहे. ती त्यांनी करावी,अशी बुद्धि निर्माण होण्याकरिता हा शब्द-प्रपंच आहे.

वर्तनाचे मूळ स्वभावात

स्वभाव–जाणीव या परिभाषेमुळे आपल्या नैतिक शिक्षणाच्या विषयाला अधिक व्यावहारिक व शैक्षणिक स्वरूप येते. नैतिक वर्तनाच्या मुळाशी माणसाच्या इष्ट व अनिष्ट वृत्ती असतात. या वृत्ती आपल्या स्वभावाच्या घटक आहेत. अशा अनेक बऱ्या वाईट मनोवृत्तींचा स्वभाव बनत असतो. म्हणून स्वभावात सुधारणा झाली तरच वर्तनात सुधारणा होईल. हिंसेच्या मुळाशी हिंसावृत्ती आहे; लबाडीच्या मुळाशी लोभ आहे; कलहाच्या मुळाशी स्वार्थ आहे. हिंसकता, लोभ, स्वार्थ या अनिष्ट वृत्तींची त्या त्या व्यक्तीला जाणीव करून देणे शक्य आहे. तसे वर्तन करणे हे ज्या त्या व्यक्तीनेच केले पाहिजे. अध्यापकाची सक्ती ते काम करू शकणार नाही. म्हणून मी नैतिक शिक्षण असा शब्दप्रयोग न करता स्वभाव जाणीव अशी परिभाषा सुचवितो. या शब्दामुळे शिक्षक प्राध्यापकांनी नक्की काय करायचे आहे त्याची स्पष्ट कल्पना येईल. अध्यापकांना ही जाणीव झाली की, प्रसंगाप्रसंगाने ते विद्यार्थ्यांच्या ठिकाणी ती निर्माण करू शकतील तिच्या आचरणाला शाळा कुटुंब समाज इत्यादी ठिकाणी भरपूर वाव आहे.

वृत्तींचे ज्ञान

इष्ट मनोवृत्ती, किंवा विशिष्ट मनोवृत्तींचा स्वभाव, हा कोणी कोणाला देऊ शकत नाही. आई-बापही मुलांना देऊ शकत नाहीत, तर अध्यापकाला कसे शक्य आहे ! पण चांगल्या वृत्ती कोणत्या आणि वाईट वृत्ती कोणत्या यांचे ज्ञान अध्यापक देऊ शकतील. उदाहरण म्हणून काही इष्ट व अनिष्ट वृत्तींच्या जोडचा येथे देतो. यातील कोणती वृत्ती इष्ट आहे असा वस्तुनिष्ठ (ऑबजेक्टिव्ह) प्रश्न विद्यार्थ्यांना विचारल्यास सर्वांनाच शेकडा शंभर गुण मिळतील का नाही ? राग चांगला आणि शांती वाईट असे कोण म्हणेल ? शाळेतील व महाविद्यालयातील विद्यार्थ्यात दिसणाऱ्या काही अनिष्ट व इष्ट वृत्ती अशा संभवतात.

१. राग – शांती	२. स्वार्थवृत्ती – त्यागवृत्ती	३. असत्य – सत्य
४. हिंसा – अहिंसा	५. मोह – संयम	६. अहंकार – विनय
७. उद्धटता – सौजन्य	८. गर्व – नम्रता	९. द्वेष – प्रेम
१०. क्रौर्य – दया	११. सूड – क्षमा	१२. निराशा-प्रयत्नवृत्ती
१३. असहिष्णुता–सहिष्णुता	१४. शत्रुत्व – मैत्री	१५. भित्रेपणा–निर्भयता

परिणामांची जाणीव

अध्यापकांचे काम यापुढचे आहे. पहिली वृत्ती अनिष्ट दुसरी इष्ट ही गोष्ट

विद्यार्थीही सांगतील. अध्यापकाने या मनोवृत्ती वाईट का व या चांगल्या का, हे नीट विवरण करून सांगितले पाहिजे. अनिष्ट वृत्तींचा परिणाम वैयक्तिक व सामाजिक जीवनावर कसा होतो याचे विवरण करणे जरूर आहे. मोह आणि संयम यांचे जीवनात येणारे प्रसंग सांगून मोहवशतेमुळे व्यक्तिमत्व व जीवन बरबाद होते; उलट संयमाने माणूस कर्तृत्व दाखवू शकतो. असे उदाहरणासह पटवून दिले पाहिजे. आज कनक-कांता सत्ता-संपत्ती-इंद्रियसुखे - व्यसने यांचे मोह सर्वत्र पसरले आहेत. अशा वातावरणात संयमवृत्तीचे चिलखत कसे उपयोगी पडते ही विद्यार्थ्यांना जाणीव करून दिली पाहिजे. तिचा उपयोग त्यांना जन्मभर होत राहील, अशीच उदाहरणे इतर वृत्तींचीही घेता येतील

आत्मनिरीक्षणाची पद्धत

पुढची पायरी आत्मनिरीक्षणाची सवय ही आहे. इष्टअनिष्ट वृत्ती असंख्य आहेत आणि त्यांचे मिश्रण प्रत्येक व्यक्तीमध्ये निरनिराळ्या प्रमाणात आहे. प्रसंगा-प्रसंगाने या वृत्ती प्रकट होत असतात. अध्यापकाला त्यातील काही थोडच्या दिसू शकतील, सर्व नाही. हे काम विद्यार्थ्यांनीच केले पाहिजे. त्याकरता अंतर्मुखता किंवा आत्मनिरीक्षणाचे तंत्र शिकवणे मात्र शक्य आहे. स्वत: अध्यापकाने या तंत्रांचा प्रयोग स्वतःवर करून त्याची पद्धती बसवली पाहिजे. तसे केले तरच ही पद्धती इतरांना शिकवू शकेल. आपल्या स्वतःवर इतरांशी वागताना जे प्रसंग येतात, व त्या प्रसंगी आपण जसे वागतो, त्यांच्या मुळांशी कोणत्या वृत्ती होत्या ? त्यांतील इष्ट वृत्तींचा व अनिष्ट वृतींचा परिणाम काय आला ? इतरांवर ? स्वतःवर ? असे आत्मनिरीक्षण करता करता आपल्या मनातील वृत्तींचे चित्र स्पष्ट होईल. हे तंत्र विद्यार्थ्यांनाही शिकवावे. हा अध्यापनाचा व अनुभव ज्ञान देण्याचा भाग आहे. तो देणे व घेणे सर्वांना शक्य आहे अशा रीतीने मनोवृत्तींच्या दृष्टीने आत्मनिरीक्षण आणि इतरांच्या स्वभाव-वृत्तींचे निरीक्षण करण्याची सवय सर्वांना लागणे अवश्य आहे. त्यामुळे स्वभावातील वृत्तींचा परिणाम भाषणावर व वर्तनावर कसा होतो ते कळेल.

वृत्ती व वर्तन

वर्तनामध्ये परिवर्तन घडवून आणणे हे आधुनिक शिक्षणाचेही एक महत्त्वाचे उद्दिष्ट आजच्या नवीन शैक्षणिक तत्त्वज्ञानात सांगितले जाते. व्यवहाराच्या क्षेत्रातील नैतिकतेच्या दृष्टीनें वर्तनात परिवर्तन घडवून आणण्यापूर्वी मनोवृत्तीत व स्वभावांत परिवर्तन घडवून आणणे अगत्याचे आहे. ते कसे साध्य करावे ते येथे सांगितले आहे.

संकल्प व निश्चय

आत्मनिरीक्षण व परव्यक्तीनिरीक्षण करून कोणत्या इष्ट वृत्तींचे संगोपन व कोणत्या अनिष्ट वृत्तीचे निर्मूलन करायचे ते प्रत्येक व्यक्तीने आपापल्या मनाशी ठरवावे.

त्याप्रमाणे आपल्या स्वभावात बदल, सुधारणा, परिवर्तन घडवून आणण्याचा, व्यक्तित्व-सुधारणेचा संकल्प करावा. दृढनिश्चय करावा, त्या निश्चयाला रोज सकाळी, संध्याकाळी, मोकळ्या वेळी, वारंवार, उजळणी द्यावी. त्या संकल्पाची जाणीव ठेवावी अशी जागती जाणीव निर्माण झाली की या वृत्तींच्या उपयोगाचे जे जे प्रसंग येतील त्या त्या प्रसंगी आपला: संकल्प किंवा निश्चय जागृत होईल व त्या प्रमाणे आपल्या वर्तनात सुधारणा होईल. आत्मसंयम असेल त्याला ही परिवर्तनक्रिया लवकर साध्य होईल. मनावर ताबा नसेल त्याला प्रारंभी अपयश येईल पण कालांतराने यश येऊ लागेल. मनोवृत्ती बदलल्या की स्वभाव बदलेल, स्वभाव बदलला की, वर्तनात सुधारणा होईल. नैतिक प्रगतीच्या दृष्टीने व्यक्तीची वाटचाल सुरू होईल.

उपयोजन प्रसंग

या संकल्पाच्या उपयोजनाचे प्रसंग प्रत्येक क्षेत्रात येत असतात. आपला स्वभाव रागीट आहे असे समजा. तसा अनेकांचा असतोच ! त्याने शांतवृत्ती संगोपनाचा संकल्प करावा. मग कुटुंबात, शिक्षण संस्थेत, समाजात, व्यवसायात. मित्रमंडळीत, बाजारात, क्रीडांगणावर इत्यादी अनेक ठिकाणी या संकल्प पालनाचे प्रसंग येतील. तेथे तेथे जाणीव पूर्वक संकल्पपालन केल्यास राग जिंकून शांतवृत्ती संपादन करता येईल.

सर्वांना शक्य

नैतिक शिक्षणाला पोषक व उपकारक असा हा स्वभाव शिक्षणाचा उपक्रम प्रत्येक शिक्षण संस्थेत सुरू करण्याकरता कोणाच्या परवानगीची वाट पहाण्याची आवश्यकता नाही. प्रत्येक संस्था प्रमुख आपल्या संस्थेत तो सुरू करू शकेल व प्रत्येक अध्यापक आपापल्या वर्गातील विद्यार्थ्यांना तो शिकवू शकेल. संस्थाप्रमुखांना व अध्यापकांना या उपक्रमाचे महत्त्व पटणे ही गोष्ट महत्त्वाची आहे. आजची तरूण पिढीची वाढती नैतिक अवनती पाहून ही आपल्या संस्था प्रमुखांना व आध्यापकांना या उपक्रमाचे महत्त्व पटले नाही, तर आपल्या समाजाचे दुर्दैव, दुसरे काय ? विचार करणे हा ज्यांचा व्यवसाय त्यांनीच त्या व्यवसायाचा त्याग केल्यावर त्यांच्यावर कोण सक्ती करू शकेल ! उलट ज्यांना या शिक्षणाचे महत्त्व पटले आहे त्यांना या उपक्रमापासून कोण परावृत्त करू शकेल ?

गीतेचा दृष्टिकोन: स्वभाव सुधारणा

नैतिक शिक्षण स्वभाव सुधारणा व वर्तन-परिवर्तन या विषयाची अधिक जिज्ञासा या लेखामुळे निर्माण व्हावी ती झाल्यास त्यांनी 'गीतेचा दृष्टिकोन-स्वभाव सुधारण्याचा मार्ग' हे माझे पुस्तक वाचावे. गीता हा शिक्षणोपयोगी ग्रंथ आहे. याची शिक्षणतज्ज्ञांनी जाणीव करून घेणे फार महत्त्वाचे आहे. गीताकारांनी मानवी मनोवृतींचे व त्यांच्या सुधारणेचे सखोल व सोपपात्तिक विवेचन केले आहे. केवळ आध्यात्मिक, ब्रह्मविद्येचा व

मोक्षाचा ग्रंथ म्हणून याकडे आजपर्यंत पाहिले गेले. पण मानसशास्त्राचे व नैतिक वर्तनाचे दृष्टीने या ग्रंथाने अतिशय मौलिक विवेचन केले आहे.

सुसंस्कृत मानवाच्या वृत्ती

या लेखात मनोवृत्तींचा व स्वभावाचा उल्लेख केलेला आहे. संपूर्ण गीतेमध्ये इष्ट आणि अनिष्ट अशा मनोवृत्तींचे निर्देश केले आहेत. अत्यंत सुसंस्कृत मानवाच्या ठिकाणी कोणत्या वृत्ती असाव्यात व कोणत्या नसाव्यात यांची अनेक वर्णने आहेत. आदर्श भक्ताचे पुढील वर्णन पहा आणि त्या वर्णनातील कसोटीला आपण उतरतो का त्याचाही विचार करा (अध्याय १२ श्लोक १३ ते १९).

न करी द्वेष कुणाचा — करूणा, मैत्री वहात हृदयात ।
निर्मम, निरहंकारी — सुख-दुःखी सम, सदा क्षमावंत ।।
दृढनिश्चयी, जितात्मा, — आनंदी, योगयुक्त जो सतत ।
द्वेष, हर्ष, भय खंती — ज्यासि नसे तोचि भक्त प्रिय साचा ।।
निष्काम, सदाचारी — तत्पर, योगी, उदात्त संतुष्ट ।
कर्मात स्वार्थ न धरी — भक्त मला तोचि वाटतो इष्ट ।।
अरिमित्रांच्या ठायी — राही समतोल मान-अपमानी ।
सम मानी स्तुति-निंदा — स्वाभाविक प्राप्तिने सदा तृप्त ।
फलहेतुरहित, निश्चल — चित्ती मत्प्रेम तो खरा भक्त ।।

नावाला हे भक्ताचे वर्णन आहे. पण या मनोवृत्तींची जोपासना प्रत्येक व्यक्तीने करून सुसंस्कृत व्हावे हा उद्देश आहे.

इष्ट व अनिष्ट वृत्ती

दैवी मनोवृत्तींच्या पुढील वर्णनात अनेक वृत्तीचा उल्लेख केला आहे तो पहा- (अध्याय १६, श्लोक १ ते ४)

शुचिता, शांति, स्थिरता — निर्भयता, त्याग, आत्मसंयमन ।
यज्ञ-दान-तप नियमित — मनशुद्धी विनय, तेज, अध्ययन ।।
सत्य, अहिंसा, करूणा, — मृदुता, सौजन्य, क्षांति, निःस्पृहता ।
अतिगर्व, क्रोध, निंदा, — दृष्टपणा टाळण्यात तत्परता ।।
तत्त्वार्थाचे चिंतन, — अध्यात्मी वृत्ति निश्चित ज्ञान ।
दैवी सद्गुणधन हे — मिळते जगि सज्जनास तू जाण ।।
अज्ञान, क्रोध, तृष्णा, — निर्दयता, दंभ, गर्व, अतिमान ।
संपत्ती दुर्गुणांची — मनुजा ती करित आसुरी जाण ।।

सुशिक्षिताच्या वृत्ती

माध्यमिक व उच्च शिक्षण संपादन करून ज्ञानी झालेल्या व्यक्तिच्या स्वभावात

कोणत्या वृत्ती असाव्यात व कोणत्या नसाव्यात ते पुढील परिच्छेदात आढळेल– (अध्याय १३, श्लोक ७ ते ११)

अतिगर्व, दंभ सोडी क्षमा, अहिंसा, स्वभाव निष्कपट !
संयम, स्थैर्य मनाचे, शुचिता, आचार्यवंदना इष्ट ॥
अनहंकारी वृत्ती विषय–सौख्य–सेवनात वैराग्य ।
मरण–जरा–व्याधीची दुःखाची जाण ठेवणे योग्य ॥
अध्यात्माचे चिंतन सिद्धांतांचे पुन्हा पुन्हा मनन ।
ज्ञानाचे हे लक्षण याच्या विपरीत सर्व अज्ञान ॥

असे कित्येक परिच्छेद गीतेत सर्वत्र आढळतात.

वृत्तींची साधना हेच तप

विद्यार्थी व अध्यापक यांनी सद्गुण साधनेचे तप करावे. त्या तपाचे शारीरिक भाषिक आणि मानसिक प्रकार म्हणजे इष्ट मनोवृत्तींचे संगोपनच आहे. (अध्याय १७, श्लोक १४ ते १६).

आचार्य, देव, ज्ञानी, यांच्या सेवेत नित्य दक्ष रहा !
शुचिता, विनय, अहिंसा, निर्मल चारित्र्य, हेचि तप देहा ॥
मधुर, सत्य, हितकर जी वाणी उद्वेग दे न चित्ताला ।
ज्ञानार्जन, पाठांतर, तप शोभे नित्य हेचि वाणीला ॥
संयम मनावरि, मित भाषण, मार्दव, प्रसन्न मनवृत्ती ।
मनि शुद्ध भावनांची सरिता, मानस तपाचरण गणती ॥

मानवी स्वभावांचे वर्गीकरण (इंडिव्हिज्युअल डिफरन्सेस किंवा डिफरेन्शल सायकॉलॉजी) अध्याय १४ व १६ मध्ये आहे. आणि स्वभावाचा माणसाच्या विचारावर बुध्दीवर, मनावार, वर्तनावर व कृत्यावर कसा परिणाम होतो ते अध्याय १७ व १८ मध्ये दाखवले आहे- स्वभावात स्व-प्रयत्नाने परिवर्तन कसे घडवून आणावे आणि त्या प्रमाणे आपले व्यवहार कसे करावेत हाच गीतेचा मुख्य प्रतिपाद्य विषय आहे. शिक्षणाचे दृष्टीने हा प्राचीन विचारवंतांचा लहान ग्रंथ आजही अत्यंत महत्त्वाचा आहे. नैतिक शिक्षणात जगातील ग्रंथात त्याला अग्रस्थान मिळाले आहे जगातील अनेक भाषात त्याचे, अनुवाद झाले आहेत. पण आपल्या अध्यापकांनी आणि अध्यापक–प्रशिक्षण संस्थांनी त्याच्या पद्धतशीर अभ्यास व विचार केलेला नाही, तो अवश्य करावा.

शिक्षण व ज्ञान यातील फरक

आपण धार्मिक शिक्षण देऊ शकत नाही. धर्माचे शुद्ध व अविकृत ज्ञान देऊ शकतो. धर्मज्ञान हा शिक्षणात एक आवश्यक विषय असावा. मानव उन्नत व सुसंकृत होण्याकरता

धर्मनिर्मात्यांनी काय विचार केला तो प्रत्येक सुसंस्कृत व सुशिक्षित व्यक्तीला ज्ञात असणें आवश्यक आहे. अनेक धर्मानुयायी असलेल्या या देशात तर त्याची फार जरूरी आहे. नास्तिक, बुद्धिवादी, मार्क्सवादी व्यक्तींनाही हे ज्ञान असल्याशिवाय त्यांच्या बुद्धिवादाला एकांगीपणा व अंधश्रद्धेचेच स्वरूप येईल.

नैतिक शिक्षणापेक्षा नैतिक ज्ञान आपण देऊ शकतो. त्या विषयाचा विस्तार या लेखात मी केलेला आहे. नैतिक वर्तन हे स्वभावावर अवलंबून आहे; स्वभाव हा मनोवृत्तींच्या विविध मिश्रणावर अवलंबून आहे. म्हणून मनोवृत्तींचा अभ्यास, आत्मपरीक्षण व संस्करण, आणि इष्ट मनोवृत्तींच्या साधनेची जाणीव हा नैतिक शिक्षणाचा मुख्य भाग असू शकतो. त्याकडे संस्थाचालक, संस्थाप्रमुख व अध्यापक यांनी लक्ष द्यावे असा या लेखाचा निष्कर्ष आहे. या विषयाचा सखोल विचार गीताकारांनी केलेला आहे म्हणून त्या लघु ग्रंथाचा परिचय व त्याची स्वभावसुधारणेची दृष्टी या लेखात दिली आहे. कोणत्याही धर्माच्या, पंथाच्या व 'इझम्च्या' व्यक्तीला हा ग्रंथ उपयुक्त व विचारप्रवर्तक वाटेल. शिक्षण क्षेत्रातील व्यक्तीचे या ग्रंथातील शैक्षणिक भागाकडे लक्ष वेधावे हा ही प्रयत्न आवश्यक म्हणून मी या लेखात केला आहे.

या लेखातील विचाराप्रमाणे वैयक्तिक जीवनात व माझ्या नियंत्रणाखालील संस्थेत मी चाळीस वर्षे यशस्वी प्रयोग करून व सतत चिंतन करून त्याचे सार वाचकांपुढे मांडले आहे. त्यांनी केवळ लेख न वाचता आपापला कार्यक्रम आखावा असा उद्देश आहे. तो फलद्रूप होवो.

□

शिक्षणाचे पंचप्राण

वि. वि. चिपळूणकर

" प्रेमान प्रेम वाढवू या, यशान यश मिळवू या, विश्वासान विश्वास वाढवू या, संपर्कान संपर्क वाढवू या व स्वयंमूल्यमापनातून स्वयंविकासाप्रत जाऊ या " ही शिक्षणातील पंचसूत्री म्हणजे शिक्षणाचे पंचप्राण होत हा विचार ' धडपड व्यासपीठा 'चे अध्वर्यु श्री. वि. वि. चिपळूणकर यांनी येथे मार्मिकपणे मांडला आहे.

प्रेमान प्रेम वाढवू या

माणसानं माणसांशी माणसासारखं वागावं अर्थात माणसानं माणसावर प्रेम करावं, एवढा संस्कार आपण जर विद्यार्थ्यांच्या मनावर केला, तर शिक्षणातून पुष्कळच गवसलं असं म्हणता येईल. खरं तर आपणास एक संस्कारप्रधान शिक्षणपद्धती अवलंबली पाहिजे. कारण शिक्षण म्हणजे वळण होय, दळण नव्हे. संस्कार करता येत नसतात, ते आपोआप होत असतात. असे संस्कार फक्त शरीरावर किंवा मेंदूवर होऊन चालत नाहीत. संस्कार मनावर घडावे लागतात. जेव्हा दोन मने एकत्र येतात, तेव्हा शिक्षणप्रक्रिया सुरु होते. द्वैत मोडून या हृदयाचे त्या हृदयात संक्रमण चालू होते. अशी दोन मने एका ठिकाणी येण्यासाठी प्रेमासारखं दुसरं साधन नाही. जिथं चार माणसं एकत्र येतात, तिथं त्याना प्रेमाची मूलभूत गरज असते. खरं तर प्रेम हा जीवनाचा स्थायी भाव आहे. अशा प्रेमानं जग ही जिकता येतं, म्हणूनच महात्मा गांधीजीनी ' There is only one religion and that is love ' अस म्हटल आहे. आज आपणास शिक्षणाच्या सर्व अंगोपांगात या प्रेमाची जोपासना केली पाहिजे ' Love begets Love ' प्रेमानं प्रेम वाढतं हे सूत्र ध्यानात ठेवलं पाहिजे. म्हणून मुख्याध्यापकांनी प्रेमानं शिक्षकांची मन जिकावी. शिक्षकांनी प्रेमानं विद्यार्थ्यांचो मन जिकावी. म्हणजेच मोठ्यांनी लहानावर प्रेम करत गेलं पाहिजे मग लहानही मोठ्यावर प्रेम करू लागतील. अशी सर्व शिक्षण प्रक्रियाच प्रेममय होऊन जाईल. आणि प्रेमानं प्रेम वाढत राहील.

यशानं यश वाढवू या

' यशानं यश वाढवू या ' हे तर शिक्षणातील महत्त्वाचं सूत्र आहे. विशेषत: परीक्षा

पद्धतीच्या अनुभवातून आपण काय शिकलो ? यातून आपण विद्यार्थ्यांना अपयशाचे अधिकात अधिक चटके देतो. इंग्रजी, गणित व मराठीत ही आपल्या विद्यार्थ्यांना ३५ गुण मिळत नाहीत. विद्यार्थी सारखे नापास होऊ लागले की मग अभ्यास करण्यात त्यांचे मन रमत नाही. मन बेडर बनत जाते. यशाची आशा दूरावते. ' Not failure, but low aim is a crime ' हे आजवर आपण शिकलो. पण ते जुनं होऊन गेलं. आता आपण ' Not low aim but failure is a crime ' असं म्हटलं पाहिजे. अगदी लहान लहान गोष्टीत ही अपयश घेणार नाही, अस ठरवलं पाहिजे. आता आपली युनिट टेस्ट घ्या. त्याचा आपण जर योग्य विचार केला, तर ते अगदी सोपं आहे. आपण विद्यार्थ्यांना धडा शिकविला, त्याना तो घरी वाचायला सांगितला, नंतर त्याच धड्यावर प्रश्न विचारले, तर अनेक विद्यार्थ्यांना चांगले गुण मिळतील, पण होतं काय की, धडा शिकवून झाल्यानंतर २-४ महिन्यांनी आपण प्रश्न विचारतो. मग विद्यार्थी प्रश्नांची उत्तर घोकतात. मग त्यातील काही बरोबर येतात,काही चुकतात. लहान लहान गोष्टीत ही विद्यार्थ्यांना अचूक यश कसं मिळेल, याची आपण दक्षता घेतली पाहिजे. तशी दृष्टी ठेवली पाहिजे तरच विद्यार्थ्यांना एका पाठोपाठ एक यश मिळत जाईल. त्यांचे जीवन एक ' यशोमालिका ' बनून जाईल. यशामागून यश मिळत राहील. त्यांचे मन प्रफुल्लित होऊन जाईल. त्यातून मध्येच एकादे अपयश आलेच तर ते खपून जाईल. पण सतत अपयश आलं तर जीवनचं निराशमय वाटेल. आणि म्हणूनच शिक्षणक्षेत्रात काम करत असताना ' यशानं यश वाढवू या ' हे सूत्र सर्वांनी आपल्याजवळ बाळगलं पाहिजे.

विश्वासानं विश्वास वाढवू या

विश्वासानं आपणास अधिक चांगली कामे करून घेता येतात,असा माझा तरी अनुभव आहे. ' Distrust begets distrust, trust begets trust ' याप्रमाणे आपण जर विश्वास टाकला, तर ज्याच्यावर आपण विश्वास टाकतो, तो मनुष्य सहजासहजी आपला कधी विश्वासघात करीत नाही अर्थात याला ही काही अपवाद असू शकतात. पण एकदा का आपण विश्वास टाकायला सुरवात केली की, सहजासहजी कोणी विश्वासघात करीत नाही. निदान आपण एवढं तरी पहावं की, एकाद्या कामासाठी विश्वास टाकण्यालायक माणसं तरी आहेत किंवा नाहीत ? खरं तर विश्वासाशिवाय काम होणंच शक्य नाही. घरी, दारी, शाळेत, प्रशासनात आणि सगळीकडेच विश्वास टाकावाच लागतो. अविश्वासाने द्वेष वाढतो. द्वेषानं माणसं दुरावतात. संस्थेने मुख्याध्यापकाकडे संशयाने बघायचे, मुख्याध्यापकाने शिक्षकाकडे साशंक दृष्टीने पहायचे, शिक्षकांनी विद्यार्थ्याकडे संशयाच्या नजरेनं पहायच, त्यामुळं काम होत नाही. परस्परामधील दरी मात्र वाढत जाते. आपुलकी दुरावते. प्रेम नष्ट होतं, धुसफूस वाढत जाते. मग कामासाठी काम सुरू होत. कामात कमालीची ढिलाई येते. कामाचा दर्जा संपतो. म्हणून सर्वाच्याच कामात

मानवी दृष्टिकोण निर्माण करावयाचा असेल तर परस्परांच्यावरील विश्वास वाढविला पाहिजे आणि म्हणून 'विश्वासानेच विश्वास वाढतो' याचा विसर पडू देता कामा नये.

संपर्कातून सामर्थ्य वाढवू या

आज आपणास संपर्कातून सामर्थ्य संघटित करण्याची नितांत गरज आहे. आज आपणामध्ये चांगली कामे करणारी अनेक माणसे आहेत. पण अशी माणस विस्कळीत पडलेली आहेत तुम्ही तुमच्या ठिकाणी चांगल काम करता, मी माझ्या ठिकाणी चांगलं काम करतो, मुख्याध्यापक मुख्याध्यापकाच्या ठिकाणी चांगलं काम करतात, शिक्षक शिक्षकाच्या ठिकाणी चांगलं काम करतात, विद्यार्थी विद्यार्थ्याच्या ठिकाणी चांगलं काम करतात, पण खर तर मुख्याध्यापक शिक्षक आणि विद्यार्थी कधी एकत्र येत नसतील तर त्यांच्या चांगल्या कामाचा एकमेकाला काहीच उपयोग होणार नाही. त्यामुळे त्यातून सामर्थ्य निर्माण होणार नाही आपण सामर्थ्य संघटित केले पाहिजे. त्यामुळे आपण एकटे नाही, ही जाणीव निर्माण होईल. धडपडणारी चांगली माणसं म्हणजे विखुरलेलं सामर्थ्य होय. ते संघटित केलं पाहिजे. त्यातून प्रचंड अशी चांगली कामं निर्माण होतील. खरं म्हणजे चांगलं काम करणाऱ्या माणसाला सारे लोक प्रथम वेडयातच काढतात. पण असे चार वेडे संघटित होण्याची फार मोठी गरज आहे. आणि याच दृष्टीने 'संपर्क' हा अत्यंत महत्वाचा भाग आहे. कांही चांगल्या कामासाठी प्रेमानं एकत्र येण्यातच आपल खरंखुरं सामर्थ्य साठविलेलं आहे.म्हणून 'United we stand' या विचाराचा आपणास विसर पडून चालणार नाही. यासाठी विखुरलेले सामर्थ्य एकत्र आलं पाहिजे.विविधतेमध्ये देखील सामर्थ्य असतं ते आपण मिळविलं पाहिजे एकच काम सर्वांनी सारखं करणं, यात सामर्थ्य नाही, पण आपल्या परीने काम करणारे अनेकजण एकत्र आले तर त्यात वैचारिक सामर्थ्य निर्माण होतं. आणि आज आपणास याच गोष्टीची अधिक गरज आहे, अस मला वाटतं,

स्वयंमूल्यमापनातून स्वयंविकास साधू या

आज आपला विकास बाहेरुन कोणी येऊन करणार नाही. विकासाची तळमळ प्रथम आपल्या मनात निर्माण झाली पाहिजे. श्रीमंताचा मुलगा असतो. शाळेत फी भरतात. त्याच्याजवळ सगळी पाठ्यपुस्तक व गाईडस असतात. खाजगी शिकवण्याही सुरू असतात. तरीही त्या मुलास उत्तम गुण मिळत नाहीत. कारण, बाहेरून सर्व प्रकारच वातावरण निर्माण केलेलं आहे. पण शिकण्याची आंतरिक उर्मी कुठं आहे ? आणि अशी आतून उमेद निर्माण झाली नाही, तर मग त्यांचा काय उपयोग ? आता सगळीकडे शाळांची संख्या वाढली आहे, हा काही शिक्षणाचा विकास नाही, विस्तार आहे, विकास आतून बाहेर होत असतो. वाढ मात्र बाहेरच्या बाहेर राहते. खरं म्हणजे मनुष्य अंतर्मुख

झाल्या खेरीज त्याचा विकास होणार नाही. विशेषत: वरच्या वर्गातील विद्यार्थ्यांना आपण स्वयंमूल्यमान करायला सांगितले व आपण मार्गदर्शन केले तर त्यांची स्वत:ची परीक्षा ते घेतील, या बद्दल मला विश्वास वाटतो. माणूस जेव्हा स्वत:ची परीक्षा घेतो, तेव्हा तो लिबरली घेत नाही, हे आपण ध्यानात ठेवलं पाहिजे. प्रथम तो स्वत:ला खूप मार्क घेतो आणि नंतर आपण अधिक मार्क घेत आहोत हे त्याच्या लक्षात येत, आणि तो ते मार्क स्वत:च कमी करतो. अंतर्मुख झाल्यानेच विकास घडतो.

धडपड हीच पूजा

शिक्षणाचे हे पंचप्राण म्हणजे खऱ्या अर्थाने शिक्षकांचेच पंचप्राण आहेत. या पंचप्राणाची जोपासना करण्यासाठी शिक्षकानी पंचगुणांची कास धरली पाहिजे. निर्भयता, कल्पकता, दक्षता, नम्रता आणि प्रसन्नता हेच ते पंचगुण होत. शिक्षकांच्या वृत्तीमध्ये निर्भयता असावी व दिसावीही. कोणत्याही परिस्थितीत नवीन मार्ग शोधून काढण्याची कल्पकता असावी. कृतीत विद्यार्थी हिताची दक्षता असावी. वाणीत नम्रता दिसावी आणि चेहऱ्यावर प्रसन्नता असावी हे पाच गुण जर शिक्षकांच्या व्यक्तिमत्त्वात उठून दिसतील तर शिक्षणशास्त्रच त्यांच्या पायाशी लोळण घेत राहील. येथेच खऱ्या अर्थाने नव शिक्षणशास्त्र जन्म घेऊ लागेल. कारण शिक्षणाचा खराखुरा विचार शिक्षकापासूनच पसरत जातो. गुणांचा व मूल्यांचा प्रवास शिक्षकापासून समाजापर्यंत संक्रमित होत असतो आणि यासाठीच " मी एक शिक्षक, शिक्षण हा माझा स्वधर्म, विद्यार्थी हे माझे दैवत, शाळा हे त्याचे मंदीर, धडपड ही त्यांची पूजा ' दुरितांचे तिमीर जावो, ही माझी प्रार्थना. आणि समाजाचे आशीर्वाद हा त्याचा प्रसाद होय. ' या विचाराशी, जाणिवेशी आपण समरस होऊन एक निश्चित भूमिका आपण जेव्हा स्वीकारु तेव्हाच शिक्षणातून समाज परिवर्तनाचा सूर्य समाजमनाच्या क्षितीजावर चमकू लागेल.

□

महाराष्ट्रातील शिक्षक–प्रशिक्षणाच्या नव्या दिशा

डॉ. मो. ह. पिंपळखरे

शिक्षणात प्रशिक्षणाचे स्थान अनन्यसाधारण आहे. प्राथमिक, माध्यमिक सेवांतर्गत व पत्रद्वारा प्रशिक्षणांची गुणवत्ता वाढविणे आज आवश्यक आहे. शिक्षक प्रशिक्षणाच्या नव्या दिशांचा वेध घेण्याचे काम डॉ. मो. ह. पिंपळखरे यांनी येथे मोठ्या मनोज्ञपणे केले आहे.

शिक्षणाच्या प्रक्रियेतील एक महत्वाचा घटक म्हणजे शिक्षक, कोणत्याही शिक्षणप्रणालीचे चैतन्य वाढविणारा, किंवा खच्ची करणारा घटक म्हणजे शिक्षक. अभ्यासक्रम चांगला असला, सर्व साहित्याचा भरपूर पुरवठा असला पण अकार्यक्षम शिक्षक असतील तर हाती यश मिळणे कठीण. शिक्षकांच्या प्रशिक्षणाच्या आवश्यकतेबद्दल पूर्वी काही काळ चर्चा झाली ते अनावश्यक आहे, असा सूर आता फार क्वचित ऐकायला येतो. उलट सर्व पातळीवर ते आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले जात आहे. प्रशिक्षणाची आवश्यकता आता सर्वत्र मान्य झाली असली तरी त्यामुळे प्रशिक्षणाचे सर्व प्रश्न सुटले, असे मानता येणार नाही. हे प्रशिक्षण अधिकाधिक उपयुक्त कसे होईल ? ते अधिक वास्तववादी कसे होईल ? केवळ पुस्तकी न राहता परिस्थितीनुसार त्यात बदल कसे होतील ? या प्रश्नांची उत्तरे अजून सापडल्याचा दावा कोणी करू शकणार नाही आज अनेक बाबतीत शिक्षक–प्रशिक्षणाबाबत असमाधान आहे. सुधारणा करण्यास वाव आहे.

कोठारी आयोगाने शिक्षकांच्या प्रशिक्षणातील काही कच्चा दुव्यांची चर्चा केली आहे. शिक्षक प्रशिक्षण संस्था विद्यापीठांपासून अलग राहतात, इतर शिक्षणसंस्थांशीच नव्हे तर आपापसातही त्यांचे आदान–प्रदान कमी आहे, एकांडया शिलेदाराप्रमाणे त्यांचे कार्य चालते, असे आयोगाने नमूद केले आहे. त्यांची गुणवत्ता सामान्य प्रतीची असून पारंपारिक पद्धतींचा आत्यंतिक आग्रह, वास्तवता आणि चैतन्य यांचा अभाव असल्याचे सांगून आयोगाने काही सुधारणा सुचविल्या आहेत. शिक्षकांना केवळ एकदाच प्रशिक्षण देवून चालणार

नाही. नोकरीत असतानाही त्यांना वेळोवेळी प्रशिक्षण–सेवांतर्गत प्रशिक्षण–देण्याची आवश्यकता आयोगाने स्पष्ट केली आहे. शिक्षकप्रशिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी राज्यात तसेच केन्द्रपातळीवर आवश्यक यंत्रणा निर्माण करण्याच्या आवश्यकतेवरही आयोगाने भर दिला आहे.

प्राथमिक शिक्षकांचे प्रशिक्षण

कोठारी आयोगाचे कार्य चालू असताना महाराष्ट्र शासनाने १० नोव्हेंबर १९६५ रोजी आदेश काढून शिक्षक प्रशिक्षणाची पुनर्रचना करण्यासाठी शिफारसी करण्यासाठी डॉ. चित्रा नाईक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने प्रशिक्षणसंस्थांना भेटी देवून, तसेच राज्यभर परिषदा घेवून ९ मे १९६६ रोजी आपला अहवाल शासनास सादर केला. महाराष्ट्रातील आजचे प्रशिक्षण या समितीच्या शिफारसीनुसार बहुतांशी चालते. या समितीने १९६६–६७ सालची आकडेवारी दिली असून त्यानुसार प्राथमिक पातळीवरील १४१ संस्था व माध्यमिक पातळीवरील २९ संस्थांचा उल्लेख आहे. महाराष्ट्रात सध्या प्राथमिक पातळीवर १३९ प्रशिक्षण संस्था असून माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षण महाविद्यालयांची संख्या ४७ आहे. प्राथमिक प्रशिक्षण देणाऱ्या संस्थाची संख्या जवळजवळ पूर्वीइतकीच दिसत असली तरी त्यात काही ठळक भेद आहेत. १९६६–६७ साली प्राथमिक प्रशिक्षण संस्थापैकी ६० संस्था शासकीय असून ८१ अशासकीय होत्या. सध्या त्यांची संख्या अनुक्रमे ४६ व ९३ झाली आहे. १३९ संस्थापैकी १२५ संस्था प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षण देतात, तर १४ पूर्व–प्राथमिक पातळीवरील प्रशिक्षण देतात. १९६५–६६ साली प्राथमिक प्रशिक्षणसंस्थात केवळ सेवापूर्व प्रशिक्षण देण्यात येत असून प्रवेशक्षमता १९,२०० होती. १९८१–८२ मध्ये अनेक ठिकाणी सेवापूर्व आणि सेवांतर्गत प्रशिक्षण एकाच वेळी चालत असून सेवापूर्व प्रशिक्षण घेणारे विद्यार्थी ११,६०० होते. या आकडेवारीतील बदलाबरोबर काही गुणात्मक बाबीचाही विचार करणे आवश्यक ठरते.

शिक्षक प्रशिक्षण पुनर्रचना समितीने शिफारस केल्याप्रमाणे अध्यापन–पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. त्यामध्ये प्रवेश घेण्यासाठी माध्यमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक ठरले. त्यापूर्वी इयत्ता ७ वी पास झालेल्यांना प्रवेश मिळत असे. यामुळे प्राथमिक शिक्षकांच्या शैक्षणिक पात्रतेमध्ये सुधारणा झाली. १९६५–६६ साली जवळजवळ १,२,००० प्राथमिक शिक्षकांपैकी अंदाजे ४३,००० शिक्षक माध्यमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण होते. १९८० साली २ लाख शिक्षकांपैकी जवळजवळ १.३५,००० शिक्षक या पात्रतेचे होते. सुरुवातीस हे प्रमाण जवळजवळ १/३ होतें ते आता २/३ हून जास्त झाले आहे. १९६५–६६ साली जवळजवळ ७० टक्के शिक्षक प्रशिक्षित होते. आता ही

टक्केवारी अंदाजे ९० टक्के झाली आहे ही टक्केवारी वाढविण्याचे कारण म्हणजे वाढलेल्या प्रशिक्षण संस्था आणि पत्रव्दारा प्रशिक्षणाची सोय. अनेक शिक्षकांना ज्यात स्त्रियांचे प्रमाण अधिक होते. घरादारापासून दूर सतत दोन वर्षे राहून प्रशिक्षण घेणे शक्य नव्हते. या शिक्षकांना पत्रव्दारा प्रशिक्षण घेण्याची सोय झाल्याने आपापल्या गावी राहून प्रशिक्षण घेता आले. प्रशिणाच्या सोयी ज्याप्रमाणात वाढत गेल्या त्याप्रमाणात नोकरीत असणाऱ्या प्रशिक्षण घेणाऱ्या शिक्षकांची संख्या कमी होत गेली. महाराष्ट्रात सध्या जवळजवळ २ लाख प्राथमिक शिक्षक आहेत. सेवानिवृत्ती, राजिनामे इत्यादी कारणांमुळे ३ टक्के जागा दरवर्षी निर्माण होतात. या जागा अंदाजे ६००० होतात. त्याशिवाय काही जागा विद्यार्थ्यांची संख्या वाढत जात असल्याने निर्माण कराव्या लागतात. दरवर्षी इयत्ता १ ते ७ मध्ये अंदाजे ३,५०,००० विद्यार्थी वाढतात असे अलीकडच्या आकडेवारीवरून गृहीत धरले तरी दरवर्षी अंदाजे ८००० शिक्षकांची यासाठी गरज भासेल. म्हणजे एकंदर १४००० जागा दरवर्षी भराव्या लागतील. सध्याची प्रवेश क्षमता ११६०० असल्याने आणि काही वर्षांपूर्वी प्रशिक्षित झालेले उमेदवार अजून नोकरीवर घेतले नसल्याने सध्या तरी प्रशिक्षीत शिक्षकांची उणीव वाटू नये. शिक्षकांची भरती करताना राखीव जागांच्या प्रमाणानुसार अप्रशिक्षित शिक्षक नेमले गेल्यास सध्याची प्रवेशक्षमता वाढवावी लागेल. सतत वाढत जाणाऱ्या लोकसंख्येच्या दरवर्षी अडीच टक्के वाढीचा विचार करणे आवश्यक ठरते. त्याचप्रमाणे अगदी लहानलहान वाड्यांत प्राथमिक शाळा सुरु करण्याचे शासनाचे धोरण असल्याने प्राथमिक शाळांत अधिक शिक्षक नेमावे लागणार आहेत. काही एकशिक्षकी शाळांत दोन शिक्षक नेमण्यास प्रारंभ झाला असल्याने शिक्षकांच्या जागा वाढणार आहेत या सर्व घटकांचा विचार करता सध्याची प्रवेशक्षमता थोडीशी अपुरी पडेल असे दिसते. नियोजनपूर्वक सध्यांच्या संख्येत वाढ केल्यास विशेष अडचण जाणवू नये.

सेवांतर्गत प्रशिक्षण

महाराष्ट्र राज्यातील प्रशिक्षणाची पुनर्रचना सुचविताना वर उल्लेख केलेल्या समितीने सर्व पातळीवरील शिक्षकांना वेळोवेळी सेवांतर्गत प्रशिक्षण देण्यात यावे, असे सुचविले आहे. महाराष्ट्र राज्यात प्राथमिक शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षण देण्यासाठी राज्यातील ६९ प्रशिक्षणसंस्थांतील १०४ तुकड्या राखून ठेवण्यात आल्या आहेत. साधारणत: चार आठवडे मुदतीचे प्रशिक्षण देण्याची तरतूद करण्यात आली असून दरवर्षी अंदाजे २०,००० शिक्षकांना हे प्रशिक्षण देण्याची तरतूद आहे. सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी येणाऱ्या शिक्षकांना विद्यावेतन देण्यात येते या प्रशिक्षणासाठी सर्वसाधारण उद्‌बोधनाचा वर्ग, मुख्याध्यापकांचा वर्ग, शास्त्राध्यापनाचा वर्ग, तसेच इंग्रजीच्या शिक्षकांचा वर्ग असे विविध प्रकारचे वर्ग चालविण्यात येतात. याशिवाय वेळोवेळी स्थानिक

पातळीवरील उपक्रमात प्राथमिक शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षण देण्यात येते. महाराष्ट्रात अंदाजे दोन लाख प्राथमिक शिक्षक आहेत, हे लक्षात घेता सध्याच्या तरतुदीनुसार दर दहा वर्षांनी एका शिक्षकास प्रशिक्षणासाठी धाडता येईल. शिक्षकांना शिक्षक प्रशिक्षणासाठी धाडले की, त्यांच्या जागी दुसऱ्या शिक्षकांची नेमणूक करणे शक्य होत नाही, त्यामुळे अनेक ठिकाणी शिक्षकांना या वर्गाना धाडले जात नाही, सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी आकाशवाणी, दूरचित्रवाणी पत्रव्दारा प्रशिक्षण या विविध प्रकारच्या पद्धतीचा उपयोग केला गेल्यास शिक्षकांना आपापल्या गावी राहून सेवांतर्गत प्रशिक्षण घेता येईल. शिक्षकांनी या योजनेत मोठ्या संख्येने सहभाग केल्यास ही योजना कमी खर्चाची व अधिक फायद्याची ठरू शकेल. कोठारी आयोगाने प्रत्येक शिक्षकाला दर पाच वर्षांनी सेवांतर्गत प्रशिक्षणाचा फायदा मिळावा, असे सुचविले आहे. ही सूचना अंमलात आणावयाची झाल्यास सध्या असणाऱ्या सोयींची दुप्पट करावी लागेल. सध्या असणाऱ्या सेवांतर्गत प्रशिक्षणाच्या सोयी सर्व जिल्ह्यात सारख्या प्रमाणात नाहीत. शिक्षकांची संख्या विचारात घेऊन जिल्हानिहाय योग्य प्रमाणात त्यांची विभागणी करावी लागेल.

पत्रद्वारा प्रशिक्षण

महाराष्ट्रात सध्या जे शिक्षक सेवेत आहेत, परंतु प्रशिक्षित नाहीत त्यांना अध्यापन पदविकेसाठी पत्रद्वारा प्रशिक्षण देण्यात येते, पत्रव्दारा प्रशिक्षणाची योजना सुरू झाल्यापासून दरवर्षी प्रवेशासाठी येणाऱ्या अर्जाची संख्या कमीकमी होत असून एकदोन वर्षांत ही शिक्षकांची संख्या फारच कमी होईल. सुरवातीस पदविकेसाठी प्रशिक्षण देण्यासाठी निर्माण झालेली ही यंत्रणा शिक्षकांच्या विषय ज्ञानाची सुधारणा करण्यासाठी वापरता येईल. शिक्षकांना केवळ अध्यापनाच्यापद्धती शिकवून भागणार नाही. त्यांना शालेय विषयांचे भरपूर ज्ञान असावयास पाहिजे, याबाबत कोणाचे दुमत असणार नाही. नवीन अभ्यासक्रम सुरू करताना किंवा एखादा विषय अभ्यासक्रमात प्रथमच अंतर्भूत करताना प्रशिक्षणाची आवश्यकता जाणवते. महाराष्ट्रात इयत्ता ५ ते ७ वर्गात इंग्रजी हा विषय सर्वत्र सक्तीचा केला गेला, परंतु अनेक ग्रामीण शाळांत या विषयाचे अध्यापन समाधानकारक होत नाही. ही वस्तुस्थिती आहे. ही परिस्थिती सुधारण्यासाठी इंग्रजीचे ज्ञान व अध्यापनाच्या पद्धती यांचा समावेश असणारा अभ्यासक्रम शिक्षकांसाठी उपयुक्त ठरेल. प्राथमिक शाळांच्या अगदी अलीकडे सुधारलेल्या अभ्यासक्रमात परिसराचा अभ्यास हा नवीन विषय आहे. या विषयाची संकल्पना प्रथम शिक्षकांना समजून घ्यावयास हवी. यासाठी पत्रव्दारा प्रशिक्षण योजना उपयोगात आणता येईल. शिक्षकांना विविध शालेय विषयांचे अद्यावत व अधिकृत ज्ञान पुरवून त्यांचे प्रावीण्य पारखून पाहण्यासाठी पत्रव्दारा प्रशिक्षण योजना उपयुक्त ठरेल. पत्रव्दारा अध्ययन साहित्य धाडून त्याशिवाय आकाशवाणी, ध्वनिमुद्रिका, शक्य असेल तेथे दूरचित्रवाणीचा उपयोग करून अल्प

काळात आणि कमी खर्चात शिक्षकांची कार्यक्षमता वाढविता येईल. महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षकांची संघटना अनेक प्रकारचे विधायक कार्य करते. या संघटनेने या कार्यात मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन आपल्या सभासदांना आपापली व्यावसायिक प्रगती करण्यास उत्तेजन दिले पाहिजे. शिक्षकांच्या व्यवसायात वेळोवेळी ज्ञानाला उजाळा देण्याची आवश्यकता स्वयंस्पष्ट आहे. सध्याचे जग अत्यंत गतिशील आहे. जनसंपर्कमाध्यमामुळे विद्यार्थ्यांना विविध मार्गांनी ज्ञान मिळते.त्यामुळे शालेय शिक्षणाची भूमिका अपरिहार्यपणे बदलते आहे. या बदलत्या भूमिकेची शिक्षकांच्या मनामध्ये जाण हवी. या जनसंपर्क माध्यमाचा योग्य उपयोग करून शिक्षकांनी स्वतःचे ज्ञान अद्ययावत ठेवले नाही तर त्यांचा प्रभाव समाजावर तसेच आपल्या विद्यार्थ्यांवर पडणार नाही. सध्याच्या जीवनात ज्ञानाचा प्रचंड स्फोट होत आहे. एका शिक्षकाचे व्यावसायिक जीवन कमीतकमी ३० ते ३५ वर्षांचे आहे. केवळ एकदा प्रशिक्षण घेऊन मिळालेली शिदोरी इतक्या दीर्घकाळासाठी पुरणार नाही. म्हणून काही देशात शिक्षकांना काही विशिष्ट कालमर्यादेपुरतेच शिकविण्यासाठी पात्रतेचे प्रमाणपत्र देता येते. ही कालमर्यादा साधारणतः ५ ते १० वर्षापुरती असते. ही पद्धत आपल्याकडे प्रचलित नसली तरी प्रत्येक शिक्षकांनी आपापल्या आवश्यकतेनुसार प्रशिक्षण घ्यावयाचे ठरविल्यास पत्रव्दारा प्रशिक्षण योजनेशिवाय दुसरी कोणतीही योजना पुरी पडू शकणार नाही.

माध्यमिक शिक्षकांचे प्रशिक्षण

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या वेळी महाराष्ट्रात १३ प्रशिक्षण महाविद्यालये असून विद्यार्थ्यांची संख्या जवळजवळ १२०० होती. १९६६ साली ही संख्या २४ झाली. चौथ्या पंचवार्षिक योजनेमध्ये शिक्षण महाविद्यालयांच्या प्रसारास उत्तेजन मिळाल्याने १९७१ मध्ये ४९ महाविद्यालये होती. त्यामधून जवळजवळ ७००० विद्यार्थी प्रशिक्षित होण्याची सोय होती. या वाढत्या संख्येमुळे प्रशिक्षित माध्यमिक शिक्षकांची टक्केवारी वाढत गेली.१९७९–८० मध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांची संख्या१लक्ष १० हजार असून त्यापैकी ९४ टक्के शिक्षक प्रशिक्षित होते. सेवानिवृत्ती, राजिनामे इत्यादी कारणांमुळे दरवर्षी शिक्षकांच्या संख्येच्या ३ टक्के जागा रिकाम्या होतात, असे मानण्यात येते. यानुसार दरवर्षी रिकाम्या जागांची संख्या अंदाजे ३३०० होते. दरवर्षी वाढणाऱ्या विद्यार्थी–संख्येचा विचार केला तर ही संख्या ५००० च्या आसपास होईल. या आकडेवारीवरुन सध्या आवश्यकतेपेक्षा अधिक शिक्षक प्रशिक्षित होतात, असे दिसून येते. ही संख्या कमी करण्याच्या दृष्टीने शासनाने काही शासकीय महाविद्यालये बंद केली, कांहीची प्रवेशक्षमता कमी केली. त्यामुळे सध्या महाराष्ट्रात १२ शासकीय महाविद्यालयात १०८० तर ३५ अशासकीय महाविद्यालयात ५०३५ विद्यार्थी मिळून ६८१५ शिक्षक प्रशिक्षित होवू शकतात. भावी काळात शिक्षकांची गरज अजमावण्यासाठी अधिक पद्धतशीर

अभ्यास करावयास हवा. १९४७ ते १९५५ या स्वातंत्र्योत्तर वर्षात माध्यमिक विद्यार्थ्यांची संख्या २,४७,००० वरुन ४,४०,००० पर्यंत वाढली या काळात नोकरीवर लागलेले शिक्षक त्यावेळी २५–३० या वयोगटात असणार. यापैकी बहुसंख्य शिक्षक, १९८०–८८ कालखंडात सेवानिवृत्त होतील ही संख्या अंदाजे ११,००० च्या आसपास येईल. तसेच १९६१ ते १९६६ या कालखंडात विद्यार्थी संख्या ८ लाखावरुन १५ लाखांवर गेली. यावेळी नोकरीवर लागलेले शिक्षक १९९१–१९९६ या कालखंडात सेवानिवृत्त होतील. कोठारी आयोगाने महाविद्यालयांची प्रवेशक्षमता अजमाविण्यासाठी सेवांतर्गत प्रशिक्षणाचाही विचार करावा, असे सुचविले आहे. महाविद्यालयांची प्रवेशक्षमता ठरविताना कला विज्ञान किंवा वाणिज्य महाविद्यालयातील प्रत्येक वर्गातील ८० विद्यार्थ्यांची संख्या निश्चित करणे योग्य होणार नाही. शिक्षण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची संख्या फार मर्यादित असल्यास आवश्यक त्या शैक्षणिक सोयी पुरविता येत नाहीत. सध्या प्रत्येक महाविद्यालयात सरासरीने १४५ विद्यार्थी असून काही महाविद्यालयात ६० विद्यार्थी आहेत. ही संख्या आर्थिक तसेच शैक्षणिक निकष लावून निश्चित करण्याची आवश्यकता जाणवते.

सेवांतर्गत प्रशिक्षण

माध्यमिक शिक्षकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षाच्या सोयी अत्यंत मर्यादित आहेत. प्रत्येक जिल्हयातील एका महाविद्यालयातील विस्तारसेवा विभागाने त्या त्या जिल्हयातील शिक्षकांचे सेवांतर्गत प्रशिक्षण आयोजित करावे, अशी अपेक्षा आहे. हा विभाग पूर्वी महाविद्यालयाचा एक अविभाज्य घटक होता. या विभागाचे समन्वयक सेवाज्येष्ठ असून त्यांची वेतनश्रेणीही उच्च होती. आज त्याच्या उलट परिस्थती आहे. समन्वयकांची वेतनश्रेणी महाविद्यालयीन अधिव्याख्यात्यांपेक्षा कमी असून हे पद प्रशासकीय ठरविण्यात आले आहे. यामुळे या समन्वयकांना शैक्षणिक कार्य देण्यात अडचण निर्माण झाली असून ते एकांडे शिलेदार झाले आहेत याबाबतीत शासकीय आणि अशासकीय महाविद्यालयांत भेदभाव आहे. प्रशासकीय कारणांमुळ प्रथम समन्वयकांना विद्यापीठ अनुदान मंडळाची वेतनश्रेणी नाकारण्यात आली. काही शासकीय महाविद्यालये बंद झाल्यावर काही अधिव्याख्यात्यांना त्या जागी श्रेणीत नेमण्यात आले. वस्तुतः सर्व समन्वयकांना विद्यापीठ अनुदान मंडळाची वेतनश्रेणी देण्याचा खर्च फार होणार नाही. शासनाने शैक्षणिक तत्वाच्या आधारे सर्व समन्वयकांना अधिव्याख्यात्याची वेतनश्रेणी द्यावी. असे झाल्याने महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांना आलटून पालटून या पदांवर नेमता येईल. अधिकाधिक जणांना प्राथमिक व माध्यमिक शाळांशी व शिक्षकांनी संपर्क साधता येतील. अध्यापक महाविद्यालये सर्वसाधारण शिक्षण प्रवाहापासून अलग राहून एकांडपणे काम करतात. असे मत अनेक आयोगांतून व्यक्त केले गले आहे. विस्तारसेवा केंद्रामार्फत प्राध्यापकांना जिल्हयातील शिक्षकांशी तसेच प्रशासकीय अधिकऱ्यांशी अधिक निकट येवून विचारांची

देवाणघेवाण करणे शक्य होते. प्रशासकीय अधिकारी आणि महाविद्यालयांचे प्राध्यापक यांनी काही वेळ प्रशासनात तर काही वेळ अध्यापनात घालविल्यास प्रशासन आणि अध्यापन यांचा सुरेख मेळ बसू शकतो. शासकीय महाविद्यालयात गेली अनेक वर्षे ही निरोगी प्रथा होती. परंतु विद्यापीठ अनुदान मंडळाच्या सुधारित वेतनश्रेणीमुळे ही दीर्घकालीन उपयुक्त परंपरा नष्ट झाली. ही देवाणघेवाण चालू राहणे सर्वांच्या दृष्टीने आवश्यक आहे अन्यथा प्रशासन व अध्यापन निकृष्ट दर्जाचे होण्याची शक्यता आहे. सध्या विस्तार सेवा केंद्राना मिळणारे अनुदान अत्यंत तुटपंजे असून अनियमितपणे मिळते. त्यामुळे विस्तारसेवाकार्यावर अनेक मर्यादा पडतात. हे कार्य अधिक प्रभावी होण्यासाठी सक्षम समन्वयक आणि अधिक अर्थसंकल्प यांची आवश्यकता जाणवते. सेवांतर्गत प्रशिक्षणाचे उपक्रम प्राथमिक पातळीवर काही प्रमाणात नियमितपणे चालू आहेत. काही अध्यापक महाविद्यालयात प्रायोगिक स्वरूपात असे वर्ग वर्षभर चालविण्यात यावेत. विविध शालेय विषयाचे ज्ञान आणि अध्यापन पद्धती याचा समावेश असलेले अभ्यासक्रम माध्यमिक शिक्षकांना अत्यंत उपयुक्त ठरतील.

गुणवत्ता वृद्धी

प्राथमिक व माध्यमिक प्रशिक्षण संस्थाची गुणवत्ता समाधानकारक नाही, असे मत सर्व आयोगांनी स्पष्टपणे मांडले आहे. अनेक प्राथमिक संस्था अत्यंत निकृष्ट इमारतीत भरतात. तेथील सुखसोयी अपुऱ्या असतात असे १९६६ च्या महाराष्ट्र शासनाच्या समितीने नमूद केले आहे. प्राथमिक शिक्षकांचे प्रशिक्षण सुधारण्यासाठी त्यांना विद्यापीठाच्या अधिकारक्षेत्रात आणावे, आणि प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकांचे प्रशिक्षण समावेशक अध्यापक महाविद्यालयात करावे अशी शिफारस कोठारी आयोगाने केली. परंतु विद्यापीठांनी प्राथमिक प्रशिक्षणाचे अभ्यासक्रम तयार केले नाहीत. त्यामुळे या संस्था एका आवारात जवळजवळ भरल्या पण एकसंधपणे काम करत नसल्याने एकजीव होवू शकल्या नाहीत कालांतराने तथाकथित सर्वसमावेशकता कागदावर राहिली किंवा नष्ट झाली. प्राथमिक शिक्षकांचे प्रशिक्षण काही प्रमाणात का होईना विद्यापीठाच्या अधिकारक्षेत्रात सुरू झाल्यास कोठारी आयोगाने पंधरा वर्षांपूर्वी केलेली शिफारस उशीराने का होईना अंमलात येवू शकेल. प्रशिक्षणाचे सर्व उपक्रम विद्यापीठाच्या अधिकारक्षेत्रात महाविद्यालयीन पातळीवर आणावेत व राज्य शिक्षक प्रशिक्षण मंडळाने प्रशिक्षणाच्या ध्येयधोरणावर नियंत्रण ठेवावे, ही सूचना केवळ दप्तरीच राहिली आहे. अध्यापक महाविद्यालये आवश्यकतेपेक्षा अधिक संख्येने आहेत म्हणून ती बंद न करता त्यांचे सर्वसमावेशक महाविद्यालयात रुपांतर करता येईल. यासाठी शासन आणि विद्यापीठे यांनी सहकार्याने पावले उचलली पाहिजेत. अनेक विद्यापीठाचे अभ्यासक्रम गेली दहा वर्षे बदलेले नाहीत. वस्तुतः हा काळ संक्रमणाचा होता. १९७२-७३ मध्ये इयत्ता आठवीत नवीन

अभ्यासक्रम सुरू झाला. १९७५-७७ मध्ये ११ व १२ वी मध्ये तो प्रथम शिकविला गेला इयत्ता ११ वी व १२ वी च्या कनिष्ठ अधिव्याख्यात्यांना बी. ॲड. पदवी घेणे आवश्यक ठरविले गेले. त्यांच्या मनात असंतोष निर्माण झाला आहे. त्यांना दिले जाणारे प्रशिक्षण माध्यमिक पातळीवरील असल्याकारणाने पदवीधर मुख्याध्यापक माध्यमिक शिक्षक आणि कनिष्ठ महाविद्यालयातील अधिव्याख्याते यांच्या गरजा लक्षात घेऊन त्यांना उपयुक्त असे कोही वैकल्पिक अभ्यासक्रम विद्यापीठांनी व राज्य प्रशिक्षणमंडळांनी एकत्र येवून तयार केले पाहिजे. अन्यथा शिक्षणक्षेत्रातील ही जातीव्यवस्था समाजजीवनातील जातिव्यवस्थेप्रमाणे कालबाह्य ठरली तरी नष्ट होणार नाही.अध्यापक महाविद्यालयांतील अधिव्याख्यात्यानाही सेवांतर्गत प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. कृतिसत्रे, परिसंवाद, व्याख्याने अशा विविध प्रकारांनी हे सेवांतर्गत प्रशिक्षण देता येईल.

महाराष्ट्र शासनाने १९६५-६६ साली राज्यातील प्रशिक्षणाचा अभ्यास करून पुनर्रचना करण्यासाठी एक समिती नेमली. या समितीच्या अनेक शिफारसी स्वीकारुन शासनाने प्रशिक्षणात सुधारणा घडवून आणल्या. त्यानंतरच्या काळात शिक्षक-प्रशिक्षण मंडळान विविध उपक्रम हाती घेतले. पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक शिक्षकांसाठी सुधारित अभ्यासक्रम नुकताच तयार केला. माध्यमिक शाळात नवीन अभ्यासक्रम गेली दहा वर्षे शिकवला गेला. पुढील वर्षी त्यातही बदल होत आहे. परतु शिक्षक प्रशिक्षण तुलनात्मक दृष्टचा बदलले नाही, महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक आणि माध्यमिक प्रशिक्षणाच्या काही अडीअडचणीची चर्चा आकडेवारी देवून शक्यतो वस्तुस्थितीचे भान राखून करण्याचा हा प्रयत्न केला आहे. या सर्व अडीअडचणींचा अधिक सखोल अभ्यास करून विसाव्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकांसाठी प्रशिक्षणाची दिशा ठरविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने एक अभ्यासगट नेमण्याचा गरज स्वयंस्पष्ट आहे.

□

शिक्षण आणि संस्कार

यदुनाथ थत्ते

शिक्षण म्हणजे संस्कार होय. संस्कारामुळे जीवनाला नवे प्रयोजन प्राप्त होत असते. कृतीला विचारांचा आणि भावनांचा परीस स्पर्श घडत असतो. संस्कारक्षम शिक्षणातून माणसातील माणूसपण जागे ठेवले जाते श्री. यदुनाथ थत्ते यांनी अत्यंत मर्मभेदी, सारग्राही व प्रबोधनात्मक शब्दांमध्ये ' शिक्षण आणि संस्कार ' याविषयी येथे विचार प्रकट केले आहेत.

जीवनाच्या तीन पातळ्या असतात.

प्रकृती-विकृती–संस्कृती.

मानवाची प्रकृतिबद्धतेतून बऱ्याच अंशी सुटका झाल्याने त्याला स्वातंत्र्य मिळाले.

स्वातंत्र्य हे एक साहसच असते. आणि साहस म्हटले की, त्यात धोकाही गृहीत धरावा लागतो

प्रकृतिबद्धतेतून सुटका करून घेण्यात मानवी बुद्धीचा वाटा मोठाच आहे.

माणसाला ज्ञानसंचयाची व ज्ञानाचा विनियोग करण्याची संधी आहे.

स्थळकाळातीत ज्ञान संचय तो करू शकतो आणि त्यामुळे त्याला अवघ्या जगाचा वारसा मिळालेला आहे.

आधुनिक विज्ञानाने संपर्काची,अभिसरणाची आणि समनुयोगाची प्रचंड शक्तिशाली साधने मानवाला उपलब्ध करून दिली आहेत.

अवघ्या जगाच्या सुखसमृद्धीचा व संपन्नतेचा वाटा त्याला कळत न कळत मिळतच असतो.

आधुनिक विज्ञानामुळे त्याची भविष्यदर्शी प्रतिभा जागी झाल्याने तो नियोजन करू शकतो आणि संभाव्यता शास्त्र (प्रॉबॅब्लिटी) अवगत झाल्याने फसणाऱ्या गोष्टीचाही अंदाज त्याला करता येतो.

आधुनिक विज्ञानाने जग आकसले असून माणूस-माणसाच्या जवळ आला आहे काळाला कवेत घेण्याइतकी प्रचंड गती माणसाला संपादन करता आली आहे.

राजा शुद्धोधनाने सिद्धार्थाच्या संदर्भात जो अपयशी प्रयोग केला तो कोणाची कितीही इच्छा असली तरी आता शक्य नाही.

वर्णाश्रमाची विभागणी कालबाह्य ठरली असून आता आमरण विद्यार्जन अपरिहार्य बनले आहे.

' क्षणत्यागे कुतो विद्या ' हे सुभाषित जुन्या काळात कितपत खरे असेल ते असो, पण आताचा काळ ते अक्षरशः खरे व्हावे असा विलक्षण काळ आहे.

अशा स्थितीत आजच्या पठडीतून शिक्षणाचा विचार करणे निरर्थक आहे.

शिक्षण हे नळाचे पाणी नव्हे की ते अमूक वाजताच येईल आणि अमूक वाजताच थांबेल. औपचारिक विषय-शिक्षणाचा वेळ सोयीसाठी ठरविता आला तरी तोच शिक्षणाचा काळ म्हणणे म्हणजे आपले वास्तवाचे अवधान सुटण्याची कबुली देण्यासारखेच आहे.

शिक्षण ही निरंतर सहजपणे चालणारी प्रक्रिया असून औपचारिक शिक्षण त्या प्रक्रियेला साह्यभूतही होऊ शकते किंवा मारकही ठरू शकते.

शिक्षणाबाबत काही महत्त्वाच्या पैलूंचा विचार करणे आवश्यक आहे. अध्ययन न करणारा अध्यापन करू शकत नाही आणि अध्ययन करणारा अध्यापनाचा व्यवसाय करीत असो नसो अध्यापन करीतच असतो

यामुळे अध्यापक विद्यार्थी यांच्यातील जुनी वाटणी आता हळूहळू निरर्थक ठरत जाणार असून अध्यापक हा विद्यार्थी असलाच पाहिजे आणि विद्यार्थी हा न कळत अध्यापकाचे कार्य करीत असतो याची जाणीव निर्माण झाली पाहिजे.

अध्यापक हा विद्यार्थ्यांचा अध्यापक असतो, विषय हे विद्यार्थ्याशी संपर्क करण्याचे एक केवळ निमित्त असते, याचे भान शिक्षण खात्याला असले पाहिजे. त्यामुळे अध्यापकाची मुख्य बांधिलकी विद्यार्थ्याशी असावी, पाठ्यक्रमाशी बांधिलकी ही गौण बांधिलकी होय.

अध्यापक शिकवतो म्हणजे केवळ स्मरणशक्तीची कवायत करून घेत नसून तो त्या-त्या विषयाच्या अनुरोधाने मूल्य विवेकाचे भानच निर्माण करीत असतो.

मूल्याचे भान नेहमी योग्य संदर्भ निर्माण करण्यातूनच होते. अध्यापकाकडून ही अपेक्षा असते.

शिकवण्याला दोन पक्ष असतात. एक शिकवतो असा दावा करणारा आणि दुसरा शिकण्यासाठी येतो म्हणणारा. पण घोडचाला पाण्याजवळ नेले तरी पिणे त्याच्या

मर्जीवरच अवलंबून राहते. अध्यापन म्हणजे अवधान निर्माण करणे किंबहुना ग्रहणशीलतेतील अंतराय दूर करणे वा जाणिवेचा पक्षी मुक्त करणे.

शिक्षणाला वाचिकतेचा शाप आपण दिलेला आहे. आणि ते केवळ स्मृतिप्रधान बनले आहे.

मूल्यांची जाणीव निर्माण न होताच मूल्यमापनाचे सोहोळे पार पडत आहेत आणि गुणवत्तेच्या नावाखाली ते राजरोसपणे खपवले जात आहेत. शिक्षण आणि संस्कार याचा विचार आज पाठांत्तराच्या संदर्भातच केला जातो. कारण, मूल्यमापन कागदावर उत्तरी काय उतरवले त्यावरून केले जाते. किंबहुना, कागदाधारित मूल्यमापनावर आपला एवढा अतिरिक्त भर आहे की व्यक्तिनिरपेक्षपणे हे केले जाते, हे दाखवण्याची स्पर्धा चालते आणि आकस्मित असे निर्णय अनेकदा बाहेर पडतात !

शिक्षणातील नवनिर्माण क्षमता या सर्व प्रक्रियेत अस्ताला जाते. आणि स्मरणशक्तीने दगा दिला किंवा अकस्मिक नवा प्रश्न समोर आला की तथाकथित शिकल्यासवरल्यांचे सारे अवसानच गळून जाते.

पाठांतराला संस्कार समजण्याचा एक प्रकार आपल्याकडे रूढ झालेला आहे.

शब्दाला अनेक आयाम असतात, त्यापैकी ध्वनीचा एकच आयाम ध्यानी घेऊन सुसंस्कृतीपणाचे प्रमाणपत्र इथे बिनदिक्कत दिले जाते ! शब्द म्हणजे एक संचित असते आणि त्याच्या अर्थात संस्कृतीची सारगर्भिता असते. हा अर्थ जीवनातील विविध घटना व प्रक्रियांच्याद्वारा सगुण-साकार झालेला दिसतो तेव्हा त्यातून संस्कारांचे माप कळत असते.

संस्कार हे पाठांतरापलीकडील क्षेत्र आहे याचे भान राखले व सक्रिय जाणिवेच्या आधारे त्याचे मोजमाप काढले तर आजचे बरेचसे संस्कार आणि सुसंस्कृतपण हे वरपांगी दिखाऊ आणि भ्रामक आहे हे ध्यानी येईल.

संस्काराच्या नावाखाली समाजात मग ढोंग बोकाळते. ढोंगा विरुद्ध दंड थोपटून उभे राहाणे हे तारूण्याचे एक गमक समजले जाते. ज्या समाजात ढोंग उघडपणे मिरवू शंकते तो समाज आपले यौवनच गमावून बसतो.

भारतीय संविधानात चार मूलभूत मूल्यांचा प्रारंभीच निर्देश करण्यात आला आहे.

न्याय, स्वातंत्र्य, समता आणि आपलेपणा ही ती चार मूल्ये होत. त्यात न्याय हे मूल्य अग्रभागी आहे. विशिष्ट भारतीय संदर्भामुळे हे अग्रस्थान त्याला मिळालेले आहे.

संस्कृती याचा अर्थ तरल सवेदना टिपण्याचे सामर्थ्य,परंतु आपण असे पाहातो की, चांगल्या शब्दांचीही माणसांना नशा चढते आणि नशेचा गुण असा असतो की, तिच्यामुळे माणसाला वास्तवाचे विस्मरण होते. माणसांची विचारशक्ती बधिर होऊन जाते.

'सर्वे ऽ सुखिनः सन्तु,' 'सहनाववतु, सहनौभुनक्तु' यासारखे मंत्र ज्यांच्या अंतःस्फुरणातून अस्तित्वात आले ते थोर प्रतिभावान ऋषी होते यात शंकाच नाही अद्वैत आणि आत्मौपम्याचा विचार सांगणारेही महान विचारवंत होते.एक स्वप्न त्यांनी समाजाला दिले. अपेक्षा अशी की स्वप्न आणि वास्तव यांतील अंतराने माणसांनी नवनिर्माण कारी बेचैनी अनुभवावी. पण संस्काराच्या नावाखाली आम्हीं अशा सुभाषितांचा जप आरंभला वास्तव विसरण्यासाठी.

वास्तविक संस्कारांचे गमक जीवनाला नवे प्रयोजन निर्माण होणे हे असते, पण संस्काराच्या नावाखाली आम्ही वास्तवाचे विस्मरण घडवणाऱ्या यंत्रांचा जप करण्यालाच लोकांना म्हणजे समाजातल्या भाग्यवान लोकांना शिकवले. या आत्मतृप्त मंडळीनी दुर्भाग्य वाटचाला आलेल्या लोकांना कर्मदिपाकाच्या बेडयांनी जखडून त्यांची पुरुषार्थाची प्रेरणाच नष्ट केली.

संस्कारांचे प्रयोजन तरल संवेदना टिपण्याला माणसाला अधिकाधिक पात्र बनवणे हे आहे. ही संवेदनशीलता नवनिर्माणकारी होते तेव्हाच ते संस्कार निखालस ठरतात. परंतु पाठांतरप्रधान शिक्षण रचनेत परीक्षेत प्रश्नांची उत्तरे लिहिता येणे, हे संस्काराचे गमक समजण्यात येते याचा परिणाम असा होतो की, शिक्षण शिक्षण संस्थेच्या भिंतीतच घुटमळत रहाते.

शाळेच्या सर्व पाठ्यपुस्तकांच्या प्रारंभी एका प्रतिज्ञेचा समावेश करण्यात आला आहे. 'भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत...' इ– इ–

खरोखर या प्रतिज्ञेचा काही संस्कार विद्यार्थ्यावर व्हावा अशी अपेक्षा करण्यात काही गैर आहे काय ? (प्रतिज्ञेच्या शब्दांचा संस्कार विद्यार्थ्यांच्या, निदान अध्यापकांच्या मनावर झाला असता तर आपली गावे इतकी– ओंगळवाणी दिसली असती का ? आपल्या नद्यांचे घाट आणि मंदिराची आवारे इतकी घाणेरडी दिसली असती का ? आणि आपले डोंगर एवढे उघडेबोडके दिसले असते का ?)

सारे भारतीय माझे बांधव आहेत, असे घोकणाऱ्या शिक्षकांनीं गावाचे पाणवठे सर्वांना खुले व्हावे या दृष्टीने काही धडपड केली नसती का? दारिद्र्य रेषेखाली जगणाऱ्या चाळीस टक्के लोकांचा विचार करून इथल्या प्रत्येक धडधाकट माणसाचा रोजगाराचा हक्क मान्य व्हावा म्हणून शाळेच्या गणवेशाचे कापड हातसुताचे व हातविणीचे असावे अशी खटपट आम्ही केली नसती का ? निदान त्या दृष्टीने विचार करायला आमचे अध्यापक आणि विद्यार्थी शिकले नसते काय ?

भारतीय संविधानाच्या प्रारंभीच, हा देश एकदम,बलदंड आणि संपन्न करण्यासाठी त्याची न्याय, स्वातंत्र्य, समता आणि आपलेपणाच्या आधारावर पुनर्रचना केली पाहिजे, असा स्पष्ट निर्देश करण्यात आला आहे. या शब्दांचा संस्कार आमच्या माध्यमिक,

उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन अध्यापक व विद्यार्थ्यांवर झाला असता तर बारा महिने आपल्या घरी काम करणाऱ्या मोलकरणीला तेरा महिन्यांचा पगार द्यावा म्हणून तथाकथित संस्कारसंपन्न विमा महामंडळाच्या वा बँकेच्या सेवकांच्या कोणा मुलाने हट्ट केल्याचे कधी तरी आपल्या कानावर पडले असते की नाही ? आणि वर्षातील एकशेऐंशी दिवस काम आणि एकशेपंचाऐंशी दिवस सुट्टी उपभोगणाऱ्या अध्यापकांची आपल्या घरच्या मोलकरणींला आठवड्यातून एक दिवस हक्काची सुट्टी, वर्षाकाठी १५ दिवस आजारपणाची व १५ दिवस हक्काची रजा मिळावी यासाठी खटपट केल्याची पाच पंचवीस उदाहरणे तरी आपल्याला दिसली असती की नाही ? मग शिक्षणाने संस्कार होतो म्हणजे काय ?

ही काही ठोबळ अशी उदाहरणे झाली. जसेजसे अधिक उच्च शिक्षण मिळेल तसतसे अधिक सूक्ष्म गोष्टीचेही ठसे उमठावे अशी अपेक्षा करण्यात काहीं गैर वाटू नये. पण तसेही होताना दिसत नाही उलट, प्रत्येक उच्च शिक्षित अधिकच स्वार्थलंपट झाल्याचे आपल्याला दिसून येते.

प्रत्येक विशेषज्ञ शायलॉक इतक्याच पाषाण हृदयीपणे पौंडभर मांस कर्वतून मागायला उद्युक्त झालेला दिसतो. दुसऱ्याची अडचण ही त्याच्या मदतीला धावून जाण्यासाठी दिलेली हाक आहे असे ही मंडळी मानतात की, अडचणीतल्या माणसांना लुटण्याची ती सुवर्णसंधी आहे असे मानतात हे तपासून पाहाण्यासारखे आहे.

यातूनच मग एकादा अपवादभूत डॉ. अनिल अवचट जेव्हा ' डॉक्टर जगवतात की मारतात ? ' असा रोकठोक सवाल करतो तेव्हा निदान वैद्यक व्यावसायिकांच्या संघटनेने त्यांचा तो अपराध समजू नये, ही अपेक्षा गैर म्हणता येईल काय ? पण दिसते ते उलटेच. सुसंस्कृतपणाचा ठेका आपल्याकडे असल्याचा तोरा मिरवणारांवरही जर एवढेच संस्कार होत असतील तर त्याचा गंभीरपणे विचारच केला पाहिजे.

आजचे औपचारिक शिक्षण हे पोपटी शिक्षण आहे. पोपटासारखे पटापटा शब्द आणि प्रतिशब्द उच्चारायला ते शिकवते. हृदयाला शब्दांतील संचित अर्थवत्तेचा स्पर्श व्हावा अशी काही खटपट होताना आपल्याला दिसली असती.

संस्कारांनी अभिमंत्रित झालेले मन आपल्या तात्कालिक स्वार्थाला फाटा द्यायला तयार झाल्याचे आपल्याला दिसले असते,पण तशी उदाहरणे नियमाला बळकटी आणण्या इतकी अपवाद भूतच आढळतात, ही एक वस्तुस्थिती आहे.

ही परिस्थिती कायम राखण्यातच आमच्या अध्यापक वर्गाचे व शिक्षण संस्थांचे हितसंबंध गुंतलेले आहेत आणि त्यामुळे नर्सरी तालीम पासून तो कार्यानुभव व समाजसेवेपर्यंतच्या प्रयत्नांचे हसे व्हावे म्हणून दररोज शैक्षणिक नोकरशाहीची खटपट चाललेली आपल्याला निश्चितच दिसली नसती.

शिक्षणातून संस्कार घडावे अशी जर खरोखर अपेक्षा असती तर शिक्षणाची मानगूट शासनाच्या हातून सुटावी या दृष्टीने कुठे काही प्रयत्न होतो आहे असे आपल्याला दिसले असते. निदान आपल्याला प्राथमिक, माध्यमिक व उच्च अध्यापन महाविद्यालयांतून या संबंधी गंभीर विचार विनिमय व प्रयोग होत आहेत असे दिसले असते.

शिक्षणाला जेव्हा संस्कारांची जोड मिळते तेव्हा त्या शिक्षणाला प्रबोधनाची कळा चढते. प्रबोधन नवनिर्माणाची प्रेरणा देते तेव्हा ते प्रबोधन सच्चे असते आणि नवनिर्माण करतांना हितसंबंधी मंडळींचा विरोध सुरू होतो तेव्हा संघर्ष प्रसंगी जे कच खात नाहीत त्यांचे नवनिर्माण हे निखालस असते. शिक्षणाला संस्काराची कळा यायची तर या तीनही आयामांचा शिक्षणात अंतर्भाव असला पाहिजे. प्रबोधन रचना–संघर्ष यांना कवेत घेण्याची हिंमत असणारे शिक्षणच संस्काराशी नाते सांगू शकेल.

प्रबोधन–रचना–संघर्ष ही विभागणीही सोयीसाठी केलेली विभागणी आहे. संघर्षाची परिणती प्रबोधनात झाली पाहिजे आणि रचनेतूनही प्रबोधन साध्य झाले पाहिजे.

संस्कार याचा अगदी सरळ, साधा, सोपा अर्थ असा की कृतीला विचारांचा आणि भावनांचा परीस स्पर्श घडविणे. ज्या कृतीना विचार भावना यांचा परीसस्पर्श होत नाही त्यांना यंत्राची कळा येते.

माणसाला यंत्राची व पशूची कळा येते तेव्हा जीवन हे संस्कारहीन बनते.

शिक्षणाने माणसाला यंत्राची वा पशूची कळा येणार नाही असे वातावरण निर्माण केले पाहिजे. यालाच लोकशाही किंवा संस्कारी शिक्षण असे म्हणता येईल.

यंत्राला तेल पाणी दिले, त्याची देखभाल केली की पुरते. बैलाला चारा दाणा दिला की भागते. त्या यंत्राला कोणी सल्ला विचारत नाही की बैलाशी कुठे काय पेरावे याची चर्चा करीत नाही.

संस्कारी शिक्षणाने माणसाला यंत्राची वा पशूची कळा येणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. ही दक्षता न घेतली तर यंत्राचा अचूकपणा आणि पशूची सचोटी नसलेले संस्कारहीन समूह अस्तित्वात येतील आणि जगभरच्या हजारो वर्षाच्या अनुभवाचे जे सार वारसा हक्काचे आपल्याला मिळण्यासारखे आहे त्याला आपण पारखे होऊ.

□

शिक्षणातील धर्मशिक्षण

प्राचार्य चंद्रकुमार डांगे

ज्यामुळे माणुसकीचे मूल्य मनांत निर्माण होईल, तेव्हाच धर्मशिक्षण घडले असे म्हणता येईल. कारण माणुसकी हेच सर्व धर्माचे अधिष्ठान आहे. वस्तुनिष्ठ दृष्टीने खराखुरा सर्वधर्मसमभाव मनात रुजविला पाहिजे. प्राचार्य चंद्रकुमार डांगे यांनी शिक्षणातील धर्मशिक्षणाचे स्थान चिकित्सक बुद्धीने येथे पटवून दिले आहे.

इंग्रजांनी हिंदुस्तान जिकल्यानंतर धोरण विषयक अनेक निवेदने प्रकट केली. शिक्षणाचा प्रसार करताना एक महत्त्वाचे आश्वासन असे दिले होते की, ' आम्ही तुमच्या धार्मिक गोष्टीत ढवळाढवळ करणार नाही. ' यालाच धार्मिक तटस्था (Religious neutrality) असे म्हणतात. असे असले तरी ख्रिस्ती मिशनऱ्यांनी शिक्षणाबरोबर धर्म प्रचारही केला हे सत्य आहे. आजही मिशनऱ्यांनी चालविलेल्या शाळांतून बायबलमधील प्रार्थना म्हटली जाते. या प्रार्थनेला विद्यार्थ्यांनी हजर राहावे याकडे लक्ष दिले जाते. सक्ती केली जाते याला प्रत्यक्ष पुरावा मिळणे कठीण. पण बाल मनावर या प्रार्थनेचा परिणाम होतोच. परमेश्वराचे अस्तित्व बालमनावर खोदले जाते. मला आठवते की, आम्हीही लहानपणी ' प्रियकर हिंदुस्तान ' ही प्रार्थना म्हणत असू. ' भो पंचम जॉर्ज ' ही आम्ही म्हणायचो. पण एक खरे की कधी ख्रिस्ती व्हावेसे वाटले नाही. याला कारण शाळेतले. घरचे आणि सभोवतालचे वातावरण वेगळे होते. तसे पाहिले तर ' प्रार्थना ' ही मोठी गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. त्यात एकतानतेला मुलभूत महत्त्व आहे. ख्रिस्ती लोक ज्या तऱ्हेने प्रार्थना करतात तसे हिंदु, मुसलमान, जैन आदि लोक करत नाहीत हा अनुभव आहे. फरक केवळ पद्धतीचा नाही तर वातावरणाचा, वृत्तीचा आहे. खास कोणी हिंदु धर्माचे शिक्षण आम्हाला दिले असे नाही.

स्वातंत्र्यानंतर

स्वातंत्र्यानंतर एक जाणीव सर्वांना होती की, भारतात धर्म भावना फार खोलवर रुजली आहे. ती सहजासहजी मनातून उपटून टाकता येणार नाही. धार्मिक भांडणे आणि

असहिष्णुता यांचे चटके भारताला तीव्र बसले होते सामाजिक अस्वस्थताही सर्वांनी अनुभवली होती. म्हणून आपण 'सेक्यूलर' राज्याची घोषणा केली. सेक्यूलर या शब्दाचे 'धर्म-निरपेक्ष' हे भाषांतर चुकीचे आहे. 'धर्मातीत' हे खरे त्याचे भाषांतर. म्हणून वैयक्तिक धर्माचरणाला परवानगी देऊन सामाजिक जीवनात धर्मातीत वृत्तीने राहावे हे सूत्र मान्य करण्यात आले. म्हणजे शाळेत एखाद्या विशिष्ट धर्माचे शिक्षण न देता सर्वधर्म समभाव ठेवावा असे ठरले.

त्या प्रमाणे पाठ्यपुस्तकात बदल करण्यात आले. सर्वधर्मसमभावाचे धडे घालण्यात आले. सर्व धर्मांतल्या प्रार्थना एक करून पुस्तक तयार करण्यात आले. पण तरी देखील धर्म शिक्षणाचा प्रश्न मिटला असे घडले नाही. मानवतेचा धर्म शिकवावा असे सर्वांनी मान्य केले. तरी जे सामाजिक स्वास्थ्य अपेक्षित होते ते निर्माण होऊ शकले नाही. आजही धार्मिक असंतोषाचे वणवे पेटतात आणि माणसे होरपळून निघतात. हे कसे टाळायचे हा प्रश्न जटिल झाला आहे.

विज्ञान आणि धर्म

धर्म कधीही एकटा येत नाही. त्याबरोबर कर्मकांड, विधिनिषेध, उपासना तत्त्वज्ञान अशा अनेक गोष्टी येतात. या आनुषंगिक गोष्टींचे रान इतके माजते की, मूळची धर्मप्रेरणा विकृत होऊन उरते. विज्ञानाचे तसे नसते. विज्ञान आपला एखादा सिद्धांत घेऊन येते. त्यात कार्यकारण भाव असतो. त्याच्यापलिकडे विज्ञानाबरोबर काहीही येत नाही. समजा, पहिला सिद्धांत चूक ठरला तर नवा येतो तो कार्य आणि कारण यांच्यातून निर्माण झालेला. म्हणून विज्ञानाचा अर्थ जगभर एकच. तसे धर्माचे नसते. व्यक्तीगणिक वेगळा अर्थ, वेगळे रूप धर्माला मिळू शकते. म्हणून तर एकाच धर्माचे अनेक भाष्यकार होतात. शाळेत विज्ञान शिकवले जात असूनही त्याचा वापर धर्माचे तसे विश्लेषण करण्यास शिकवले जात नाही. म्हणूनच विज्ञान शिकूनही माणसे अंधःश्रद्ध, भोळसट, परंपरावादी, कट्टर अशी असू शकतात. तेव्हा या युगात धर्म शिक्षण द्यायचे म्हणजे विज्ञानाच्या पद्धतीने त्याचे रूप स्पष्ट करायचे हे होय. गीता शिकवायची, बायबल शिकवायचे, कुराण शिकवायचे का धम्मपद शिकवायचे का या साऱ्यांना एकत्र करून त्यांचे सार शिकवायचे हा खरा प्रश्न नाही.

माणुसकी : सर्व धर्माचे अधिष्ठान

नागरीक शास्त्र, इतिहास, भूगोल, राज्य व्यवस्था या सारख्या विषयातून आपण एक नवा धर्मच शिकवीत असतो. पण याकडे कोणीही लक्ष देत नाही. म्हणून उत्तम नागरीक शास्त्र शिकूनही माणसे असहिष्णू, क्रूर, पाशवी वर्तन करताना दिसतात.संतांचे, प्रेषितांचे, धर्म प्रवर्तकांचे उतारे पाठ्यपुस्तकात घालून धर्म शिक्षण होईल ही भाबडी कल्पना आता सोडून द्यायला हवी. 'सेक्यूलर' या शब्दाचा अर्थ धर्मातीत असा

पत्करावा लागतो तो यासाठी. सर्वधर्मसमभाव याचा अर्थ आपण विश्लेषण करून मानवी जीवनाचे स्वरूप सांगतो की नाही हा आहे. असे केले तरच मानवतेचे मूल्य मनात निर्माण होऊ शकेल. जर माणुसकी हे सर्व धर्माचे मुलभूत अधिष्ठान आहे तर मग भांडणे, मतभेद व्हायला नकोत. पण ही चिकित्सक, विश्लेषणात्मक बुद्धी आपण वाढीला लावीत नाही हो खरी अडचण आहे.

सर्वधर्मसमभाव

हे पाश्चात्य राष्ट्रात अनेक वर्षांच्या अभ्यासाने घडले. म्हणून अमेरिकेत, युरोपात, रशियात, जपानमध्ये विज्ञान आणि धर्म समांतर राहू शकतात. उलट, इराण, पाकिस्तान, अरबदेश, श्रीलंका, भारत अशा देशातून धर्मविषयक गोंधळ सुरूच आहे. त्याचे पडसाद शाळांत उमटतात. आपण आधुनिक यंत्रे स्वीकारली पण मने मात्र मध्ययुगीनच ठेवली. शिक्षकच जर अशा मनोवृत्तीचे असतील तर धर्म शिक्षणाचे रुपही चुकीचे राहणार. केवळ पाठ्यपुस्तके सुधारून हे घडणार नाही. कार्य आणि कारण हा न्याय जीवनाच्या सर्व क्षेत्रात लावण्यास जे शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांना शिकवितात ते धर्म शिक्षणच करीत असतात हे लक्षात ठेवले पाहिजे.

आपल्या देशाची परिस्थिती इतकी गुंतागुंतीची, चमत्कारीक आणि नाजुक आहे की, धर्माभिमान आणि भाषाभिमान विकासाला मारक ठरू शकतात. अंधः श्रद्धा, परंपरा, जाती, दारिद्र्य मागासलेपणा यांचे समूळ उच्चाटन करायचे असेल तर शिक्षकांनी तर्क, कार्य–कारण भाव आणि विश्लेषण यांची शक्ती प्रत्येक विद्यार्थ्यांला मिळवून दिली पाहिजे. मग तुम्ही धर्म शिक्षण जुन्या अर्थाने देता किंवा नाही हा प्रश्न उरणार न ही. आधुनिक जगात ही विश्लेषणात्मक, वस्तुनिष्ठ दृष्टी हीच तारक आहे. अवलोकन, विश्लेषण, कार्यकारण भाव सर्व विषयांच्या साहाय्याने सहज शिकवता येईल. तेच आजचे धर्मशिक्षण होय तोच खरा सर्वधर्मसमभाव.

□

नैतिक शिक्षण

प्रा. गो. के. भानगावकर

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण होत असताना योग्य त्या अभिवृत्ती निर्माण होणे आवश्यक असते. व्यक्तिमत्त्वाच्या संपूर्ण विकासासाठी नैतिक शिक्षण कसे अपरिहार्य असते, याचा विश्लेषणात्मक मागोवा घेणारे प्रा. गो के. भानगावकर यांचे विचार चिंतनीय आहेत.

मानव व इतर प्राणी यातील महत्त्वाचा फरक हा की, मानव विचार करू शकतो. इतर प्राण्यांप्रमाणे सहजप्रवृत्तींच्या पातळीवर माणूस जगत नाही. नैसर्गिक प्रतिक्रियांपेक्षा वेगळ्या प्रतिक्रिया तो देतो स्वतःची नैतिक पातळी राखण्यासाठी, तसेच समाजहितासाठी तो स्वतःचे वर्तन ठरवू शकतो. सकृतदर्शनी जे करावेसे वाटते ते अयोग्य आहे असे वाटल्यास इष्ट तो बदल आपल्या वर्तनात माणूस घडवून आणू शकतो. योग्यायोग्यतेचा विवेक करता येणे व नैसर्गिक प्रतिक्रियात्मक वर्तन इतरांना (तसेच स्वतःसही) अहितकारक ठरत असल्यास आपले वैयक्तिक सुख दृष्टीआड करून पथ्यकर असा बदल स्वतःच्या वर्तनात करण्याचे सामर्थ्य येणे हा नैतिक शिक्षणाचा गाभा आहे. रूढ भाषेत बोलायचे झाल्यास नैतिक शिक्षण हे संस्कार देणारे शिक्षण आहे. शीलसंवर्धनाचे शिक्षण आहे. व्यक्ती काय जाणते, तिच्यात कोणती कौशल्ये आहेत यापेक्षा ती कशी घडते आहे. तिचा दृष्टिकोन व अभिवृत्ती कोणत्या आहेत याच्याशी नैतिक शिक्षणाचा अधिक संबंध आहे. (Education for becoming rethar than knowing or doing.) व्यक्तिमत्त्व घडविणारे हे शिक्षण आहे. नैतिक शिक्षण हे व्यक्तीची नैतिक पातळी राखण्यासाठी जितके उपयुक्त आहे तितकेच ते व्यक्तीस समाजाचा उत्तम घटक बनविण्यासाठी आवश्यक आहे.

यासाठी नैतिक शिक्षणाची काही वैशिष्ट्ये प्रथम लक्षात घ्यावयास हवीत.

भावपरिपोष : अभिवृत्तींची निर्मिती

मुलाच्या भावनेस आवाहन करून नैतिक शिक्षण योग्य अभिवृत्तींची निर्मिती करते. संवेदनक्षमतेचा उपयोग करून घेते. समतेचे मूल्य मुलाच्या मनात रुजवितांना महात्मा

फुले यांनी आपला पाण्याचा हौद हरिजनांना खुला केला या धडयाचा उपयोग करता येतो. सुरवातीस हे आवाहन मुलांच्या भावनेस असते. हरिजनांवरील अन्यायाने मूल व्यथित होते अस्पृश्येबद्दल त्याच्या मनात घृणा निर्माण होते. समतेचे मूल्य ते अंगिकारते. मूल्याचा अंगिकार करताना व्यक्तीची वैचारिक बैठक तयार होते. समता ही न्याय्य आहे. म्हणून व्यक्ती स्वीकारते. अभिवृत्तींच्या निर्मितीस भावनिक व वैचारिक दोन्ही पैलू असतात.

अभिवृत्तींचा वर्तनातून येणारा प्रत्यय

रुजलेल्या नैतिक मूल्याचा प्रत्यय विद्यार्थ्यांच्या वर्तनातून येतो. हे वर्तन शाळेमधील असते तसेच ते शाळेबाहेरीलही असते. कित्येकदा शाळा सोडून अनेक वर्षे झाल्यावरही एकाद्या प्रसंगी जीवनात त्याचा प्रत्यय येतो. एकाद्या चांगल्या शाळेचा माजी विद्यार्थी मुख्याध्यापकांना भेटतो. त्यावेळी जीवनातील काही कसोटीचे क्षण तो मुख्याध्यापकांना सांगतो मोहाला बळी न पडण्याचे सामर्थ्य त्याला आले याचे श्रेय तो त्याच्या शालेय जीवनातील एकाद्या प्रसंगाला, व्यक्तीला वा उपक्रमाला देतो. प्रामाणिकपणाचे मूल्य रुजले असल्यास त्याचा प्रत्यय शाळेतही येतो. एकादी शाळा अशी असते की, कोणाचीही हरविलेली वस्तू ज्याची त्याला परत मिळते.

नैतिक शिक्षण हे धार्मिक शिक्षणाहून वेगळे आहे

धार्मिक शिक्षणातून नीतिमूल्ये रुजविण्याचा प्रयत्न काही ठिकाणी होतो. परंतु नैतिक शिक्षण हे धार्मिक शिक्षण नव्हे हे लक्षात घेतले पाहिजे. अनेक धर्माचे लोक भारतात आहेत. त्यामुळे एकाद्या विविक्षित धर्मातून नैतिक शिक्षण देणे हे व्यवहार्य व इष्ट नाही. परंतु विविध धर्मात असणारी समान व सर्वमान्य नीतिमूल्ये देण्यास हरकत नाही. अशी मूल्ये कथा, प्रसंग व व्यक्तीरेखा धार्मिक ग्रंथात असल्यास त्यांचा उपयोग करण्यास हरकत नाही. याबाबत एकच काळजी घ्यावयास हवी की, अशा कथा व प्रसंग यातून आपण सर्वमान्य नीतिमूल्याचे शिक्षण देत आहोत; विशिष्ट धर्माचे नव्हे. तसेच या कथा व प्रसंग धार्मिक अंधश्रद्धा व पोथीनिष्ठता यापासून मुक्त आहेत.

नैतिक शिक्षणाला सामाजिक-आर्थिक मिती आहे

नैतिक शिक्षण हे व्यक्तीला चांगला सामाजिक घटक बनविण्यास आवश्यक आहे. सामाजिक वातावरणाचा परिणाम कार्यावर होत असतो.भुकेल्या व्यक्तिकडून उच्च नैतिक वर्तनाची अपेक्षा करणे कठीण आहे. सामाजिक विषमता असलेल्या समाजात समतेचे मूल्य शिकवणे अवघड आहे. पण हे मूल्य शिकविण्याची सर्वात जास्त गरज या समाजातील बालकास आहे. प्रामाणिक समाजात प्रामाणिकपणा शिकवणे सुलभ आहे. कोणत्याही समाजात राहणाऱ्या विद्यार्थ्यांस सामाजिक जबाबदारी शिकवणे आवश्यक आहे.

नैतिक शिक्षणावर वातावरणाचा परिणाम होतो

शाळा, घर व समाज या त्रिस्तरीय वातावरणात विद्यार्थी रहात असतो. या

वातावरणाचा परिणाम त्याच्यावर होणे अपरिहार्य आहे. शालेय पुस्तकांतून शिकवली जाणारी मूल्ये व चित्रपट, वृत्तपत्र व घरातील अन्य व्यक्तीच्या वर्तनातून शिकविली जाणारी मूल्ये यांत विरोध असण्याची शक्यता आहे. योग्य मूल्यांपासून विद्यार्थ्यांस दूर खेचणारे वातावरण व योग्य मूल्यांकडे नेणारे शालेय वातावरण यातील द्वंद्वात शालेय वातावरण प्रभावी असणे नैतिक शिक्षणासाठी आवश्यक आहे.

नैतिक शिक्षण धार्मिक वा राजकीय व्यक्ति प्रभावाखाली नसावे

व्यक्तिमत्वविकसनात स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता येणे यास महत्त्व आहे. लोकशाही समाजरचनेत या क्षमतेचे महत्त्व विशेष आहे. स्वतंत्रपणे तर्कसंगत विचार करून सत्यशोधन या प्रक्रियेस प्रणाली वा व्यक्ती यांचा प्रभाव मारक ठरतो. विशिष्ट विचार मूलावर लादणे अयोग्य ठरेल.

प्रत्येक शिक्षक हा नैतिक शिक्षणाचा शिक्षक आहे

इतिहास, गणित या विषयाप्रमाणे नैतिक शिक्षण देणारे विशिष्ट शिक्षक नाहीत. नैतिक मूल्यांचा परिपोष शाळेचे संपूर्ण वातावरण व शिक्षकांचे व्यक्तिमत्त्व यातून होतो. प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे प्रत्येक शिक्षक नैतिक शिक्षण देत असतो.

नैतिक शिक्षणाची संकल्पना व त्याची काही वैशिष्ट्ये यांचा विचार केल्यावर नैतिक शिक्षणाचा आशय अभ्यासक्रम याकडे वळू. याबाबत दोन विचार प्रवाह आहेत. नैतिक शिक्षण हा स्वतंत्र विषय म्हणून ठेवावा, त्यास वेगळे तास असावे, हा एक विचार दुसरा विचार असा की नैतिक शिक्षणाचे वेगळे तास असू नयेत. हा विषय वेगळा न ठेवता अभ्यासक्रमातून तो एकात्म पद्धतीने शिकवावा. नैतिक शिक्षण हा स्वतंत्र विषय ठेवण्यास शालेय व्यवस्थापनाच्या दृष्टीने ते सोयीचे होईल. व निश्चित काय शिकविले गेले यांची कल्पना मुख्याध्यापकास सुलभपणे येईल. मात्र यामुळे आणखी एका विषयाची भर आधीच अनेक विषय असलेल्या अभ्यासक्रमावर पडेल. ठराविक शिक्षक नैतिक शिक्षण देणारे, इतरांचा नैतिक शिक्षणाशी संबंध नाही अशी परिस्थिती उद्भवेल. विविध विषय शिकवित असताना नैतिक शिक्षण सहजपणे देता येईल अशा स्थळांचा वापर होण्यास मर्यादा पडतील. नैतिक शिक्षण देणाऱ्या शिक्षकांशिवाय इतर शिक्षकांच्या क्षमता व प्रज्ञा यांचा उपयोग होणार नाही, मुद्दाम शिकविण्याचा एक विषय असे स्वरूप नैतिक शिक्षणाला आल्यास ते कृत्रिम होईल व त्यामधील सहजता गळून पडेल.

नैतिक मूल्यांची मार्गदर्शक तत्त्वे

नैतिक शिक्षणाची आवश्यकता विविध शिक्षण आयोग व मंडळे यांनी मांडताना कोणती नैतिक मूल्ये विद्यार्थ्यांना शिकवावी याबद्दल सूचना केल्या आहेत. या सर्वांचे परिशिष्ट 'एनसीईआरटी' ने करून Documents on Social, Moral and

फुले यांनी आपला पाण्याचा हौद हरिजनांना खुला केला या धडयाचा उपयोग करता येतो. सुरवातीस हे आवाहन मुलांच्या भावनेस असते. हरिजनांवरील अन्यायाने मूल व्यथित होते अस्पृश्येबद्दल त्याच्या मनात घृणा निर्माण होते. समतेचे मूल्य ते अंगिकारते. मूल्याचा अंगिकार करताना व्यक्तीची वैचारिक बैठक तयार होते. समता ही न्याय्य आहे. म्हणून व्यक्ती स्वीकारते. अभिवृत्तींच्या निर्मितीस भावनिक व वैचारिक दोन्ही पैलू असतात.

अभिवृत्तींचा वर्तनातून येणारा प्रत्यय

रुजलेल्या नैतिक मूल्याचा प्रत्यय विद्यार्थ्यांच्या वर्तनातून येतो. हे वर्तन शाळेमधील असते तसेच ते शाळेबाहेरीलही असते. कित्येकदा शाळा सोडून अनेक वर्षे झाल्यावरही एकाद्या प्रसंगी जीवनात त्याचा प्रत्यय येतो. एकाद्या चांगल्या शाळेचा माजी विद्यार्थी मुख्याध्यापकांना भेटतो. त्यावेळी जीवनातील काही कसोटीचे क्षण तो मुख्याध्यापकांना सांगतो मोहाला बळी न पडण्याचे सामर्थ्य त्याला आले याचे श्रेय तो त्याच्या शालेय जीवनातील एकाद्या प्रसंगाला, व्यक्तीला वा उपक्रमाला देतो. प्रामाणिकपणाचे मूल्य रुजले असल्यास त्याचा प्रत्यय शाळेतही येतो. एकादी शाळा अशी असते की, कोणाचीही हरविलेली वस्तू ज्याची त्याला परत मिळते.

नैतिक शिक्षण हे धार्मिक शिक्षणाहून वेगळे आहे

धार्मिक शिक्षणातून नीतिमूल्ये रुजविण्याचा प्रयत्न काही ठिकाणी होतो. परंतु नैतिक शिक्षण हे धार्मिक शिक्षण नव्हे हे लक्षात घेतले पाहिजे. अनेक धर्माचे लोक भारतात आहेत. त्यामुळे एकाद्या विविक्षित धर्मातून नैतिक शिक्षण देणे हे व्यवहार्य व इष्ट नाही. परंतु विविध धर्मात असणारी समान व सर्वमान्य नीतिमूल्ये देण्यास हरकत नाही. अशी मूल्ये कथा, प्रसंग व व्यक्तीरेखा धार्मिक ग्रंथात असल्यास त्यांचा उपयोग करण्यास हरकत नाही. याबाबत एकच काळजी घ्यावयास हवी की, अशा कथा व प्रसंग यातून आपण सर्वमान्य नीतिमूल्याचे शिक्षण देत आहोत; विशिष्ट धर्माचे नव्हे. तसेच या कथा व प्रसंग धार्मिक अंधश्रद्धा व पोथीनिष्ठता यापासून मुक्त आहेत.

नैतिक शिक्षणाला सामाजिक-आर्थिक मिती आहे

नैतिक शिक्षण हे व्यक्तीला चांगला सामाजिक घटक बनविण्यास आवश्यक आहे. सामाजिक वातावरणाचा परिणाम कार्यावर होत असतो. भुकेल्या व्यक्तिकडून उच्च नैतिक वर्तनाची अपेक्षा करणे कठीण आहे. सामाजिक विषमता असलेल्या समाजात समतेचे मूल्य शिकवणे अवघड आहे. पण हे मूल्य शिकविण्याची सर्वात जास्त गरज या समाजातील बालकास आहे. प्रामाणिक समाजात प्रामाणिकपणा शिकवणे सुलभ आहे. कोणत्याही समाजात राहणाऱ्या विद्यार्थ्यांस सामाजिक जबाबदारी शिकवणे आवश्यक आहे.

नैतिक शिक्षणावर वातावरणाचा परिणाम होतो

शाळा, घर व समाज या त्रिस्तरीय वातावरणात विद्यार्थी रहात असतो. या

वातावरणाचा परिणाम त्याच्यावर होणे अपरिहार्य आहे. शालेय पुस्तकांतून शिकवली जाणारी मूल्ये व चित्रपट, वृत्तपत्र व घरातील अन्य व्यक्तीच्या वर्तनातून शिकविली जाणारी मूल्ये यांत विरोध असण्याची शक्यता आहे. योग्य मूल्यांपासून विद्यार्थ्यांस दूर खेचणारे वातावरण व योग्य मूल्यांकड नेणारे शालेय वातावरण यातील द्वंद्वात शालेय वातावरण प्रभावी असणे नैतिक शिक्षणासाठी आवश्यक आहे.

नैतिक शिक्षण धार्मिक वा राजकीय व्यक्ति प्रभावाखाली नसावे

व्यक्तिमत्वविकसनात स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता येणे यास महत्त्व आहे. लोकशाही समाजरचनेत या क्षमतेचे महत्त्व विशेष आहे. स्वतंत्रपणे तर्कसगत विचार करून सत्यशोधन या प्रक्रियेस प्रणाली वा व्यक्ती यांचा प्रभाव मारक ठरतो. विशिष्ट विचार मुलावर लादणे अयोग्य ठरेल.

प्रत्येक शिक्षक हा नैतिक शिक्षणाचा शिक्षक आहे

इतिहास, गणित या विषयाप्रमाणे नैतिक शिक्षण देणारे विशिष्ट शिक्षक नाहीत. नैतिक मूल्यांचा परिपोष शाळेचे संपूर्ण वातावरण व शिक्षकांचे व्यक्तिमत्त्व यातून होतो. प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे प्रत्येक शिक्षक नैतिक शिक्षण देत असतो.

नैतिक शिक्षणाची संकल्पना व त्याची काही वैशिष्ट्ये यांचा विचार केल्यावर नैतिक शिक्षणाचा आशय अभ्यासक्रम याकडे वळू. याबाबत दोन विचार प्रवाह आहेत. नैतिक शिक्षण हा स्वतंत्र विषय म्हणून ठेवावा, त्यास वेगळे तास असावे, हा एक विचार दुसरा विचार असा की नैतिक शिक्षणाचे वेगळे तास असू नयेत. हा विषय वेगळा न ठेवता अभ्यासक्रमातून तो एकात्म पद्धतीने शिकवावा. नैतिक शिक्षण हा स्वतंत्र विषय ठेवण्यास शालेय व्यवस्थापनाच्या दृष्टीने ते सोयीचे होईल. व निश्चित काय शिकविले गेले यांची कल्पना मुख्याध्यापकास सुलभपणे येईल. मात्र यामुळे आणखी एका विषयाची भर आधीच अनेक विषय असलेल्या अभ्यासक्रमावर पडेल. ठराविक शिक्षक नैतिक शिक्षण देणारे, इतरांचा नैतिक शिक्षणाशी संबंध नाही अशी परिस्थिती उद्भवेल. विविध विषय शिकवित असताना नैतिक शिक्षण सहजपणे देता येईल अशा स्थळांचा वापर होण्यास मर्यादा पडतील. नैतिक शिक्षण देणाऱ्या शिक्षकांशिवाय इतर शिक्षकांच्या क्षमता व प्रज्ञा यांचा उपयोग होणार नाही, मुद्दाम शिकविण्याचा एक विषय असे स्वरूप नैतिक शिक्षणाला आल्यास ते कृत्रिम होईल व त्यामधील सहजता गळून पडेल.

नैतिक मूल्यांची मार्गदर्शक तत्त्वे

नैतिक शिक्षणाची आवश्यकता विविध शिक्षण आयोग व मंडळे यांनी मांडताना कोणती नैतिक मूल्ये विद्यार्थ्यांना शिकवावी याबद्दल सूचना केल्या आहेत. या सर्वांचे परिशिष्ट 'एनसीईआरटी' ने करून Documents on Social, Moral and

Spiritual Values in Education (1979) या पुस्तिकेत ८४ मूल्याची यादी दिली आहे, महाराष्ट्रात औरंगाबाद येथे नैतिक शिक्षणाचा विचार करण्यासाठी राज्यस्तरीय चर्चासत्र ऑगस्ट १९८१ मध्ये घेण्यात आले. या चर्चासत्राने खाली नमूद केलेल्या तेरा नैतिक मूल्यांचा शालेय अभ्यासक्रमासाठी स्वीकार केला आहे. (१) स्वाधीनता, (२) कर्तव्यदक्षता-नियमितपणा, (३) श्रमनिष्ठा, (४) विज्ञाननिष्ठा, (५) शुचिता–स्वच्छता, (६) समता, (७) बंधुता, (८) सर्वधर्माबद्दल आदरभाव, (९) आई–वडील, गुरुजन यांच्याबद्दल आदरभाव, (१०) भूतदया, (११) निसर्गप्रेम, (१२) निर्भयता, (१३) खिलाडू वृत्ती. याशिवाय चर्चासत्राने अशीही शिफारस केली आहे की, नैतिक शिक्षण हा वेगळा विषय म्हणून न शिकविता ते अभ्यासक्रमातून एकात्म पद्धतीने देण्यात यावे. याचा अर्थ असा नाही की वरील यादीत समाविष्ट नसलेली मूल्ये शिकवू नयेत. भाषेतील धडे, कविता व अन्य विषयातील पाठ्यांश शिकवितांना त्यांत अनुस्यूत असलेली मूल्ये शिकवावीच लागतील. परंतु नैतिक शिक्षणाचा तपशील शालेय पातळीवर ठरवितांना मार्गदर्शक तत्त्व म्हणून या यादीचा उपयोग होईल.

अभ्यासानुवर्ती उपक्रम हे नैतिक शिक्षणाचे, असेच एक प्रभावी साधन आहे. जे संस्कार विद्यार्थ्यांना द्यावयाचे आहेत ते त्यांनी अनुभवातून घ्यावे यासाठी अभ्यासानुवर्ती उपक्रमांची काळजीपूर्वक आखणी करावी लागेल. प्रत्येक उपक्रमांची विशिष्ट उद्दिष्टे ठरवून समर्पक अध्ययन अनुभव विद्यार्थ्यांना द्यावे लागतील व उद्दिष्टे साध्य झाली की नाही याचा पडताळा घ्यावा लागेल. विशिष्ट समस्या शाळेपुढे निर्माण झाल्या असल्यास त्या सोडविण्यासाठी कल्पकतेने काही प्रकल्प तयार करावे लागतील व त्यांचा अंतर्भाव नैतिक शिक्षणाच्या कार्यक्रमात करावा लागेल. शाळेचे संपूर्ण आवार स्वच्छ रहावे म्हणून पुण्याच्या विमलाबाई गरवारे हायस्कूलने स्वच्छता गीत तयार केले. हे गीत जेव्हा वाजविले जाते त्यावेळी शाळेतील प्रत्येक विद्यार्थी त्याला दिसेल तो कचरा गोळा करून योग्य त्या ठिकाणी टाकतो व निमिषार्धात संपूर्ण शाळा स्वच्छ होते.

थोडक्यात, नैतिक शिक्षणाचा एकात्म अभ्यासक्रम खालीलप्रमाणे तयार होईल.

१) विद्यार्थ्यात जी मूल्ये रुजवावयाची आहेत ती पुढे ठेवणे.

२) भाषा, सामाजिक शास्त्रे यासारख्या बौद्धिक विषयांच्या पाठ्यांशातून कोणती मूल्ये देता येतील ते शोधणे. ही मूल्ये पाठ्यांश शिकवितांना ग्रहण केली जातील हे पहाणे.

३) समाजसेवा, कार्यानुभव, स्काउटिंग, शारीरिक शिक्षण यासारख्या बौद्धिकेतर विषयांचा नैतिक शिक्षणासाठी पुरेपूर उपयोग करून घेणे.

४) अभ्यासानुवर्ती उपक्रमांच्या द्वारा नियोजनपूर्वक नैतिक शिक्षण देणे.

५) गरजेनुरूप योग्य अशा प्रकल्पाची आखणी कल्पकतेने करणे.

नैतिक शिक्षणाच्या कार्यक्रमाचे स्वरुप पाहिल्यावर नैतिक शिक्षण कसे द्यावे याचा विचार करू.

एकात्म पद्धतीचा उपयोग

याचा विचार काही प्रमाणात वर केला आहे. अभ्यासक्रमातील पाठ्यांशांशी नैतिक मूल्ये निगडित झालेली असतात तशीच ती एकमेकांशीही निगडित झालेली असतात. त्यांच्या कक्षा निश्चित करणे कठीण व्हावे इतकी ती अनेकदा एकमेकात मिसळून गेलेली असतात. स्वच्छतेचे मूल्य रूजवावयाचे आहे असे ठरविल्यास त्यात वैयक्तिक स्वच्छता (स्वत:चे शरीर, पोषाख, पुस्तकाची पिशवी, स्वत:चे सामान) वर्गाची स्वच्छता, शाळेच्या आवाराची स्वच्छता, क्रीडांगणाची स्वच्छता, सहलीसाठी ज्या ठिकाणी वर्ग जातो त्या स्थळाची स्वच्छता, मोटारीची, आगगाडीच्या डब्याची प्रवासकाळातील स्वच्छता, सामाजिक परिसराची स्वच्छता या सर्व अंतर्भूत होतात. पाठ्य व पाठ्येतर कार्यक्रमातून स्वत:पासून समाजापर्यंत स्वच्छतेच्या संस्काराची कक्षा विस्तारत जाते व अखेरीस स्वच्छतेचे मूल्य रुजते. हे मूल्य रुजल्यावर व्यक्तीला कोणतीही अस्वच्छता सहन होत नाही. अस्वच्छता दिसल्यावर ती दूर करणे ही व्यक्तीची स्वाभाविक क्रिया होते. विशिष्ट उद्दिष्टांच्या स्वरूपात विचार करावयाचा झाल्यास

(१) विद्यार्थी स्वच्छतेचे महत्त्व जाणतो,

(२) स्वत:चे शरीर, पोषाख, वस्तू, वर्ग, खोली स्वच्छ ठेवतो,

(३) अन्यत्र अस्वच्छता दिसल्यास ती दूर करतो, ही उद्दिष्टे या कार्यक्रमातून साध्य होतात. यावरुन असे दिसून येईल की स्वच्छतेचे मूल्य विज्ञान, शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र या विषयांशी जसे निगडित आहे तसेच ते सामाजिक जबाबदारी या अन्य मूल्यांशीही निगडित आहे.

उपदेश नको

नैतिक शिक्षण हे सहजतेने अप्रत्यक्षपणे, कौशल्याने द्यावयाचे आहे. व्याख्यानबाजी, उपदेश यासारख्या उथळ व बटबटीत साधनांचा उपयोग याकामी होण्याची शक्यता कमी शब्दांनी उपदेश केला व त्याची प्रतिक्रिया म्हणून विद्यार्थ्याने शब्दांची पोपटपंची केली अशा पद्धतीने नैतिक शिक्षण देता येत नाही. योग्य प्रकारच्या कथा, प्रसंग, व्यक्तिरेखा शिकवितांना सूचन पद्धतीने (suggestion) संस्कार घडविता येतील. शिक्षणाच्या स्वत:च्या उदाहरणांतूनही हे सूचन घडू शकते.

अनुभूती हवी

नैतिक शिक्षण हे माहिती देणारे शिक्षण नाही, तर अभिवृत्ती घडविणारे शिक्षण आहे. नैतिक शिक्षणाच्या कार्यक्रमातील विद्यार्थ्यांचा सहभाग योग्य ते अनुभव त्यांना

देईल. विद्यार्थ्यांच्या मनाची तयारी करणे, त्यांना अनुभव देताना निकोप वातावरण असणे, योग्य त्या भावनांचा परिपोष होणे व विचार करून बुद्धिपूर्वक स्वीकार होणे यातून मूल्याची जोपासना होईल.

योग्य शालेय वातावरण हवे

वातावरणातून अप्रत्यक्षपणे, सहजपणे, न कळत पण खोलवर संस्कार होतात. पब्लिक स्कूलच्या थोर परंपरा व वातावरण यातून विद्यार्थी मूल्ये घेतो. नेपोलियनचा पराभव वॉटर्लूच्या रणांगणावर झाला नसून ईटन व हॅरोच्या क्रीडांगणावर झाला, या ड्यूक ऑफ वेलिंग्टनच्या उद्‌गाराचे मर्म लक्षात घ्यावयास हवे. सांमजस्य,शिस्त, एकोपा, आदर, प्रेम, मोकळेपणा, ध्येयनिष्ठा असलेले वातावरण नैतिक शिक्षणास पोषक ठरते. विरोधी वातावरणात नैतिक मूल्ये रुजणार नाहीत. सहलीच्या मोटारीत वर्गातील विद्यार्थिनीशी एक मुलगा बोलला, तिच्या शेजारी बसला म्हणून शिक्षकाने त्याच्या तोंडात मारले, या अपमानामुळे विषप्राशन करून त्या मुलाने आत्महत्या केली असे वृत्त मध्यंतरी वाचण्यात आले. दडपण, भीती यांचा उपयोग करून मुख्याध्यापकाच्या इच्छेप्रमाणे विद्यार्थ्यांना वागावयास भाग पाडता येईल. पण त्यातून इष्ट संस्कार होणार नाहीत. व्यक्तिमत्त्व घडविण्याचे काम करडेपणाने, धसमुसळेपणाने होत नाही तर विश्वासाने हळुवारपणाने होते हे यावरून दिसून येईल.

समस्या सोडविण्यासाठी नैतिक शिक्षण

नैतिक शिक्षण हे शाब्दिक शिक्षण नाही. त्याला प्रात्यक्षिक बाजू आहे. त्याचा जीवनात उपयोग आहे. अनुभवांचे विश्लेषण करण्याचे, त्यावर विचार करण्याचे शिक्षण यातून मिळावे पर्यवेक्षणाशिवाय बौद्धिक विषयाची कसोटी घेण्याचा प्रयोग करता येईल. आपणास काय येते आहे व काय येत नाही हे कळावे यासाठी कसोटी आहे. जे आपणास येत नाही ते पुन्हा समजून घेता यावे यासाठी कसोटीचा उपयोग करावयाचा आहे. कॉपी केल्यामुळे हे साध्य होणार नाही व आपण कच्चे राहू आपण स्वत:लाच फसवू या प्रकारची चालना देऊन व मुलांना विश्वासात घेऊन पर्यवेक्षणाशिवाय कसोटी घेऊन प्रामाणिकपणाचे मूल्य रुजविता येणे शक्य आहे. या प्रयोगास वर्ग अनुकूल झाला व त्यात अपवादात्मक कॉपी करणारा आढळला तर त्या घटनेचे विश्लेषण कौशल्याने व हळुवारपणे संबंधित विद्यार्थ्याकडून करून घेता येईल. समाजात आढळणारे संघर्ष, समस्या यांचे विश्लेषण करून सामाजिक न्याय, समता, प्रामाणिकपणा, ही मूल्ये रुजविता येतील. वृत्तपत्रात जातीय संघर्षांची बातमी आली म्हणजे आमचे शालेय वातावरण कोलमडून पडावे इतके ते तकलादू नाही. उलट या वृत्ताचा उपयोग विश्लेषण, चिकित्सा व अभ्यास यासाठी आपणास करता येईल.

चिकाटी हवी

नैतिक शिक्षणाची प्रक्रिया ही आपल्या अपेक्षेनुसार होईलच असे नाही. एकादा अनुभव फार परिणामकारक ठरेल तर एकाद्या उपक्रमाचा अपेक्षित परिणाम होणार नाही. विचारपूर्वक सातत्याने व चिकाटीने यासाठी प्रयत्न करावे लागतील. अपयशाचे विश्लेषण करून कारणे शोधून काढावी लागतील. व्यूहरचना (strategy) बदलावी लागेल. विद्यार्थ्यांचा विश्वास संपादन करून त्यांना अनुकूल करून घ्यावे लागेल. एक व्याख्यान, एक उपदेश, एक उपक्रम यातून नैतिक शिक्षण साध्य होईल असा भाबडा विश्वास बाळगण्याचे कारण नाही. तसेच निराश होण्याचेही कारण नाही. कारण नैतिक शिक्षणातून जी मूल्ये खरोखर रूजतात त्यांचा नाश करणेही फार कठीण असते.

□



लोकसंख्या शिक्षण

प्रा. अ. दि. सदावर्ते

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे. लोकसंख्येच्या स्फोटामुळे ही परिवर्तनाची प्रक्रिया मंदावली आहे. उत्तम प्रतीचे जीवन जगावयाचे असल्यास या लोकसंख्येच्या समस्येवर समर्पक उपाय शोधून त्यांचा योग्य तो अवलंब करणे किती आवश्यक आहे हे प्रा. अ. दि. सदावर्ते यांनी मांडलेल्या खालील विचारावरून स्पष्ट होते.

लोकसंख्येची समस्या व स्वरूप

जगाची लोकसंख्या १९२० साली अदाजे १८६ कोटी होती. लोकसख्या शास्त्रज्ञांच्या मते इतकी लोकसख्या निर्माण होण्यासाठी अंदाजे साडेचार लाख वर्षांचा कालावधी लागला. परंतु जगाची लोकसंख्या १८६ कोटीवरुन ३०० कोटीपर्यंत वाढवण्यासाठी फक्त चाळीस वर्षे लागली. या चाळीस वर्षांपैकी प्रथम तीन दशकांत लोकसंख्येची वाढ प्रत्येकी साधारण दहा टक्क्यांनी झाली. परंतु १९५०–६० या दशकांत मात्र वाढीचा वेग जवळ जवळ दुप्पट होऊन त्या दशकात जगाची लोकसंख्या साधारणपणे ४८ कोटींनी वाढली.

१९७७ च्या सुमारास जगाची लोकसंख्या अंदाजे ४०० कोटीपर्यंत पोहोचली. यावेळी जगाच्या लोकसंख्या वाढीचा वेग साधारणपणे १.९ टक्के होता ४०० कोटी लोकसंख्येपैकी एकटचा आशिया खंडात २०० कोटी लोक राहात होते. म्हणजेच जगाच्या लोकसंख्येच्या ५७ टक्के लोकसंख्या एकटचा आशिया खंडात राहात होती. त्यावेळी आशिया खंडाच्या लोकसंख्या वाढीचा वेग २.१ टक्के होता लोकसंख्या शास्त्रज्ञांच्या मते जर लोकसंख्या वाढीचा वेग असाच राहिला तर विसाव्या शतकाच्या शेवटी जगाची लोकसंख्या ५३० कोटी पर्यंत जाईल व त्यापैकी एकटचा आशिया खंडाची लोकसंख्या ३६० कोटी पर्यन्त पोहोचेल.

१९७१ च्या जणगणनेप्रमाणे भारताची लोकसंख्या ५४८ कोटी म्हणजेच जगाच्या लोकसंख्येच्या १५ टक्के होती. १९८१ च्या (तात्पुरत्या) जणगणना अहवालानुसार

भारताच्या लोकसंख्येत १३५८ कोटीची वाढ झाली आहे. (यात जम्मू व काश्मिरच्या लोकसंख्येचा अंतर्भाव केलेला नाही.) भारत सरकारच्या नियोजन मंडळाने नियुक्त केलेल्या लोकसंख्या शिक्षणाची भूमिका ठरविणाऱ्या कार्यकारी गटाचे मतानुसार भारताची लोकसंख्या विसाव्या शतकाच्या शेवटी ९० कोटीपर्यंत वाढून इ. स. २०५० पर्यंत १२० कोटींचा उच्चांक गाठेल. जगातील उपलब्ध भूखंडापैकी १/४५ भूखंड भारताच्या वाट्याला आला आहे. आणि त्यावर जवळ जवळ जगाच्या लोकसंख्येचा १/७ भाग वास करीत आहे. १९७१ च्या जणगनणा अहवालानुसार भारतात जननाचे प्रमाण ४१.१ व मृत्यूचे प्रमाण १८.९ प्रतिहजार इतके होते. १९८१ च्या जनगणना अहवालाची अधिकृत माहिती अजून उपलब्ध झालेली नाही. परंतु अंदाज या दशकात (१९७१–१९८१) आपल्या देशातील जननाचे प्रमाण ३९ व मृत्यूचे प्रमाण १७ प्रतिहजार झाले असावे.

१९२० पर्यन्त भारताच्या लोकसंख्या वाढीचे प्रमाण बरेच मंद होते १९११ ते. १९२० या दशकात भारतात जनन मृत्यूचे प्रमाण जवळ जवळ एकसारखे होते. (कारण या दशकात प्लेग सारख्या रोगाचे साथीमुळे मृत्यूचे प्रमाण बरेच वाढले होते.) १९२० या दशकानंतर भारतात मृत्यूचे प्रमाण प्रचंड वेगाने कमी होत गेले. परंतु जननाचे प्रमाण मात्र अतिशय कमी होत गेले. परिणाम स्वरूप जनन व मृत्यूचे प्रमाणात प्रचंड अंतर निर्माण होऊन लोकसंख्येची वाढ फारच झपाट्याने झाली.

स्वातंत्र्योत्तर काळात भारताने प्रत्येक क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती करूनसुद्धा जनसामान्यांच्या पदरात त्याचे माप फारच कमी पडले हे सर्वास अवगत आहे.असे होण्याचे प्रमुख कारण म्हणजे वाढती लोकसंख्या हे निर्विवाद होय. धान्य उत्पादनाचे प्रमाण व लोकसंख्या वाढीचे प्रमाण याचा समतोल पार बिघडल्याने ही दुर्दशा झाली. योजनांची अपेक्षित फळे कागदावरच राहिली. तीच गत झाली साक्षरता योजनेची. त्या योजनेतील प्रगती वाढत्या लोकसंख्येमुळे दिसेनाशी झालेली आहे.

लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम आज सर्वत्र दिसून येतात. त्यात विशेष करून अन्न, निवाऱ्याची जागा, पिण्याचे पाणी, इंधन या सारख्या आवश्यक गोष्टीची कमतरता जनतेला हवालदिल करीत आहे. शिवाय शासनाने जनतेकरिता निर्माण केलेल्या सुखसोयी व तत्सम व्यवस्था लोकसंख्या वाढीच्या रेटयापुढे कोलमडून पडताहेत. परिणाम स्वरुप जीवनमान उंचावण्याची खटपट निरर्थक ठरत आहेत

लोकसंख्या वाढ व मोजण्याची पद्धत

लोकसंख्येतील वाढ सर्वसामान्यपणे तीन गोष्टींवर अवलंबून असते. १) जननाचे प्रमाण, २) मत्यूचा दर, ३) स्थलांतर. जनन व मृत्यूच प्रमाण प्रतिहजारी ठरविण्यात येते. भारताच्या बाबतीत विचार करता स्थलांतराने देशाच्या लोकसंख्येत फारसा फरक

पडत नाही. कारण त्याचे प्रमाण फारच कमी आहे. त्यामुळे अर्थातच लोकसंख्या वाढीसाठी प्रामुख्याने उर्वरित दोनच गोष्टी जबाबदार ठरतात.

लोकसंख्या वाढीची कारणे

१) एकोणिसाव्या शतकाच्या उतरार्धापर्यंत जनन व मृत्यूचे प्रमाणात फारसे अंतर नव्हते. कारण बालमृत्यूचे प्रमाण बरेच जास्त होते. सर्वसामान्य आयुमर्यादा जास्त नव्हती एकोणिसाव्या शतकाच्या अखेर व २० व्या शतकाच्या आरंभापासून विज्ञान क्षेत्रात क्रांतीकारक प्रगती झाल्याने वैद्यकीय अभ्यासाची क्षितीजे अधिक विस्तीर्ण व्हावयास मदत झाली. नवनवीन औषधांचे, प्रतिबंधक लसीचे शोध लागले, आणि जादुगाराने कांडी फिरवावी, त्याप्रमाणे बालमृत्यूचे प्रमाण झपाट्याने कमी होत गेले. नवीन औषधांमुळे असाध्य रोग बरे होण्यास मदत होऊ लागली आणि त्यामुळेच सर्वसाधारण आयुमर्यादा पण वाढली. दुर्दैवाने मृत्यूचे प्रमाणात झपाट्याने घट होत असताना जननाचे प्रमाणात मात्र समप्रमाणात घट होऊ शकली नाही व दोहोंमधील तफावतीमुळे लोकसंख्या वाढीचा वेग वाढला.

२) जननाचे प्रमाणावर मर्यादा घालणे अजूनपर्यन्त तरी भारतात पूर्णांशाने शक्य होऊ शकल नाही. त्याची संक्षेपाने खालीलप्रमाणे कारणे आहेत.

अ) अंधविश्वास, ब) बालवयात लग्ने होणे, क) शिक्षणाचा अभाव, ड) जास्तीत जास्त मुलांची संख्या ही पुढे जाऊन जास्तीत जास्त उत्पन्नाचे साधन बनणार आहे ही भावना, इ) दारिद्र्य.

लोकसंख्या शिक्षणाचा आरंभ

लोकसंख्या वाढीमुळे निर्माण होत असलेल्या निरनिराळ्या समस्यांचे रुप जसजसे तीव्र होत गेले तसतसे या संदर्भात काहीतरी करण्याची आवश्यकता शिक्षणतज्ज्ञांना, समाजशास्त्रज्ञांना, विचारवंताना, सामाजिक व राजकीय पुढाऱ्यांना वाटू लागली. कुटुंब नियोजन संस्थेने याबाबत पुढाकार घेतला आणि या सर्व लोकांच्या प्रयत्नामुळे मुंबई येथे ऑगस्ट १९६९ मध्ये लोकसंख्या शिक्षणासंबंधी एका राष्ट्रीय पातळीवरील शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबीराने केलेल्या शिफारशीवर योग्य तो विचार करून १९७० साली भारत सरकारने लोकसंख्या शिक्षणाचा समावेश शालेय अभ्यासक्रमात करण्याची शिफारस मान्य केली आज भारत सरकारच्या सहाय्याने भारतातील महाराष्ट्रासहीत १८ राज्यात लोकसंख्या शिक्षण कार्यक्रम कार्यान्वित करण्यास सुरूवात झाली असून उर्वरित राज्यात तो लवकरच कार्यान्वित करण्यात येणार आहे. या योजनेसाठी युनायटेड नेशन्स फंड फॉर पॉप्युलेशन अॅक्टिविटी या संस्थेमार्फत प्रचंड प्रमाणात आर्थिक सहकार्य मिळविण्यात भारत सरकार यशस्वी झाले आहे.

लोकसंख्या शिक्षण म्हणजे काय ?

लोकसंख्या शिक्षण या कल्पनेचा जन्म कुटुंब नियोजन संस्थेच्या प्रयत्नातून झालेला असल्यामुळे शिक्षण क्षेत्रातील व शिक्षण क्षेत्राबाहेरील बऱ्याच लोकांचा असा गैरसमज आहे की, लोकसंख्या शिक्षण म्हणजे कुटुंब नियोजनाचे शिक्षण किंवा लोकसंख्या शिक्षण म्हणजे लैंगिक शिक्षण होय. कांही लोकांचा असाही गैरसमज आहे की, लोकसंख्या शिक्षण म्हणजे लोकसंख्या कमी करण्याचे शिक्षण. वस्तुत: लोकसंख्या शिक्षणाची व्याप्ती इतकी मर्यादित नाही.

लोकसंख्या शिक्षणाबाबत निरनिराळे दृष्टीकोन व मतभिन्नता असल्यामुळे निरनिराळ्या लोकांनी लोकसंख्या शिक्षणाची परिभाषा वेगवेगळ्या स्वरूपात केली आहे. लोकसंख्या शिक्षणाच्या व्याख्येसंबंधी जरी बरीच मतभिन्नता असली तरी लोकसंख्या शिक्षणाच्या उद्दिष्टाच्या संदर्भात मात्र फारशी मतभिन्नता नाही. त्यामुळेच सध्या लोकसंख्या शिक्षणाची व्याख्या न करण्याकडे जास्तीत जास्त विचारवंतांचा कल दिसतो. अशा परिस्थितीत लोकसंख्या शिक्षणाची व्याख्या करण्याऐवजी उद्दिष्ट रुपाने लोकसंख्या शिक्षणाची कार्यकारी व्याख्या मांडणे जास्त सयुक्तिक ठरेल.

लोकसंख्या शिक्षणाची उद्दिष्टानुरुप कार्यकारी व्याख्या करीत असताना कांही गोष्टी गृहीत धरण्यात आलेल्या आहेत. त्या अशा :-

१) लोकसंख्यावाढ हेच दारिद्र्याचे एकमेव कारण नसून त्यासाठी असलेल्या अनेक कारणापैकी हे एक कारण आहे.

२) लोकसंख्यावाढीमुळे देशाच्या आर्थिक प्रगतीत एक अडसर निर्माण होतो. त्याचप्रमाणे लहान मुलांच्या निरोगी जीवनास ती हानीकारक ठरते.

३) लोकसंख्यावाढ ही दारिद्र्य वाढविण्यास व दारिद्र्य हे लोकसंख्या वाढीस बऱ्याच अंशी कारणीभूत आहेत.

४) लोकसंख्येच्या प्रचंड वाढीवर कायमचा तोडगा शोधून काढण्यासाठी वर्तमान पालकापेक्षाही भविष्यातील पालकांना त्वरित शिक्षण देणे जास्त आवश्यक आहे.

५) निव्वळ भरमसाठ लोकसंख्या वाढीच्या घनतेचा किंवा परिणामांचा आपल्याला विचार करावयाचा नसून लोकसंख्येच्या रचनेचा सुद्धा प्रकर्षाने विचार करणे आवश्यक आहे.

६) जननाचे प्रमाणावर तात्पुरता निर्बंध घालण्यामुळे लोकसंख्येची समस्या संपणार नाही. प्रत्येक पिढीला या समस्येची संपूर्ण जाणीव होणे अत्यावश्यक आहे.

७) कोणतेही दुष्परिणाम होणार नाहीत असे निर्बंध जननाच्या वाढत्या प्रमाणावर घालणे शक्य आहे.

८) नैसर्गिक साधन संपत्तीचे साठे मर्यादित स्वरूपात असतात.

९) उपलब्ध शेत जमीनीतून जास्तीत जास्त धान्योत्पादन काढण्यावरसुद्धा मर्यादा पडतात

वरील सर्वगोष्टी गृहीत धरून लोकसंख्या शिक्षणाचे स्वरूप ठरविण्यासाठी जीवनमान (Quality of Life) हा लोकसंख्या शिक्षणाचा आत्मा ठरविता येईल. शिक्षणाचा सर्व खटाटोप आपण प्रत्येक नागरिकाचे जीवनमान उत्तम करण्यासाठीच करीत असतो. जीवनमान ठरविण्यासाठी निरनिराळे घटक जबाबदार असतात. त्यातील प्रमुख घटक खालील प्रमाणे–

१) लोकसख्येची स्थिती (Population Situation)

२) सामाजिक व सांस्कृतीक परिस्थिती (Socio-cultural Factors)

३) प्रगतीची प्रक्रिया (Process ot Developoment)

४) साधनसंपत्ती (Resources)

५) रहाणीमान (Standard of Living)

वरील सर्व घटकांचा एकमेकांशी घनिष्ठ संबंध असतो या घटकांतील एका जरी घटकांत मोठ्या प्रमाणात वाढ किंवा घट झाली तरी त्याचा परिणाम इतर सर्व घटकांवर होऊन त्यातील समतोल ढासळतो व पर्यायाने त्याचा जीवनमानावर परिणाम होतो.

वरील गोष्टी लक्षात घेऊन लोकसंख्येची स्थिती तिच्या वाढीची प्रक्रिया, वाढीची कारणे, लोकसंख्येची रचना व या सर्व गोष्टींचा सामाजिक व सांस्कृतिक घटकांवर, साधनसंपत्तीवर, प्रगतीच्या प्रक्रियेवर, रहाणीमानावर व पर्यायाने प्रत्येक व्यक्तीच्या जीवनमानावर होणाऱ्या परिणामाबाबत ज्ञान देणे हे लोकसंख्या शिक्षणात अभिप्रेत आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक व्यक्तीस योग्यवेळी स्वतःच्या कुटुंबाच्या आकाराबाबत स्वतःसाठी योग्य व समाजासाठी उपयुक्त निर्णय घेण्याची क्षमता व दृष्टीकोन निर्माण करणे हे सुद्धा लोकसंख्या शिक्षणात अभिप्रेत आहे.

समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या जीवनमानाचा स्तर उंचावणे हे जर लोकसंख्या शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणून मान्य केले तर मग लोकसंख्या शिक्षण म्हणजे कुटुंब नियोजनाचे शिक्षण किंवा लैंगिक शिक्षण किंवा लोकसंख्या कमी करण्याचे शिक्षण हा संभ्रम रहाणारच नाही. भारतासारख्या देशात तात्कालिक परिस्थितीत लोकसंख्येची भरमसाठ वाढ झाली असल्यामुळे व त्या प्रमाणात इतर घटकांची प्रगती झाली नसल्यामुळे कांही काल तरी लोकसंख्या कमी करण्यावर जरी लोकसंख्या शिक्षणाच्या माध्यमाद्वारे भर द्यावा लागणार असला तरी त्याच बरोबर इतर घटकांचीही प्रगती

झपाट्याने व्हावी या गोष्टीवर सुद्धा खूप भर द्यावा लागणार आहे. याचाच अर्थ असा की, सध्या भारतात लोकसंख्या या घटकाने जे असंतुलन निर्माण केले आहे ते रोखून व इतर घटकात जास्त प्रमाणांत प्रगती करून जीवनमान उंचविण्याचा प्रयत्न करणे हा होय. फ्रान्ससारख्या देशात या उलट परिस्थिती पहावयास मिळते. तिथे लोकसंख्येचे प्रमाण कमी असल्यामुळे त्या देशात लोकसंख्येच्या वाढीवर जास्त भर देणे आवश्यक झाले आहे. थोडक्यात परिस्थितीनुरुप ज्या ज्या घटकाने जीवनमान ठरविणाऱ्या इतर घटकात असंतुलन निर्माण केले असेल त्या घटकात योग्य प्रमाणात घट किंवा वाढ करण्यावर भर दिल्याने लोकसंख्या शिक्षणाचा अर्थ किंवा स्वरूप त्या घटकापूरतेच मर्यादित रहात नाही. कुटुंब नियोजन किंवा कुटुंब कल्याण कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट लोकसंख्येची अमर्याद वाढ रोखून कुटुंबाला आरोग्यदायी जीवन जगण्यास मदत करणे हे आहे. यात लोकसंख्या वाढीवर मर्यादा घालण्यासाठी उघड प्रयत्न केला जातो. लोकसंख्या शिक्षणाची व्याप्ती यापेक्षा भिन्न आहे. या शिक्षणाव्दारे लोकसंख्यावाढीचे अनिष्ठ परिणाम विद्यार्थ्याला अवगत करून देणे व त्याला उत्तम जीवन जगण्यासाठी स्वतःच्या कुटुंबाच्या आकाराबाबत समजसपणे विचार करून स्वतःसाठी योग्य व समाजासाठी उपयुक्त असा निर्णय योग्यवेळी घेण्याची क्षमता त्याच्यात निर्माण करणे या मार्गाचा अवलंब केला जाणार आहे विद्यार्थ्यांनी कोठलेही तयार साच्याचे निर्णय घ्यावेत अशी सक्ती त्याच्यावर करणे अर्थातच लोकसंख्या शिक्षणाचे उद्दिष्ट नाही. त्याचमुळे ' लहान कुटुंब सुखी कुटुंब ' अशा सूत्रांचा प्रचार लोकसंख्या शिक्षणाचे माध्यमातून करणे इष्ट ठरणार नाही. लोकसंख्या शिक्षणाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत :–

लोकसंख्या शिक्षणाची दीर्घकालीन उद्दिष्टये

१) लोकसख्येतील वाढीचा सामाजिक व आर्थिक क्षेत्रातील व्यक्तिगत, कौटुंबिक, समाज तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रक्रियेच्या व प्रगतीच्या आंतरिक संबंधाबाबत विद्यार्थ्यांत नवा दृष्टिकोन निर्माण करणे.

२) लोकसंख्येची सद्यःस्थिती व त्यासंबधी भारत सरकारने आखलेल्या व कार्यान्वित केलेल्या उपक्रमांची व प्रयत्नाची विद्यार्थी व शिक्षक वर्गास जाणीव करुन देणे.

३) प्रचलित शिक्षण पद्धतीत लोकसंख्या शिक्षणाचा शालेय ते विद्यापीठ स्तरापर्यंत समावेश करणे व जनसामान्याकरिता राज्य व राष्ट्रस्तरावरील कार्यक्रमाची योजना करणे.

४) लोकसंख्या वाढीच्या परिणामाबाबत विद्यार्थी व शिक्षकांसमवेत संपूर्ण समाजालाच प्रबोधन करून त्यांना स्वतःकरता व समाजाकरिता हितकारक असे कुटुंबाच्या आकारासंबंधी व जीवनमानासंबंधी योग्य ते निर्णय घेण्यास पात्र बनविणे.

लोकसंख्या शिक्षणाची गरज

लोकसंख्यावाढीच्या वेगावर त्वरित मर्यादा घालणं अत्यावश्यक आहे. जर अशा स्वरुपाचे काही उपाय वेळीच योजण्यात आले नाहीत तर मानवाच्या भूतलावरील अस्तित्वालाच धोका पोहोचण्याची शक्यता नाकारता येणार नाही. कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम हा या वरील तातडीचा परंतु तात्पुरता उपाय आहे. लोकशाही शासन व्यवस्था असलेल्या देशात कुटुंब नियोजन सक्तीचे करणं शक्य नाही, व योग्यही नाही. कुटुंब नियोजन ही लोकसंख्या समस्येच्या रोगावरील तात्पुरती मलमपट्टी ठरु शकेल परंतु त्यामुळे इतर समस्याचे निराकरण होणार नाही. लोकसंख्या वाढीच्या समस्येबरोबरच खालील नमूद केलेल्या गोष्टींचा सुद्धा विचार होणं आवश्यक आहे.

१) लोकसंख्यावाढ हे दारिद्र्याचे एक प्रमुख कारण आहे.

२) लोकसंख्यावाढीमुळे जनसामान्याच्या आरोग्यावर व प्रामुख्याने माता व लहान बालकांच्या आरोग्यावर अनिष्ट परिणाम होतात.

३) लोकसंख्या किती जरी वाढली तरी उपलब्ध जमिनीच्या क्षेत्राची, नैसर्गिक साधन संपत्तीची वाढ होणे अशक्य आहे.

४) लोकसंख्यावाढीमुळे उपलब्ध सुखसोयी वर जास्त ताण पडतो.

५) जनसामान्याच्या उत्तम आरोग्यासाठी नैसर्गिक वनस्पती व प्राणीमात्रांच्या योग्य प्रमाणाचे संगोपन करणे अत्यावश्यक आहे.

६) अज्ञान व दारिद्र्यामुळे लोकसंख्येत भरमसाठ वाढ व लोकसंख्येतील भरमसाठ वाढीमुळे दारिद्र्य व अज्ञान वाढीस लागते.

७) एखाद्या भूखंडाची लोकसंख्या किती आहे या पेक्षाही ती कशी आहे, तीची रचना कशी आहे याला जास्त महत्त्व आहे.

८) मानव हा सुद्धा उर्जेचे एक प्रभावी साधन आहे. त्याचा योग्य तऱ्हेने उपयोग केल्यास प्रगतीचा वेग वाढू शकेल.

९) लोकसंख्या वाढ हा अपघात नसून ती मानव निर्मित प्रक्रिया आहे, व त्यावर निर्बंध घालता येऊ शकतात

१०) वृद्धापकाळातील सहाय्यासाठी मुलांच्या रुपाने मजबूत आधार असावा यासाठी जास्तीत जास्त मुलांना जन्म देण्याच्या प्रक्रियेत जन्म देणाऱ्या मातेच्या व जन्माला येणाऱ्या मुलांच्या आरोग्यावर अनिष्ट परिणाम होतो व सुखी जीवनाचा उपभोग घेण्यापासून ती वंचित होऊ शकतात

जो पर्यंत लोकसंख्येच्या समस्येबरोबरच वरील सर्व गोष्टी बाबत योग्य तो दृष्टीकोन समाजातील प्रत्येक नागरिकाच्या मनात निर्माण होणार नाही, तो पर्यंत या

सर्व समस्यातून मानवाची मुक्ती होणे कठीण आहे जीवनमानाचा दर्जा उंचावणे हा लोकसंख्या शिक्षणाचा आत्मा आहे. आणि त्यामुळेच निव्वळ लोकसंख्यावाढीवर तात्पुरते निर्बंध घालून हे ध्येय साध्य होणे दुष्कर आहे.

लोकसंख्या शिक्षण कसे द्यावे ?

शिक्षणाबाबत विचार करताना प्रत्येक समाजासमोर निदान तीन प्रश्न उभे राहतात. शिक्षण कुणाला ? कोणते ? व ते कशासाठी ? लोकसख्या शिक्षणाचा विचार करताना या तीन प्रश्नांची समर्पक उत्तरे देण्याचा विचार वर झालेला आहे. आता ते फक्त कसे द्यावयाचे याचा तपशील पाहणे अगत्याचे आहे.

लोकसंख्या शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना वेगळ्या पुस्तकाद्वारा कांही नवीन शिकवावयाचे नाही हे या शिक्षणाच्या उद्दिष्टावरून पुरेसे स्पष्ट होते. प्रचलित अभ्यासक्रमात असलेल्या विषयवार पाठामधूनच या लोकसंख्या शिक्षणाचा संदेश विद्यार्थ्यापर्यंन्त पोहचवायचा आहे. शेती, नैसर्गिक संपत्ती,परिसर, लोकसंख्येची विभागणी यासारख्या उपलब्ध पाठामधून ते कार्य करावयाचे आहे. गरज आहे फक्त एका निराळ्या दृष्टीकोनाची. उचित स्वरूपाचा दृष्टिकोन निर्माण करणे हेच या लोकसंख्या शिक्षणाचे सर्वात मुख्य उद्दिष्ट आहे त्यामुळे याचा नवीन विषय न बनविता विद्यार्थ्यांना हसतखेळत सहजपणे लोकसंख्या शिक्षण कसे देता येईल ते महत्त्वाचं आहे. भारत सरकारने तसेच महाराष्ट्र शासनाते सुद्धा या शिक्षणाचा अलग विषय न मानता त्याचा अंतर्भाव ज्या विषयात करता येईल त्यात करावा असे निश्चित केले आहे.

□

ग्रामीण शिक्षणाच्या समस्या

डॉ. मा. गो. माळी

भारत हा ग्रामीण भागाचा देश आहे ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास हा आजचा यक्षप्रश्न आहे. ग्रामीण शिक्षणातील समस्यावर मात करून ग्रामीण शिक्षणाची पुनर्रचना झाली पाहिजे. यासाठी डॉ. मा. गो. माळी यांनी ग्रामीण शिक्षणाच्या समस्यावर टाकलेला प्रकाशझोत मार्गदर्शक ठरणार आहे

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर गेल्या ३३ वर्षात भारतात जवळ जवळ ७० टक्के शिक्षणाचा प्रसार झाल्याचे दिसून येत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात प्राथमिक शिक्षणाचे नवयुग सुरू झाले. शिक्षण प्रसाराचा वेग झपाट्याने वाढला आणि भारतसरकारने शिक्षण विकासासाठी प्रत्येक पंचवार्षिक योजनेत खर्चाची खास तरतुद केली. डॉ. राधाकृष्णन् आयोग, डॉ. कोठारी आयोग यांनी भारतातील शिक्षणाच्या पुनर्रचनेविषयी शिफारशी केल्या, त्या शिफारशी प्रमाणे अंमलबजावणी सुरू झाली. परंतु शिक्षण प्रसाराबरोबर समस्याही वाढल्या.भारतात ७० टक्के खेडी आहेत आणि या खेड्यांचा विकास म्हणजेच भारताचा विकास होय. आणि हा दृष्टिकोन समोर ठेवून कोठारी आयोगाने ज्या महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या त्या थोडक्यात पुढील प्रमाणे आहेत.

१) १९७५-७६ सालापर्यंत ५ वर्षाच्या कालावधीचे प्रभावी व कार्यक्षम शिक्षण सर्व विद्यार्थ्यांना द्यावे. १९८५-८६ पर्यंत भारतातील सर्व विद्यार्थ्यांना किमान सातवर्ष कालावधीचे प्रभावी व कार्यक्षम शिक्षण मिळावे.

२) प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रातील गळती व स्थगितता कमी करण्यासाठी खास प्रयत्न करणे इयत्ता १ ली मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी ८० टक्के विद्यार्थी सातव्या इयत्तेपर्यंत ७ वर्षांच्या कालावधीत गेले पाहिजेत.

३) कांही विद्यार्थी १४ वर्षे लागण्याच्या आतच सातवी इयत्ता पूर्ण करतील व त्यांना शिक्षण पुढे चालू ठेवणे अशक्य असेल,तर अशा विद्यार्थ्यांसाठी छोट्या मुदतीचे व्यावसायिक शिक्षणक्रम चालू करावेत.

४) प्रत्येक राज्यामध्ये जिल्हा निहाय शिक्षणाविषयी विकासाचे आराखडे तयार व्हावेत.

५) सक्तीच्या शिक्षण योजनेची पूर्णत: कार्यवाही करण्यासाठी सर्वत्र शिक्षणाची सोय झाली पाहिजे. सर्व विद्यार्थ्यांनी शाळेत प्रवेश घेतला पाहिजे व प्रवेश घेतलेले सर्व विद्यार्थी शाळेमध्ये टिकले पाहिजेत.

६) प्राथमिक शाळेतील अध्यापनाचा दर्जा सुधारणे.

७) प्राथमिक शिक्षकाचा दर्जा वाढविणे.

८) अर्धवेळ शिक्षणाची सोय करणे.

वरील शिफारशी पाहिल्या की एक गोष्ट लक्षात येते की, सध्याच्या शैक्षणिक कार्यक्रमात पुनर्रचना करणे आवश्यक आहे.

शिक्षण कशासाठी ?

शिक्षणामुळे मानवाला सत्य असत्याचा शोध लागतो आणि जीवनाचा विकास सातत्याने करण्याची स्फूर्ती लाभते, प्रेरणा मिळते. शिक्षणामुळे व्यक्तीमधील अंतस्थ शक्तींचा अविष्कार होण्यास मदत होते. शिक्षणामुळे लोकांचे जीवनमान उंचावणे गरजा आकांक्षाची पूर्ती करणे, निपुण मनुष्यबळ निर्माण करणे, जीवनाची आव्हाने स्वीकारणे आणि राष्ट्राचे सामर्थ्य वाढविणे ही उद्दिष्टे साध्य होतात. देशाच्या विकासासाठी आणि संरक्षणासाठी प्रत्येक नागरिकाने आपला कर्तव्याचा वाटा उचलला पाहिजे. वैज्ञानिक दृष्टिकोन समोर ठेवून अनिष्ट रुढी, जुन्या अंधश्रद्धा, सांप्रदायिकता, दैववाद यांचे निराकरण करणे हे प्रत्येक भारतीयांचे ध्येय असले पाहिजे. आणि हे ध्येय साध्य करण्याचे स्थान म्हणजे शाळा होय. शालेय अभ्यासक्रमांत सामाजिक शिक्षणाला प्रभावी स्थान आहे. पण माणसान आपली उत्पादक आणि उपभोक्ता ह्या भूमिकेपेक्षा समाजात आपले स्थान कोणते आहे, ह्याचा त्याने जाणीवपूर्वक विचार करावयास पाहिजे. समाजजीवनांत त्याने लोकशाही निष्ठा राखली पाहिजे. एक व्यक्ती म्हणून किंवा गटाचा सदस्य म्हणून समाजाचे आहे त्यापेक्षा बरे किंवा वाईट करणे त्यांच्या हातात आहे याची जाणीव त्याला व्हावयास पाहिजे. जगात कसे जगायचे याची दृष्टी मुलाला दिलीच पाहिजे. म्हणजे मगच त्याला आपल्या भवितव्याचा मार्ग ठरविता येईल. परंतु हे भवितव्य ज्या ग्रामीण भागातील शाळामध्ये घडविले जाणार आहे, तेथील समस्या कोणत्या आहेत ? त्यांचे प्रश्न कोणते आहेत ?त्यावर कांही उपाय आहेत काय? याचा विचार करायचा आहे.

ग्रामीण शिक्षणाची आवश्यकता

भारताचा नागरिक व विशिष्ट राजकीय पक्षाचा सदस्य म्हणून आपले कर्तव्य

बजावताना ग्रामीण नागरिकाला शिक्षणाशिवाय अन्य कोणतीही गोष्ट उपयुक्त होणार नाही. सामाजिक मूल्यांची जाणीव ग्रामीण शिक्षणातूनच होणार आहे. संकुचित, भोळसट व विक्षिप्त धर्मकल्पनांच्या जागी मानवतावादी दृष्टिकोण, नैतिक मूल्ये, स्वातंत्र्य व समता, व्यक्तित्वाचा विकास अशी तत्वे प्रस्थापित करण्यासाठी ग्रामीण शिक्षणाचीच आवश्यकता आहे, प्राथमिक स्तरापासून उच्च स्तरापर्यंत विद्यापीठीय पातळीपर्यंत ग्रामीण शिक्षणाची पुनर्रचना व्हावी ही कल्पना डॉ. राधाकृष्णन् यांनी मांडली. सन १९४९ च्या त्यांच्या अहवालात ग्रामीण विद्यापीठाच्या स्थापनेची आवश्यकता प्रतिपादिली आहे. खेड्याचा विकास होण्यासाठी खेड्यातील जनतेने तेथील नेतृत्व केले पाहिजे. प्राचीन काळी भारतीय खेडी सुसंपन्न होती, स्वावलंबी होती. स्वयंपूर्ण होती. पण ब्रिटीशकाळात परिस्थिती बदलली. सर्व सुधारणाचे केंद्रीकरण शहरात होऊ लागले, विद्यापीठे, महाविद्यालये या सारख्या शैक्षणिक संस्था, निरनिराळे उद्योगधंदे यामुळे शहरांची वाढ झाली व शहरांचा विकास हाऊ लागला. खेड्यातील सुशिक्षित लोक शहरांकडे धाव घेऊ लागले आणि इंग्रजांच्या १५० वर्षाच्या राजवटीत खेड्यांची दैना दैना उडाली. त्यांना प्रेतकळा प्राप्त झाली. यामुळे आपल्या देशाचा प्राण म्हणजे जी खेडी त्यांच्याच गळ्याला नख लावण्याचा पद्धतशीर प्रयत्न झाला. इंग्रजांच्या काळात विशिष्ट समाजातील लोकांचा पगडा होता. सामान्य जनतेचे ते शोषित होते. सामान्यजनतेला अंधारात ठेवून आपण मात्र सुखसोयी भोगणाराचा एक वर्ग होता. १९ व्या शतकात तर महाराष्ट्रात धर्मभोळेपणाचा फायदा घेणाऱ्या एका वर्गाने गरीब दीन दलित जनतेची पिळवणूक सुरू केली होती. त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवले होते महात्मा जोतिबा फुले यांनी हे ओळखूनच शिक्षणाचा प्रसार करण्याचे ठरविले. मागासलेल्या जनतेला शिक्षण दिल्या शिवाय त्यांचा उद्धार होणार नाही हे त्यांना जाणवले होते. आणि म्हणूनच त्यांनी अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केल्या. बहुजन समाजातील खेड्यातील जनतेला शिक्षण देण्यासाठी ग्रामीण भागातील त्यांच्या जातीजमातीचा शिक्षक निर्माण झाला पाहिजे हे त्यांनी आग्रहाने सांगितले आणि तसे प्रयत्न केले. त्यानंतर टागोर–गांधी यांनाही ही परिस्थिती जाणवली. त्यानी खेड्यांची दैन्यावस्था पाहिली. महाराष्ट्रात महात्मा ज्योतिबा फुले, न्यायमूर्ती रानडे. आगरकर, लोकहितवादी इत्यादी समाजसेवकांनी चांगली कामगिरी केली होती. त्याचा विचार समोर ठेवूनच टागोर यांनी श्रीनिकेतन येथे ग्रामीण पुनर्रचनेचा प्रयोग सुरू केला. महात्मा गांधीजीची वर्धा शिक्षण योजना सर्वश्रुत आहेच. या सर्वांचे प्रयत्न एकच होते ते म्हणजे ग्रामीण शिक्षणाची पुनर्रचना झाली पाहिजे.

डॉ. राधाकृष्णन् कमिशन : काही शिफारसी

भारतातील विद्यापीठ शिक्षणाच्या प्रश्नांचा सांगोपांग विचार करण्यासाठी

डॉ. राधाकृष्णन् कमिशनने ज्या क्रांतिकारी शिफारशी केल्या त्यातील कांही महत्वाचे मुद्दे पुढे दिले आहेत.

१) लोकशाहीला पोषक अशा ग्रामीण शिक्षणाचे उद्दिष्ट देशांतील व्यक्तींचा संपूर्ण विकास साधणे हेच राहील.

२) लोकशाही, न्याय, स्वातंत्र्य, बंधुभाव व समता ही आपली उच्च शिक्षणाची ध्येये राहतील.

३) देशातील दीनदुबळ्यांचा विशेष आस्थेने आपणास विचार करावा लागेल.

४) सुसंस्कृत व श्रमीक यांच्यातले अंतर कमी झाले पाहिजे आणि ग्रामीण भागातील बुद्धिमतेचा शहरा ऐवजी ग्रामीण भागालाच उपयोग झाला पाहिजे

५) ग्रामीण विद्यापीठामार्फत सभोवतालच्या समाजाच्या व्यावसायिक गरजा भागून त्यांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

६) ग्रामीण भागातील जनतेत ज्ञानलालसा निर्माण करून तिचे पोषण व वर्धन झाले पाहिजे.

एकंदरीत ग्रामीण जीवन सुखी, समृद्ध व उन्नत करण्यासाठी वेगळ्या ग्रामीण विद्यापीठांची स्थापना करण्यासंबंधी क्रांतिकारक अशा शिफारसी केल्या, कारण प्रचलित शहरी विद्यापीठाकडून वरील प्रकारचे कार्य होत नाही हे स्पष्ट होते.

भारतातील ग्रामीण शिक्षण यशस्वी झाले का ?

ग्रामीण जीवनाची पुनर्घटना करून ते समृद्ध करण्याचा प्रयत्न झाला, ग्रामीण जनतेसाठी उपयुक्त ठरेल अशा प्रकारची शिक्षणपद्धती निर्माण करण्याचे प्रयत्न झाले, ग्रामीण विद्यापीठांच्या स्थापना झाल्या, नवभारताच्या शैक्षणिक क्षेत्रात मोठा बदल घडविण्याचा शिक्षणतज्ञांनी प्रयत्न केला. परंतु आज खरोखर पाहाता ग्रामीण शिक्षणाची योजना सफल झाली आहे काय ? हा एक प्रश्न आहे. सध्याच्या प्रचलित असलेल्या माध्यमिक व विश्वविद्यालयीन शिक्षणामुळे ग्रामीण जीवन समृद्ध झालेले नाही. पुष्कळशा माध्यमिक शाळा शहरांत केंद्रित झाल्या असून विद्यार्थ्यांना नागरी विद्यापीठात प्रवेश मिळविण्यास तयार करणे हाच त्यांचा मुख्य उद्देश दिसतो. हुषार विद्यार्थ्यांत खेड्याबाहेर जाण्याची प्रवृत्ति बळावते. ही प्रवृत्ति वाढीला लागून तरुण सुशिक्षितांना खेडेगावाकडे परत येण्याची इच्छाही होत नाही. भारतातील ग्रामीण जीवनाचा ऱ्हास पुष्कळसा आर्थिक व सामाजिक कारणास्तव झाला हे खरे असले तरी शहरात केंद्रित झालेली सध्याची शिक्षण पद्धती या ऱ्हासाला कारणीभूत झालेली आहे. आज विद्यापीठातून जे पदवीधर बाहेर पडतात त्यांच्याकडून ही अपेक्षा आहे की, त्यांनी खेड्यात गेले पाहिजे. ग्रामीण

जीवन सुधारण्याची व ग्रामीण जनतेला मदत करण्याची अपेक्षा या पदवीधरांकडून केली जाते, त्याना ग्रामीण जीवन अथवा जनता याबद्दल म्हणावी तशी आत्मीयता नाही. म्हणून ग्रामीण विकासाच्या दृष्टीने शिक्षणाची पुनर्रचना करणे आणि खेडेगांवातील तरुणांना ग्रामविकासाच्या कार्याला आवश्यक असलेले ज्ञान व मनोभूमिका निर्माण करून त्यांच्याकडेच या कार्याचे नेतृत्व सुपूर्त करणे आवश्यक झाले आहे.

ग्रामीण भागातील माध्यमिक शाळांचे प्रश्न

ग्रामीण विभागांत काम करणाऱ्या माध्यमिक शाळांचे प्रश्न शहरी विभागातील शाळांच्या प्रश्नाहून भिन्न आहेत, त्यापैकी महत्वाचे प्रश्न खालीलप्रमाणे आहेत.

१) विद्यार्थ्यांच्या आर्थिक परिस्थितीतून उत्पन्न होणारे प्रश्न.

२) ग्रामीण विभागांतील माध्यमिक शाळांचे प्राथमिक शाळांशी सघटन.

३) ग्रामीण माध्यमिक शाळांचे ग्रामीण समाजाशी संघटन.

४) अभ्यासा व्यतिरिक्त शालेय कार्यक्रम.

५) शासनासंबंधी व आर्थिक व्यवस्थेसंबंधी प्रश्न.

६) हुषार मुलांच्या अभ्यासाविषयी प्रश्न.

७) ग्रामीण माध्यमिक शाळांची विद्यार्थ्यांच्या पालनाविषयी कर्तव्ये.

८) ग्रामीण माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या शिस्तीसंबंधीचे प्रश्न.

वरील प्रश्न पाहिल्यानंतर ग्रामीण भागातील माध्यमिक शाळांची जबाबदारी किती मोठी आहे हे लक्षात येते. ग्रामीण विभागातील विद्यार्थ्यांचे पालक बव्हंशी अशिक्षित असतात. त्यांना आपल्या मुलाच हित कशात आहे हे फारसे समजत नाही. त्यांचे शिक्षण कसे चालले आहे हेही त्यांना समजून घेण्याची पात्रता नसते. त्यामुळे ग्रामीण विभागातील माध्यमिक शाळांना अध्यापना व्यतिरिक्त ही उणीव भरून काढणे भाग आहे.

ग्रामीण भागातील मागास वर्गाचे शिक्षण

भारतीय राज्यघटनेत समाजातील दुर्बल विभागाचे (Weaker Sections) शिक्षण व आर्थिक हित याकडे शासनाने विशेष लक्ष द्यावे, सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यापासून त्यांना सांभाळावे, अशी मार्गदर्शक तत्त्वे (Directive Princeples) नमूद केलेली आहेत. (घटनेतील कलमे ४६ आणि १५ (४) अर्थातच शासनाने यासाठी काही खास तरतुदी कराव्यात अशीही कल्पना त्यामागे आहे. भारताच्या या विस्तीर्ण भूप्रदेशांत एकूण निरक्षरता आणि सर्व प्रकारचे आर्थिक सामाजिक मागासलेपण, दैन्य, दारिद्र्य एकवटलेले आहे. स्त्रियांचो निरक्षरता, शैक्षणिक मागासलेपण आणि त्यांचे समाजातील तळचे स्थान ही बाब चिंतनीय आहे. विशेषत: मागास वर्गाच्या म्हणजेच दलितांच्या शैक्षणिक विकासासाठी आज चालू असलेल्या

योजना आणि राखीव जागा. तसेच आर्थिक–सामाजिक विकास व प्रतिष्ठा यासाठी योजलेल्या नोकऱ्यातील राखीव जागा, यातून निघणारे प्रश्न केवळ शैक्षणिक स्वरूपाचे राहिलेले नाहीत.

आजही ग्रामीण भागातील मागासलेल्या वर्गांचे शिक्षण पाहिले तर समाधानकारक प्रगती दिसत नाही.

ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास केव्हा होईल ?

आपल्या देशातील ग्रामीण भाग हा देशाचा प्राण आहे. ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास व्हावा हा आजचा ज्वलंत प्रश्न आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी ग्रामीण उच्च शिक्षणसंस्थांच्या ध्येय धोरणांशी समरस होऊन कार्य करणाऱ्या चांगल्या कार्यकर्त्यांची संख्या वाढली पाहिजे आणि या कार्यकर्त्यांनी ग्रामीण भागातील जनतेशी समरस होऊन त्यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करीत राहिले पाहिजे. तसेच मुलांचो व पालकांचो शहराकडे धाव घेण्याची जी प्रवृत्ती आहे, तिला आळा बसला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील उदासीनता कमी होऊन विकासाला पोषक वातावरण निर्माण होईल. शासनाने देखील ग्रामीण शिक्षणसंस्थाच्या ज्या समस्या आहेत त्या तज्ज्ञाकडून समजून घेतल्या पाहिजेत असे मला वाटते. आज मौनी विद्यापीठासारख्या ग्रामीण भागात उच्च शिक्षण संस्थेत काम करताना मला प्रामुख्याने पुढील समस्या दिसतात.

१) शिक्षण विषयक समस्या २) संशोधन विषयक समस्या ३) ग्रामीण जनता व उच्च शिक्षणसंस्था, संस्थासंबंध याच्यातील सहकार्याबाबत असलेल्या समस्या ४) ग्रामीण भागात नोकरी करण्याची समस्या ५) ग्रामीण विद्यापीठ व शहरातील जवळपासची विद्यापीठे यांचा संबंध या सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी ग्रामीण शिक्षणाची पुनर्रचना झाली पाहिजे आणि या पुनर्रचनेतून ग्रामीण शिक्षण उठून दिसले पाहिजे.

ग्रामीण भागातील जास्तीत जास्त तरुणांनी अशा संस्थेत शिक्षण घेऊन त्या शिक्षणाचा फायदा ग्रामीण भागासाठीच करून दिला पाहिजे; हे तरुणांना एक प्रकारचे आवाहन आणि आव्हानही आहे. ही देशाची हाक आहे. ही ग्रामीण भागातील कोटयावधी बंधूभगिनींची हाक आहे. या हाकेस ओ देणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे आणि भारतासारख्या थोर परंपरा लाभलेल्या या देशातील विद्यार्थी या कार्यासाठी पुढे सरसावल्याशिवाय राहणार नाहीत अशी माझी आशा आहे.

□

ग्रामीण शिक्षणाचे शिल्पकार

डॉ. श्री. रा. आचार्य

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण शिक्षण प्रसाराच्या कार्यासाठी जे चंदनासारखे झिजले, त्यांच्या जीवनकार्याचा डॉ. श्री. रा. आचार्य यांनी घेतलेला हा धावता व बोधप्रद आढावा.

ब्रिटिशपूर्व काळात या देशातील अनेक खेडेगावात परंपरागत घरगुती शिक्षण देण्य ची प्रथा अस्तित्वात होती. यामुळे देशातील साक्षरतेचे प्रमाण बरेच समाधानकारक होते. सन १९३१-३२ मध्ये इंग्लंडमध्ये जी गोलमेज परिषद भरली तिच्या चर्चेत म. गांधीनी भारतीय शिक्षणासंबंधी एक स्फोटक विधान केले. ते म्हणाले. ' सन १९२१ पेक्षा सन १८२१ मध्ये भारतातील साक्षरतेचे प्रमाण बरेच मोठे होते. ' यावरून ब्रिटिश राज्यकर्त्यांनी या देशातील देशी शिक्षणाच्या शाळा पद्धतशीरपणे नष्ट करून टाकल्या असे गांधीजीना सुचवावयाचे होते. अर्थात् त्यावेळचे इग्लंडमधील सुप्रसिद्ध शिक्षण-तज्ज्ञ सर फिलिप् हट्टॉगनी गांधीजीच्या विधानाचा साफ इन्कार केला. त्यावर मुंबईचे ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ प्रा. रा. वि. परुळेकर यांनी महात्मा गांधींच्या भूमिकेचे हिरीरीने व पुराव्यासह समर्थन केले. गावोगावी सातत्याने वाहात असलेल्या या ग्रामीण ज्ञानगंगचा ओघ अशा रीतीने ब्रिटिश राज्यकर्त्यांनी संपुष्टात आणल्यामुळे या देशातील निरक्षरता झपाट्याने वाढू लागली. असे मत शैक्षणिक इतिहासकारानीही नोंदवून ठेविले आहे. या गंभीर समस्येवर उपाय म्हणून बंगालमध्ये राजा राममोहन रॉयनी महाराष्ट्रात म. ज्योतिबा फुले यानी खाजगी प्रयत्नाने लोक शिक्षणाच्या प्रसारास जोराची चालना दिली

महात्मा जोतीराव : लोकशिक्षणाचे जनक

म ज्योतीबा फुले प्रखर बुद्धिमत्तेचे व क्रांतिकारक अशा समाज सुधारणांचे भोक्ते होते. ते ज्या समाजात जन्मास आले त्या बहुजन समाजाची सुख दुःखे, दीन दारुण अवस्था त्याना चांगलीच अवगत होती. महाराष्ट्रातील परकीय मिशनऱ्यांच्या शैक्षणिक सेवा कार्याने ते प्रभावीत झाले होते. समाजातील असमानता, अन्याय व

दलित समाजाबद्दलची अमानुष वृत्ती या गोष्टीबद्दल त्यांच्या मनात अत्यंत चीड निर्माण झाली. या मागासलेल्या समाजास शिक्षण देवून जागृत करणे हाच सर्व अन्यायावरील एकमेव उपाय मानून त्यानी स्त्रीशिक्षणापासून आपल्या कार्यास सुरुवात केली पुण्यात इ. स १८५१ मध्ये अनेक मित्रांच्या सहाय्याने ज्योतीबानी एक मुलींची शाळा स्थापन केली व आपल्या धर्मपत्नीच्या सहकार्याने या शाळेची प्रगती घडवून आणली.पुढील वर्षी, म्हणजेच सन १८५२ मध्ये त्यानी अस्पृश्यासाठी दोन शाळा स्थापन केल्या. सरकारचे त्याम अनुदानही मिळाले त्या काळच्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीनही ज्योतीबानी ही क्रांतिकारक सुधारणा घडवून आणली. ज्योतीबा फुले नुसत्याच शिक्षणसंस्था क ढून स्वस्थ राहिले नाहीत तर त्यानी मागासलेल्या समाजास प्रगती करण्याची नवी दृष्टीहा दिली. 'ज्योतीबा फुले हे देशातील सामाजिक गुलामगिरीविरुद्ध हल्ला चढविणारे पहिलेच भारतीय होत' असे गौरवोद्गार सुप्रसिद्ध विचारवंत तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांनी काढले आहेत शिक्षणप्रसाराबद्दल मुळीच उत्साह वा आस्था नसलेल्या त्या काळात ज्योतीबानी शिक्षण सार्वत्रिक व सक्तीचे करावे असा धाडसी आग्रह सुद्धा सरकारपुढे धरला. त्यावेळी भारतात आलेल्या हंटर कमिशनपुढेही याच आशयाची साक्षही त्यानी निर्भीडपणे दिली. यानंतर सुमारे अर्धशतक लोटल्यावर ना गो. कृ. गोखले यानी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा जो आग्रह भारत सरकारपुढे धरला त्याचा पायाच ज्योतीबानी घातला होता असे म्हटल्यास हरकत नाही. या कामी त्यानी दाखविलेली नीति धर्म व अचूक दूरदृष्टी ही केवळ अतुलनीयच म्हटली पाहिजेत.

रयत : शिक्षणकार्याची गंगोत्री

भारतीय स्वातंत्र्यापूर्वी सुमारे शंभर वर्षे ज्योतीबानी ज्या शिक्षणप्रसार कार्याची मुहूर्तमेढ रोविली त्यास निरनिराळ्या बाजूनी अंकुर फुटले व शिक्षण प्रसाराच्या कार्यात अनेक विचारवंत पुढे सरसावले. प्रा. धों. के. कर्वे यानी स्त्री शिक्षणासच आपले संपूर्ण आयुष्य वाहिले, व एका मोठ्या उपेक्षित कार्यास जोराची चालना दिली. म. ज्योतीबा फुल्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन डॉ आंबेडकर, महर्षि शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ. पंजाबराव देशमुख इत्यादीनी आपापल्या परीने शिक्षणप्रसाराच्या कार्यास मोठीच चालना दिली. पश्चिम महाराष्ट्रात कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपल्या अविरत प्रयत्नाने शाळा–कॉलेजाचे सर्वत्र जाळेच पसरविले स तारची रयत शिक्षणसंस्था ही या कार्याची गंगोत्रीच मानावी लागेल. बहुजन समाजास खडबडून जागे करण्याचे कामी त्यांनी केलेले प्रयत्न फारच मोलाचे मानावे लागतील. हीच गोष्ट डॉ. पंजाबराव देशमुख यानी पूर्व–महाराष्ट्रात करून दाखविली. श्री शिवाजी शिक्षण सोसायटीची अमरावतीस स्थापना करून मागासलेल्या व गरजू अशा ग्रामीण भागातील लोकांची शिक्षणाची सोय करून डॉ. देशमुखानी अज्ञानात राहिलेल्या पूर्व महाराष्ट्रांतील जनतेस खडबडून जागे केले. मात्र स्वातंत्र्योत्तर काळात या कार्यास बराच वेग आला.

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात छोट्या मोठ्या अनेक शैक्षणिक संस्था भराभर निर्माण झाल्या व निरलस कार्य करणारे कार्यकर्ते ग्रामीण भागातूत पुढे सरसावले अर्थात् हे कार्य सोपे मात्र नव्हते. अनेक अडचणीना तोंड देऊन ग्रामीण जनतेत ज्ञानप्रसाराची साधने निर्माण करणे फार अवघड कार्य ठरू लागले. अशा नेकीच्या व त्यागवान कार्यकर्त्यात पुणे जिल्हा शिक्षण–मंडळाचे अनेक वर्षे सन्मानीय कार्यवाह असलेले मा. श्री. बा. रा. घोलप यांना मानाचे स्थान प्राप्त झाले आहे.

बाबूराव घोलप : एक त्यागमय जीवन

सन १९४१ मध्ये पुणे जिल्हा शिक्षण मंडळाची स्थापन झाल्यापासून मा.श्री.घोलप यांचा या मंडळाच्या कार्याशी अत्यंत घनिष्ट संबंध आलेला आहे. व्हॉलंटरी शाळा सरकारने स्वत:कडे घेतल्यानंतर या जिल्हा मंडळाने आपला मोर्चा ग्रामीण भागात एकामागून एक माध्यमिक शाळा स्थापन करण्याकडे वळविला. या अवघड कामात श्री. घोलप यांना सिंहाचा वाटा द्यावा लागेल. सतत चाळीस वर्षे एकच अवघड कार्य निष्ठेने व चिकाटीने करीत राहाणे व ते करताना मानमरातब, सत्तास्थान याचा बिलकूल हव्यास न बाळगणे हे एक असिधाराव्रतच समजावे लागेल. नुसत्या शिक्षणसंस्था काढून त्या चालविणे हे देखील एक संकुचित कार्यच मानले जाते. शिक्षण–प्रसाराबरोबर मुलांचे शीलसंवर्धन, समता व न्याय प्रतिष्ठेचे महत्व धर्मनिरपेक्षता व उच्च प्रकारची देशसेवा इत्यादी जीवनमूल्ये नव्या पिढीत बिंबविणे याही गोष्टी श्रेष्ठ शिक्षण कार्यकर्त्यास कराव्या लागतात. ग्रामीण भागातून उदयास येणाऱ्या नव्या पिढीस जीवनाचा नवा आशय समजावून देऊन त्यांच्यातील सुप्त शक्ती व कर्तृत्व याचा कस मागोवा घ्यावा याचे यथार्थ मार्गदर्शन करणे आवश्यक असते. गेली कित्येक वर्षे श्री. घोलप यानी याच कार्यास वाहिली आहेत. गरीब, गरजू विद्यार्थ्यास सतत मदत करण्याचे व त्याना प्रोत्साहन देण्याचे कार्य नित्याचेच होऊन बसले. पुण्यातील अनेक छोट्या मोठ्या शैक्षणिक संस्थांत त्यांचा घनिष्ट संबंध आलेला असल्यामुळे त्यांच्या समृद्ध व मौलिक अनुभवाचा फायदा अनेकांना मिळत असतो. पैसा किंवा प्रतिष्ठा यांच्यामागे न धावता या गरीब देशातील बहुजनाच्या जीवनात सातत्याने प्रबोधन कार्य करून श्री. घोलप यानी थोर भारतीयाची परंपराच निष्ठेने पुढे चालविली आहे. त्यानी आपल्या त्यागमय शिक्षणकार्याने जीवनाची सफलता व यथार्थताच सिद्ध करून दाखविली आहे. म्हणूनच त्यांचे जीवनकार्य हे नव्या पिढीस सतत स्फूर्ती देत राहील यात शंका नाही.

□

माझ्या कल्पनेतील स्त्रीशिक्षण

डॉ. सरोजिनी बाबर

एक स्त्री शिकली तर सारे घरदार शिकल्यासारखे असते. आधुनिक जीवन मूल्यानी पुलकित झालेल्या स्त्री-जीवनाला शिक्षणाचा गंध लाभला पाहिजे. डॉ. सरोजिनी बाबर यांनी जीवंत अनुभवानी नटलेल्या व रसरशीत ग्रामीण भाषेतील स्त्री-शिक्षण विषयक मांडलेले हे विचार चिंतनीय आहेत

' छ, छे ! पाटीदप्तराच्या ओझ्यानं पाक वाकून जास्तोवर आणिक प्रश्नोत्तरांची मालिका हातावेगळी करताना मान मोडोस्तोवर बैठक मांडून लिहिणाऱ्या हाताची बोटं चेपस्तोवर आम्ही कधी शाळा केलीच नाही. आमची पहिली शाळा घरातली. वडील माणसांच्या हाताखालची. मग चावडी जवळच्या इमारतीतली.आमचं शिक्षण आटोपशीर. मर्जीमाप असणाऱ्या वहचा पुस्तकांचं म्हणं अगर पाटीदप्तरांचं म्हणा... पोषाखाची पण जबरदस्ती नव्हती... आताच्या पोरोना तऱ्हेतऱ्हेचा पोषाख पाहिजे आणिक वर अरेरावीचं बोलणं !... आमच्या आवाक्या बाहेरचं हे शिक्षण .. पोरीला सैपाक नको. मर्जीमाप रहाणं नको... अभ्यासानं काया वाळून जाती ते शिक्षण करायचं काय... कामापुरतं लिहिणं वाचणं आलं बास झालं ! पोटभर पोरी शिकल्या की, त्यांच्या लग्नापायी-घरदार गहाण टाकायची वेळ येती ! ... आणिक शिकून सवरून नोकरीला लागलेल्या पोरीला घरचा उद्योग नको असतो असंच नाहीतर तो कमीपणाचा वाटतो हचाची काय वाट ? नुसती बुकं शिकून भागतं काय ? कागदावर छापलेलं डोक्यात शिरतं का नाही बघितलंच काय कुणी कधी ? अवो माणूस शिकून शहाणा झाला तर त्या शिक्षणाला किंमत! ... कळलं ... ?... आमच्या पोरी सातवीपर्यंत शिकल्या की, बास ! ... त्याला नसती पंख फुटायला नकोतच ?...'

माझ्या समोर बसलेल्या त्या बाईनी-चांगुणा मावशींनी-मला असं मनसोक्त बोलून घेत त्या दिवशी डोळे वटारून विचारलं, ' भुईतून वर आली नाही पोरगी तवर अंगुपती कारभार करावा म्हणती म्हणजे ?... घरातल्या माणसाला न विचारता सायकलवरनं

गावोगाव फिरायचं एकलीनच ?... घरातली शाळा बंद करून ही तुमची शाळा काय चाटायची काय दिवाणसाब ?...'

त्यामुळं मी हादरून गेले. काय उत्तर देऊ ? त्यांच्या आवतीभोवती त्यांना न परवडणार घडून जात होतं. त्यातला राग त्या माझ्यापुढं ठेवीत होत्या त्यांचं मन मोकळं होत होतं खरं पण त्यामुळं मी भांबावून जात होते. वयात आलेल्या त्यांच्या पोरीबाळी सायकली सोडून दणाट पळत होत्या! ... शेताची वावरं पालथी घालीत होत्या. पै पावण्यांचे दरवाजे पुजीत होत्या... गावातल्या टोळ भैरवांना त्या कारणानं फावत होतं! ... या गोष्टीचं सगळं खापर त्यांनी आजच्या शिक्षण पद्धतीवर फोडलं होतं! ... त्या सपाटून रागावल्या होत्या. चिडल्या होत्या... उसासत होत्या ..

' दिवाणसाब, अवो, शिकवा पोरींला पोरागत पण ऐपत वाढवा की ? घाला की त्येंच्या मनगटात जोर ! ... वाढवा की त्यांची सोशिकता ! ... धरूद्यात की हिंमत आपल्या जिवाव जगायची ? ...काय ? ... नुसत्या पॉवडरीच्या नखऱ्यानं अगर सिनेमातल्या पोषाखानं कुठं शोभा येती काय... नकली भावल्या का करताय पोरींला?... अवो, चार घागरी पाणी भरा म्हटलं तर शाप नाही म्हणत्यात ! ... म्हणजे हा कसला शहाणपणा ... उलटा शब्द येतोच कसा व्हटावर ?...' चांगुणा मावशींनी माझं मनगट धरीत दात ओठ खाऊन मला विचारलं तशी मी बोलून गेले, ' असलं घरच्यांनी शिकवायचं असतं ! हे काम शाळेचं नाही? ...'

बाप रे बाप रे ! माझ्या ह्या उत्तरानं त्या एवढ्या खवळल्या की, माझ्या अंगावर येत त्यांनी मला जाब विचारला, ' तुमच्या शिक्षणानं माणुसकी वाढावी की पाकच मरून जावावी? ... '

''का ? काय झालं ? ' मी पण मग खुलासा मागितला.

' ल्योक डॉक्टर झाला म्हणताना सुनबी डॉक्टर केली... मी म्हणते दवाखाना तिनं ताब्यात घ्यावा. शेतवाडी न घरबी ताब्यात घ्यावं म्हटलं तर जमावं कसं ?... शेतीवाडी कारणानं हातात खेळतेला पैसा दिला पाहिजे. पण तो पैसा आपल्या राबणुकीने उभा करणारी माणसं नकोत म्हणजे ? त्यांना काय कळत नाही ?... जीभ उचलली कशी असं बोलताना हिची ?...'

' कुणाचं सांगताय ?'

' असू परी कुणाचंबी ! ... तुम्हाला हे खपतं ?

' नाही !'

' अस्सं ! आता कसं बोललासा ; अवो, तुम्ही एवढं शिकला सवरलासा पण पण तुमचं तोंड सरळा शब्द करोत राहिलंय. माणुसकीचं वळण सोडलं नाही. तुम्ही! ...

वडीलमाणसांचा मान राखीत आलासा. ज्याची त्याची पायरी वळखूनबी सगळ्याला जवळ करताय तुम्ही दिवाणसाब. तुमचं शिक्षण आम्हाला परवडतंय,पण अर्ध्या हळकुंडानं पिवळं करतले नाही परवडत ! ... इंग्रजी शाळंत पोरीला पाठवायचं एस्. टी. नं ? कबूल एक डाव हे.पण ती एस्. टी. गाठायची म्हणजे हिला दूध तापवून कपात ओतून ती कपबशी आम्ही हातात द्यायचो काय ? ... असली बाजीरावकी आम्हाला खपणार नाही ! एक डावच सांगतीया... आमाला कुणाचा भार नकोय? ...

' मी सांगीन त्या मुलीला. तिचा पत्ता ?'

' तुमच्या मामाची लेक ती सुगंधी. ही गोष्ट एकल्या पोरीची नाही. घरोघरी त्याच परी म्हणा पोरी ऐकत नाहीत ! ' गप ग तूं ! ' म्हण त्यात ! ... शिकून सवरून हेच ऐकायला लावणार असतील तर बास असली शाळा ! गुरूजींला कळूनी का ?... पण त्येचं तरी चित्त ठिकाणाव असतं काय शाळेत ? '

चांगुणा मावशींचा आवाज आणखीनच खवळला. त्या कारणानं मी गप्प राहिले. ' सगळीकडं असं नसतं ' म्हणायचा मोह आवरला. त्यांच्या पाठीवरून उगाचच हात फिरवला. त्यासरशी त्यांनी माझ्यावर आणखीनच तोंडसुख घेतलं, ' कोण तरी घरातलं मेल्यागत समजूत घालताय म्हणा की ?... अशानं जमणार नाही !... उगं आपली जीभ उचलली न् लावली टाळ्याला म्हणजे ?... मुलीला शिकवा म्हणं. कशाला ? धडाचा यिगूड करायला का बसला संसार उधळून लावायला ?... असलं त्या ऐपतीत भागवागचं कसं ते शिकवा पहिलं ? मग बाकीचं !... '

घडल्या गोष्टीच्या या आठवणीनं माझ्या मनात धुमाकूळ घालून सोडलावता तरी मी बसलेली रेल्वेगाडी जायची तशी सुसाट चाललीवती. माझ्या आवतीभोवती बसलेल्या बायकांना, पुरुषांना, आळीपाळीनं न्याहाळीत मी माझ्याच मनाला शांत हो म्हणत होते... आजकालच्या स्त्रीशिक्षणावर तोंडसुख घेतलेल्या मंडळीवर बुरसटलेल्या विचारसरणीचे तुम्ही आहात असा आरोप करू नका म्हणून स्वतःलाच बजावीत होते.

' मुलगी शिकली की, डोक्यावर बसते ' या भीतीनं वऱ्हाडातल्या शेतकऱ्यांनी आपल्या पोरींना शाळेत घातलंच नव्हतं. त्यातल्या विचारात गुरफुटून गेलवते म्हणून मग शेजारी बसलेल्या एका बाईना मी सहज विचारलं, ' घरी कोण कोण आहे आपल्या '... तशी ' कशाला पाहिजेल ? ' असा त्या बाईनी मलाच उलटा प्रश्न केल्याकारणानं मी बोलून गेले, ' सहज विचारलं. ' त्या सरशी त्यांनी उत्तर दिलं, ' लग्नाचं कोणी नाही !... ' आणिक माझ्याकडं पाठ फिरवून त्यांनी तपकिरीची चिमट ओढलीं. मला खुळ्यागत झालं. असला प्रसंग माझ्यावर त्यापूर्वी कधीच आला नव्हता. म्हणताना माझं खर्रकिनी उतरलं तोंड बघून समोरच्या बाकाबर बसलेल्या दुसऱ्या एका बाईनी विचारलं, ' लोकांच्या पंच्याती करूनी आपलं पैलं बगावं.

जिथल्या तिथं जास्तानी हाय न्हाई त्येची खात्री करून घ्यावी. खरं का खोटं ? '

मी काय उत्तर करू त्यातलं काहीच उमगलं नव्हतं तर ! म्हणून झाला अपमान मुकाटचानं गिळीत विचार केला की, ' शिक्षणामुळं शहाणपण येतं त्याची इथं गरज आहे. एखादी दुसरी बाई कशीही वागली तरी सगळ्याच मुलीबाळींनी शिकू नये ही खुळी समजूत गेली पाहिजे. एक स्त्री शिकली तर सारं घरदार शिकतं म्हणतात. पण ते काय शिकतं न त्याला ही काय शिकवते याचा अभ्यास झाला पाहिजे...'तशी मग मी तुम्हाला काय म्हणायचंय असं डोळचांनीच खुणाववीत त्या बाईंकडं पाहिलं तर त्यांनी काय म्हणावं ?... म्हातारी माणसं शिकल्याल्या पोरीला नकूशी व्हावीत ? कुठं जावावं त्येंनी? जलमभर हचांचो उसाभर केली त्येचा पांग फेडावा असा ? '

' कुणाचं म्हणताय ? ' बोलल्या गोष्टीचा उलगडा व्हावा म्हणून मी डोळचांनीच विचारपूस केली, तशी फणकाण्यानं उत्तर आलं, ' तुमच्या मावशीची लेक ! '

' कोण ? कमळी ? '

' हां हा कमळीच ! '

' तिनं काय केलं ? '

' काय केलं ? काय केलं न्हाई विचारा ?... सासू सासन्याला वायली न्हावा म्हटली !... फौजदारीन झाली म्हणून हयो नवरा ? '

त्या बाईच्या या बोलण्यानं राग यायच्या ऐवजी मी हसले. घडली गोष्ट ठाऊक होती म्हणून सांगून टाकलं ' तसं नाही. तुमचा गैरसमज झालाय. '

' मजी ?.. फौजदारीन झाली मजी लई शिंग फुटली काय तवा ? '

' ऐका. नीट कान देऊन ऐका. '

भैरीबैरी न्हाई मी ? '

' म्हणूनच सांगते ऐका. '

' सांगा म्हनं !... नीट कान दिलाय '

' ऐका तर. ती कमळी फौजदार आहे स्वत: ! '

' असंल !.. बरं मग ? '

' तर तिला जरूरीच्या कामावर वेळी अवेळी जावं लागतं. म्हणून तिनं सासूसासन्यांना आपल्या घरी रहा म्हटलं. शेतीवाडीचं बघा म्हणाली न् नवन्याला पण त्यांच्यांकडचं ठेवलंय ! '

' हचेला काय शाणपणा म्हंत्याती ? '

' अर्थात ! ... म्हातारपणी मुलगा जवळ असल्यावर आणखी काय पाहिजे ? शिवाय तो वकिली करतोय रोज जाऊन येऊन तालुक्याच्या गावी... तिनं स्वत च्या मुलाला पण ह्यांच्या जवळ ठेवलंय ! ठाऊक आहे ना ?'

' उसाभरीला कहार आनीक ह्यो वर ! ... अशी कुठं सून असती काय ?'

' असायलाच पाहिजे. ' मी असं ठासून सांगितलं, इतक्यात सातारा स्टेशनवर गाडी थांबली म्हणताना डोकावून पाहिलं तर ' मावशी ss ' असा पुकार करीत कमळी फौजदाराच्या वेशात धावत आली. भराभर वर डब्यांत चढली. तिनं मला वाकून नमस्कार केला न् म्हणाली कशी, ' हा डबा घे. जेव तू वाटेत. आणिक हा पाण्याचा तांब्या. सांभाळून जा.'

त्या उप्पर मी काही बोलण्यावर तेवढ्यात ती झरंकिनी ' येते ' म्हणून डब्यातून खाली उतरली... भराभरा पळाली... त्या गाडीनं कुणी मिनीस्टर चालले होते त्यांच्या दिमतीला धावली... आपल्या कामावर गेली...

तिला बघून त्या बाई हाबकल्या. ' आ ' वासून बघत राहिल्या. तशी मी त्यांना म्हटलं, ' तुम्ही बोलत होता तीच ही कमळी ? ' त्या सरसी खिडकीतून बाहेर डोकावीत त्यानीच बोलणं केलं, ' अव्वान्...! चवळीच्या शेंगगत हालतीया ! ... आमच्या सुना नुस्त्या मूस्त्यागत ! जाम हालायच्या न्हाईत्या ! ... तुमाला भाकरीटुकडाबी आणलाय की ? ...'

' बघा तुम्हीच ! उगाच नाव ठेवीत होतात घर कसं छान ठेवलंय बघा जावा ! सारं लख्ख... लख्खलख्ख न जिथल्या तिथं. सासू सासऱ्याच पण झक्कास बघते... सैपाकाला बाईमाणूस ठेवलीय, झाडा लोटायला गडी आहे... बघून तर या ! ... ' मी पण मग ठासून बोलले. तोवर गाडी सुरु झाली... कमळीनं लांबूनच हात हालवीत मला पत्र टाक म्हटलं ... माझा जीव खाली बसला ...त्या बाईनी पण मग आपली समजूत, घातली ' हे ठाव असाल्याव बोललं वो कोन? ... मला असली सून असती तर ? फुलागत ठेवली असती न् पाक घरदार स्वत्ता बगीतलं असतं ! ... हे ऐकून माझ्या जिवाला बरं वाटलं, माझा मनमोर खुशीनं हालला डुलला...

कमळी बी. ए. झालीवती, शरीरानं दणदाकट तर फौजदारकी पत्करलीवती, खेळात भाग घेतलेला शिकताना तर सहजी निवड झालेली... पण मुळातच माणुसकीनं वागायचा स्वभाव म्हणताना सगळं चोख निभावून नेलंवतं.

माझं म्हणणं बाई जेवढी अधिक शिकेल तेवढी तिनं माणुसकी अधिक सांभाळावी. रीतभात नीट पहावी. वडीलधाऱ्यांची मन सांभाळावीत, स्वतःच्या मनाला घटकाभर मुरडकानोला खायला द्यावा, आपल्या वागण्यानं घरदार जिकावं, कारण तिला कळतं, समजत. समजून घ्यायची अक्कल आलेली असते. शहाणपणाचा अर्थ उमगलेला असतो.

तर माझं म्हणणं, शिकायचं तर पुरतं शिकावं बाईनं. स्वतःला समजावून घेत आपल्या सामर्थ्याची पारख करून घ्यावी. आपल्या जिवावर जगायची हिंमत बाळगावी. दुसऱ्याचं मन ओळखून त्याला बोचणार नाही असं वागणं-बोलणं ठेवावं. अंग मोडून पडेल ते काम वेचावं, आपल्या मुलाबाळांना तोच कित्ता गिरवायला लावावा. त्यांना कुणी नावं ठेवणार नाही. उलट त्यांचा सल्ला लोकं मानतील !

पण अर्धवट शिकलेल्यांनी बेजबाबदार वर्णन केलं की, सगळंच मुसळ केरात जातं न् मग बाईनं शिकूच नये या पराकोटीला माणसं जातात !

म्हणून आमचं म्हणणं बाईनं आपलाच आब राखायची जिद्द बाळगावी. दुसऱ्यांनी कसं वागावं यापेक्षा आपणच कसं वागावं यावर अधिक भर द्यावा. आपण होऊन आपल्याच मनाचा कानोसा घेत इतरांना शहाणं करायचा विडा उचलावा.

असं झालं की, समाजमनाचा तोल जाणार नाही. मुलींच्या शिक्षणाचे वाभाडे निघायचे नाहीत. उलट जग त्यांचाच उदो उदो करील. नव्हं खरं का खोटं ?

पण सर्व सामान्य बाईला न् जाणत्या स्त्रीला हे कळेल न् वळेल तेव्हाची गोष्ट ना!

□

प्रौढ शिक्षण : दिशा आणि ध्यास

प्राचार्य रा. तु. भगत

साक्षरता म्हणजे संपन्न समाज जीवनाचा पायाच आहे. सर्वांगीण समाज सुधारणेसाठी प्रथम जाणीव-जागृती झाली पाहिजे. खऱ्याखुऱ्या समाज-परिवर्तनाचे मूळ साक्षर, सुसंस्कृत, स्वावलंबी व सेवाभावी मनुष्याच्या जडण घडणीत आहे.

शिक्षणास आपण समाज सुधारणांचा पाया मानतो. शिक्षणाने ज्या समाजाची सुधारणा घडवून आणावयाची तो समाजच गेली शेकडो वर्षे गरीबी, अज्ञान आणि रोगराईमध्ये पिचत पडला आहे.अशा या 'गरीबांना कोणी वाली नाही' म्हणून पहिल्यांदा महात्मा फुलेनी टाहो फोडला. साऱ्या समाजाला ज्ञानाचे डोळे लाभल्या शिवाय पारतंत्र्याचे साखळदंड तोडता येणार नाहीत आणि समता, स्वातंत्र्य आणि बंधुभावाचे वारे वाहू लागणार नाही, याबद्दल महात्मा फुलेना विश्वास वाटत होता. आज आपणास स्वातंत्र्य मिळालं. परंतु महात्मा फुलेनी शिक्षणातून समाज सुधारणेची जी क्रांती सुरू केली होती, ती अपुरीच राहून गेली कारण आजही आपल्या देशात साठ-सत्तर टक्के समाज निरक्षर आहे. त्यामुळे हा समाज गावातील सावकऱ्यांच्या लबाडीला बळी पडत आहे, मूल व्हावे म्हणून देवाला नवस करीत आहे, मूल झालं म्हणून देवापुढे बकरं कापीत आहे. आजारपणात मांत्रिकाने दिलेले दोरे-गंडे बांधीत आहे, मरी आईचा गाडा आला म्हणून तिची नारळ-चोळीने ओटी भरत आहे. कडकलक्ष्मीचा कोप होईल म्हणून सूपभर जोंधळे आणि जुने कपडे देत आहे, गावात नंदीबैल आला म्हणून त्यास ' यंदा पाऊस पडेल का ' असे विचारत आहे, भूत बाधा होऊ नये म्हणून दंडावर अंगाऱ्याची पेटी आणि गळचात ताईत बांधत आहे, सुख-समाधान लाभावे म्हणून सत्यनारायणाची पूजा घालत आहे, शिवाशिव झाली म्हणून आंघोळ करीत आहे, डोक्यावर कावळा बसला म्हणून कोणीतरी मेल्याचं सोंग करून रडत आहे, कोणी तरी आपलं पत्र वाचून द्यावे म्हणून दिवसभर त्याचं काम करीत आहे, वाटेल ते खाऊन-पिऊन भर रस्त्यावर दंगामस्ती करीत आहे, कधी जमिनीच्या एका काकरी पायी कपाळ रक्तबंबाळ करून घेत आहे. आणि तुझा सिदोबा तर माझा जोतीबा म्हणून भेद मानत आहे, अशा

अनेक भेदांनी, रुढींनी आणि खोडींनी या समाजाची मान मोडली. आणि म्हणूनच हा निरक्षर समाज जसा काल होता, तसाच आज आहे आणि उद्याही तसाच राहण्याची फार मोठी भीति आहे. आणि याचसाठी या सर्व निरक्षर लोकांना चांगले दिवस यावेत, म्हणून प्रौढ शिक्षण कार्यास फार मोठ्या पल्याच्या नजरेनं पाऊले उचलली पाहिजेत, असे मला वाटतं.

शिक्षण : एक वरदान

आपल्या देशातील पंधरा ते पस्तीस या वयोगटातील जवळ जवळ दहा कोटी प्रौढांना शिक्षणाचो दारे उघडी करुन द्यायची आहेत. पिढ्यान पिढ्या ज्यांच्या घरात कधी ज्ञानाचा दिवा लागला नाही, त्यांना ज्ञान प्रकाशात आणावयाचे आहे, दारिद्र्य हेच ज्यांच्या पाचवीला पुजलेले आहे, त्यांना शिक्षणाचे महत्व पटवून द्यावयाचे आहे. अडाणी पणामूळे जो गरीब झाला, गरीबीमुळे जो भयभीत झाला, भीतोमुळे जो मागासला, तो मागासलेपणाचे पांढरे फटफटीत कपाळ घेऊन तो आज आपल्यापुढे उभा राहिला आहे. शेकडो वर्षे ज्याच्याकडे कधी मायेने, कधी प्रेमाने, कधी आपुलकीने आणि कळकळीने पाहिलेच नाही असा हा 'दरिद्र नारायण' आहे. आज जग किती तरी पुढं गेलं असलं तरी देखील तो वाळूत चोच खुपसून बसलेल्या शहामृगा सारखा दिसतो आहे. गरीबी हा शाप असेल पण शिक्षणातून सुखी होण्याचं ते एक वरदान आहे, असा विश्वास आता या कोटयावधी गरीबांच्या मनात या प्रौढ शिक्षणाच्या कार्यक्रमातून निर्माण केला पाहिजे

ज्ञानगंगेचा जनगंगेशी संगम घडावा

'ज्यांचे हृदय गरीबासाठी द्रवतं तो महात्मा होय' असं स्वामी विवेकानंदानी आम्हास सांगितलं शेकडो वर्षांपासून शिक्षण न मिळाल्यामुळे गोरगरीबांची जी गळचेपी चाललेली होती ती पाहूनच महात्मा जोतिरावांनी गरीबांच्या शिक्षणासाठी पहिली साद घातली. महात्मा जोतीरावा पासून कर्मवीर भाऊराव पर्यंतच्या सर्व समाज सुधारकांनी या अडाणी गरीब माणसाला शिक्षण देण्यासाठी निरलस पणे काम केलं. कारण अडाणी बांधवांच्या घरादारापर्यंत शिक्षण गेलं नाही तर त्यांच्या मनात 'समजुतीचे जग' निर्माण होणार नाही, त्यांच्या राहणीमानाला सुधारणेची साथ मिळणार नाही, त्यांच्या परिश्रमाला धनीपणाची जोड मिळणार नाही आणि त्यांच्या दुःखाला कधीच सुखाचा स्पर्शच होणार नाही,हे त्या महात्म्यांनी ओळखलेलं होतं. 'निरक्षरता हा आपल्या देशाला लागलेला कलंक आहे' असे सांगून महात्मा गांधीनी प्रौढ शिक्षण कार्याला नवी कलाटणी दिली त्याप्रमाणे चौफेर प्रयत्न सुरु झाले. लोकांना ज्ञानी करुन सोडण्याची एकच लाट उसळली आणि म्हणून प्रौढ शिक्षण ही तर आपल्या देशाची आजची गरज होऊन बसलेली आहे. आपला देश हा खेड्यापाड्यांचा देश आहे. म्हणून खेड्यांतला सर्व समाज ज्ञानातून जागा झाला पाहिजे, शिकला पाहिजे. तो फक्त शिकला म्हणजे शहाण

झाला असे म्हणता येणार नाही, त्यास वाचता आलं पाहिजे. वाचलेलं लिहिता आलं, पाहिजे, लिहीलेलं समजलं पाहिजे, समजलेलं कृतीमध्ये आणता आलं पाहिजे, कृतीमध्ये कौशल्य संपादन केलं पाहिजे.मग असं कौशल्य सहज अंगभूत वळण पडून जाईल. त्यामुळं त्यास जीवनाचा खरा खुरा अर्थ कळेल, साक्षरतेपेक्षा जीवनाची सार्थकता अधिक मोलाची आहे. याची साक्ष पटेल. साक्षरता हा सुखी जीवनाकडे जाण्याचा एक मार्ग आहे, याची खात्री पटेल. मी समाजाचा एक घटक आहे.समाजामुळेच मी जगतो आहे. समाजाचे सुख–दुःख हेच माझं सुख–दुःख आहे. समाजासाठी जगण्यातच माझ्या जगण्याचं सार्थक आहे. अशी ही सामुदायिक जीवन जगण्याची उर्मी आकार घेऊ लागेल. समाजाकडून एक नागरिक म्हणून मला काही मिळावे हा माझा हक्क आहे. समाज सुखासाठी एक नागरिक म्हणून मला काही द्यावे लागणार हे माझं कर्तव्य आहे अशी ही जाण प्रत्येक प्रौढाच्या ठायी निर्माण होणे आवश्यक आहे. अशी सामाजिक जाण जन्माला आली की साक्षरतेच्या पायावर कौशल्यप्राप्ती करता येईल, स्वाभिमानानं आणि स्वावलंबानं जगता येईल. मग आपण शिकण्यासाठी शिकत आहे, याचा विसर पडून चांगले जगण्यासाठी शिकत आहोत ही जाणीव जागी होईल. प्रौढ शिक्षण वर्गाकडे सहज पणे पाऊले वळतील, काही शिकण्यासाठी काही अनुभव घेण्यासाठी काही अनुभव देण्यासाठी, काही करण्यासाठी, काही उभारण्यासाठी काही पाहण्यासाठी आणि यातूनच काही परस्पर आनंद निर्मितीसाठी. अशा या सहशिक्षणांतूनच सहज शिक्षण घडत राहावे हीच या प्रौढ शिक्षणाची खरीखुरी उज्वल दिशा आहे, असे मला वाटते. अशा सहशिक्षणातून सामूहिक विचार आणि भावना बळावत जाईल. परस्पराविषयी प्रेम आणि आपुलकी निर्माण होईल. परस्पराविषयी वाटणाऱ्या ममतेकडून समतेकडे जाता येईल. यासाठी समाजाच्या तळातल्या माणसापर्यंत ही ज्ञानगंगा पोहचली पाहिजे. ज्ञानगंगेचा व जनगंगेचा खऱ्या अर्थाने जेव्हा संगम होईल तोच राष्ट्रीय सुदिन समजला पाहिजे.

अडाणी आई धर वाया जाई

शिक्षण ही एक शक्ती आहे. ती समाजातील मूठभर लोकांच्या हातात एकवटून चालणार नाही. ढीगभर अडाणी लोक व मूठभर शिकलेले लोक जिथं असतील तिथ समता राहाणार नाही, आणि म्हणूनच शेकडो वर्षापासूनच शिक्षणाची पाणपोई सर्वासाठी खुली ठेवली पाहिजे होती. कारण शिक्षण ही एक प्रकारची मानवी गुंतवणूक आहे. या दृष्टीने शिक्षण म्हणजे एक अक्रोडाचं झाड ठरतं–कारण ते पुढील पिढ्यासाठी फळा–फुलांनी बहरून येतं. त्यासाठी मागील पिढीतील लोकानी ते लावावयाच असतं. त्यास खतपाणी घालून चांगल वाढवावयाचं असतं. आपणास जर एका वर्षाची तयारी करावयाची असेल तर धान्य पेरावे लागते, परंतु शेकडो वर्षाची तयारी करायची असेल तर माणसं पेरावी लागतात. सर्वांना शिकवून ज्ञानी करण्यासाठीच पहिल्यांदा महात्मा फुल्यांनी सक्तीच्या मोफत शिक्षणाचा आग्रह धरला होता. जोतीरावानी लावलेली ही

शिक्षणाची ज्योत जेव्हा मंदावत चालली, तेव्हा राजर्षी शाहू आणि सयाजीराव गायकवाड यांनी 'गाव तेथे शाळा' काढून गरीबांच्या शिक्षणास फार मोठी चालना दिली. प्रत्येक गावातील प्रत्येक मूल शिकले पाहिजे असा त्यांचा प्रयत्न होता. म्हणून गरीबांच्या झोपडीपर्यंत व पारध्यांच्या पालापर्यंत शिक्षण पोहचविण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला. कारण तळा-गाळातला माणूस शिकल्याशिवाय ज्ञानी होणार नाही. ज्ञानी झाल्याशिवाय त्याला आपल्या भोवती पसरलेल्या प्रचंड दुनियेतल्या हालचालींचा अर्थ कळणार नाही. चांगले काम आणि वाईट काम हे उमगणार नाही. आणि म्हणूनच ज्ञानाचं लोण प्रत्येक झोपडीपर्यंत पोहोचणं आवश्यक आहे. झोपडीतील प्रत्येक व्यक्ती साक्षर झाली पाहिजे. पहिल्यांदा स्त्री साक्षर झाली पाहिजे. नाहीतर अडाणी आईमुळ सारं घर वाया जाईल, आता स्त्री चार भितीमध्ये चूल-मूल सांभाळणारी व्यक्ती न राहता आरोग्य स्वच्छता, बालसंगोपन आणि काही उद्योग अशा विविध थरावर तिला स्वावलंबी आणि स्वाभिमानी बनलं पाहिजे, तरच घर आनंदाचं अंगण बनेल. दिव्याने जसा दिवा लावतात, तसं आता प्रत्येक साक्षराने एक तरी साक्षर करीत गेलं पाहिजे. शिकलेला मनुष्यच शिक्षणाचा प्रथम शत्रु असतो. या वचनाचील भिती सोडून दिली पाहिज. शिकलेल्यानेच आपणास शिकवावं, यासाठी वाट पाहाण्याचा काळ आता निघून गेला आहे आपला उद्धार आपणच केला पाहिजे. शिक्षणाच्या वाहत्या गंगेत आपण हात धुवून घेतले पाहिजेत. आपणच आपल्या हक्कासाठी व कर्तव्यासाठी जागरूक राहून हित साधलं पाहिजे. प्रत्येकानं आपल्या प्रगतीसाठी पुढंच गलं पाहिजे आणि असं घडलं तरच प्रौढ शिक्षण हे जीवन स्पर्शी ठरेल. अज्ञान,अंधःश्रद्धा आणि गरीबीच्या गर्तेमध्ये पडलेल्या लाखो लोकांना वर उचलून त्यांना 'माणूस' म्हणून समर्थपणे चालावयास आणि जगावयास शिकवेल साध्या गरीबांचा जीवनमार्ग सुख-संपन्नतेकडे कसा झुकेल याचा ध्यास हीच प्रौढ शिक्षणापाठीमागील खरी दृष्टी आहे.

प्रौढ शिक्षण : सुखीजीवनाचा मूलमंत्र

माणसाने स्वतःचा विकास स्वतःच केला पाहिजे ही जाणिव जागृत करण्यासाठी प्रौढ शिक्षण आहे. समाजातील अठरापगड जातीनी आणि बारा बलुत्यांनी आता ज्ञानी होण्याची धडपड सुरू केली पाहिजे. कारण ज्ञानाचा मार्ग हा सुखाचा मार्ग आहे. ' शेतकरी सुखी तर जग सुखी ' असं म्हणताना आता तो शेतकरी शिकलेला असेल तरच सुखी होईल. नाहीतर शंभर रुपये घेतलेल्या कर्जाचे एक हजार रुपये कसे झाले हे त्यास समजणार नाही. शून्याचा फटका त्याचं घर बरबाद करून टाकेल. शेतीची नवी औजारं, खतं आणि कीटकनाशकं यांचं ज्ञान झालं नाही, तर चांगल पीक येऊनही हातातून निसटून जाईल. यासाठी शेतकरी-कामकऱ्यानं आज स्वयंस्फूर्तीनं शिकलं पाहिजे. शिकल्याशिवाय आपण जे कमी प्रतीचं जीवन जगत आहोत, त्याचा तिटकारा वाटणार

नाही, शिकल्याशिवाय आपण जे मिळवितो ते कसं खर्च करावं ते कळणार नाही आणि शिकल्याशिवाय आपणास सुखानं जगता येणार नाही, एवढा साधा अर्थ या प्रौढ शिक्षणाच्या मुळाशी दडलेला आहे, हे लक्षात घेतलं पाहिजे. आणि म्हणून आता इतरांनी आपल्यासाठी काय करावे असा विचार करत न बसता आपण आपणासाठी व इतरासाठी काय करू शकतो हे पाहिलं पाहिजे. जसं देशानं माझ्यासाठी काय करावं ? हा प्रश्न विचारण्यापूर्वी आपण देशासाठी काय करू शकतो हा विचार आपण अंत:करणात जागा ठेवला पाहिजे. प्रौढ शिक्षणातून असा देशसेवेचा विचार बळावत गेला पाहिजे. समाजसेवा हीच पूजा मानली पाहिजे. आणि म्हणून प्रौढ शिक्षण आणि समाजसेवा जेव्हा हातात हात घालून चालतील तेव्हाच सारा समाज संपन्न होईल.

□



संस्कृत भाषेचे अध्ययन आणि अध्यापन : काही विचार

डॉ. गं. वि. कुलकर्णी

संस्कृत भारतीय भाषांची जननी होय. भाषेच्या अभ्यासाला व्यवहाराची जोड नसेल तर त्या भाषेला संक्रमण काळातून कशी वाटचाल करावी लागते, याचा डॉ. गं. वि कुलकर्णी यांनी घेतलेला शोध-बोध मननीय आहे.

भारतीय भाषांची जननी म्हटल्या गेलेल्या संस्कृत भाषेच्या बाबतीत गेल्या काही वर्षात केवढा बदल होत आला आहे ! नवी विद्यालयें, महाविद्यालये आणि विद्यापीठे अस्तित्वात येत आहेत आणि विद्यार्थ्यांची संख्याही झपाट्याने वाढत आहे. परंतु त्या मानाने संस्कृत-विभाग आणि त्यातील विद्यार्थी यांची संख्या दिवसेदिवस घटत आहे. पुणे, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद यासारख्या मोठ्या शहरांतील विद्यालयात आणि महाविद्यालयांत फक्त काही ठिकाणीच संस्कृत विभाग चालू आहेत. इतर ठिकाणी अन्य शहरांत ते जवळ जवळ नाहीतच. विद्यालयात हिंदी-संस्कृत असा संयुक्त अभ्यासक्रम फक्त काही ठिकाणीच आहे. महाविद्यालयांतील संस्कृत विशेष (special) चे विभाग धडाधड बंद पडत आहेत पुण्यातील एस् पी. (सर परशुराम) महाविद्यालय फर्ग्युसन महाविद्यालय आणि कोल्हापूर येथील राजाराम महाविद्यालय, तसेच सांगली येथील विलिंग्डन महाविद्यालय अशा संस्कृतबद्दल ख्यातनाम महाविद्यालयातही ते जवळ जवळ बंद होत आले आहेत. शिवाजी विद्यापीठात एम् ए. या पदव्युत्तर विभागात कोल्हापूरात एका हाताच्या बोटांवर मोजण्या इतकेही विद्यार्थी नाहीत; यावर्षी कोल्हापूरात एकच विद्यार्थिनी आहे; एम् फिल ला कोणीच नाही. पीएच्. डी. साठी काही विद्यार्थी आहेत. सांगली औरंगाबाद येथे याहून बरी पण जवळ जवळ अशीच स्थिती आहे. सातारा, सोलापूर येथे प्रतिसाद किंचित बऱ्यापैकी आहे, असे समजते. पुणे येथे संस्कृतचे प्रगत अध्यापन केंद्र (Centre of Advanced Studies in Sanskrit) असल्यामुळे एम् ए. या पदव्युत्तर अभ्यासक्रमास तीस ते चाळीसपर्यंत विद्यार्थी आहेत. त्यापैकी महाराष्ट्रीय थोडेच आहेत. पीएच्. डी. साठी तेथे जवळ जवळ

तेवढेच विद्यार्थी आहेत. मुंबई, नागपूर याठिकाणी विद्यालये, महाविद्यालये व विद्यापीठे यांत संस्कृत विषयाचे अध्ययन व अध्यापन याहून मोठ्या प्रमाणात चालू आहे. विद्यार्थ्यांची संख्याही त्या मानाने चांगली आहे. महाराष्ट्रातील अध्यापन-महाविद्यालयांत (Colleges of Education) बऱ्याच ठिकाणी संस्कृत विषयाला रजा देण्यात आली आहे. त्यामुळे संस्कृत विषय घेणाऱ्या अध्यापकीय पदवीधरांची संख्या घटत आहे.

संस्कृतचे अध्ययन, अध्यापन व संशोधन

सध्या नागपूर विभागात तीन, नासिक विभागात चार, औरंगाबाद विभागात पंधरा, बृहन्मुंबई विभागात सहा, पुणे विभागात नऊ, कोल्हापूर विभागात तीन आणि अमरावती विभागात दोन अशा महाराष्ट्रात एकूण बेचाळीस संस्कृत पाठशाळा असून त्यात काही (मोजके) विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

याशिवाय संस्कृतचे अध्ययन, अध्यापन आणि संशोधन महाराष्ट्रात इतर काही संस्थामधून चालू आहेच. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पुण्याचे प्राच्यविद्यासंशोधनमंदिर, डेक्कन कॉलेज, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, आयुर्वेद महाविद्यालये, वैदिक संशोधन मंडळ, ज्ञानप्रबोधिनी, तत्वज्ञान विद्यापाठ (ठाणे), भारतीय विद्याभवन (मुंबई) यासारख्या संस्था व संस्कृत भाषेतील विद्येत रस घेणारे व अध्ययन-अध्यापन, संशोधन करणारे प्राध्यापक व विद्वान यांची परंपराही अखंड चालू आहे. संस्कृत ग्रंथांचे प्रकाशन व प्रसार चालला आहे. 'भवितव्यम्' 'शारदा' 'गीर्वाणसुधा' यासारखी संस्कृत नियतकालिके आपापल्या परीने हेच कार्य करीत आहेत. संस्कृत विश्वहिंदूपरिषद्, ऑल इंडिया ओरिएंटल कॉन्फरन्स यांच्या अधिवेशनांतून संस्कृत व इतर प्राच्य भाषा यासंबंधी विचार विनिमय, प्रकाशन, संशोधन इ. चालले आहे. मुंबईत संस्कृत माध्यम असलेल्या बालशाळा सुरू आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति-मंडळाच्या वतीने संस्कृत भाषेतील दर्जेदार ग्रंथाचे मराठीतून अनुवाद लिहवून प्रसिद्ध करण्याची योजना कार्यवाहीत आहे. चिन्मय मिशनसारख्या संस्थांच्या द्वारा भगवद्गीता, उपनिषदे, शंकराचार्यांचे व भगवान रमणमहर्षींचे ग्रंथ इत्यादीवर ज्ञान यज्ञ चालू आहेत. रामायण महाभारत, भागवत, वैदिक वाङ्मय यांवर व्याख्याने व प्रवचने अधूनमधून आयोजित केली जात असून त्यावर आधारित मराठी ग्रंथांची निर्मितीही चालू आहे.

अजूनही वाटचाल केली पाहिजे

'संस्कृत-दिना' सारखे उत्सव संस्कृतच्या वर्धापनासाठी शासन साजरे करीत असते व त्यामधून संस्कृतची महती वाढवी असे आवाहन करीत असते. महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाराष्ट्र राज्य संस्कृत स्थायी समिती नियुक्त झाली असून तिचे कार्य अव्याहत चालले आहे. या समितीच्या वतीने संस्कृतचे अध्ययन-अध्यापन विषयीचे निरीक्षण होत असून त्याचे संवर्धन व्हावे, त्यातील विद्वानांचा सत्कार व्हावा व संस्कृत

भाषेला सर्वतोपरी वैभवाचे भवितव्य लाभावे या दृष्टीने प्रयत्न चालू आहेत. काही प्रमाणात त्यांना यश येत आहे.

ज्ञानाला व्यवहाराची जोड पाहिजे

परंतु हे सर्व असूनही आणि संस्कृत भाषेतील ज्ञानाचा थोर वारसा, तिचे सर्वांगीण महत्त्व इत्यादी संबंधी अनेक वक्तव्ये, लेखन, चर्चा वगैरे होत असूनही प्रत्यक्षात त्यांची कार्यवाही व्हावी तशी होत नाही. संस्कृत हा विषय कुठल्याच स्तरावर अनिवार्य (Compulsory) राहिला नसून तो अनेक विषयांपैकी एक ऐच्छिक (Optional) विषय म्हणून राहिला आहे. तो घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष सवलती वगैरे नाहीत. (पदव्युत्तर विभागात संस्कृत संस्थान व युनिव्हर्सिटी ग्रॅन्ट्स कमिशनच्या वतीने काही अनुदाने आहेत.) तो अवघड व आजच्या काळात व्यावसायाच्या व्यवहारिक दृष्टीने अनुपयुक्त मानला जात असल्याने विद्यार्थ्यांचा ओढा तिकडे कमी होत चालला आहे. संस्कृत विषय अवघड आहे हा एक गैरसमज आहे, असेच आणखीही काही गैरसमज आहेत. आलिकडे विद्यालये, महाविद्यालये आणि विद्यापीठे यांतील संस्कृत विषयातले अभ्यासक्रमही पूर्वीच्या मानाने विद्यार्थ्यांची ही स्थिती व त्यांचा मगदूर पाहून अधिक खुला झाला आहे. अर्थात बदलत्या काळानुसार त्यात काही इष्ट बदलही करण्यात आले आहेत. पूर्वीच्या मानाने विद्यार्थ्यांचा दर्जाही हळूहळू कमी होत चालला आहे. अर्थात यालाही काही सन्मान्य अपवाद आहेत. यात विद्यार्थिनींची संख्या अधिक आहे.

संस्कृत : संस्कारसंपन्न भाषा

महाराष्ट्रातील विद्यालये, महाविद्यालये व विद्यापीठे यातील संस्कृतच्या अध्ययना बद्दल विद्यार्थ्यांत एकंदरित अनास्था व औदासीन्य आहे. बऱ्याचशा संस्थाही त्यामुळे याबाबतीत उदासीन आहेत. त्यांचा दृष्टीकोण सामान्यत: व्यावहारिक असतो. समाजातही वाढत्या जीवनकलहामुळे व इतर काही कारणांमुळे (उदा. विवेकाचा अभाव, ध्येयनिष्ठेचा अभाव, विचारवंतांची अगतिकता व निष्क्रीयता इ.) संस्कृत विषयाच्या बाबतीत त्याच्या मर्यादांमुळे अनेक प्रकारची अनास्था आहे. भोवतालची हवाच सध्या काहीशी प्रतिकूल आहे. त्यामुळे येथील तरूण पिढी या भाषेला, तिच्या वाङ्मयाच्या समृध्दीला व सांस्कृतिक वारशाला प्राय: वंचित झाली आहे. व याचा परिणाम मातृ भाषेची शुध्दता आणि जीवनातील संस्कारांची संपन्नता यावर काही प्रमाणात होत आहे.

संस्कृतचे भवितव्य उज्ज्वल आहे

याचा अर्थ संस्कृतचे भवितव्य पुढील काळात निराशाजनक आहे असे नाही. संस्कृतची उज्ज्वल परंपरा वर उल्लेखल्या प्रमाणे अखंड प्रवाहित आहे. तशीच ती पुढेही राहाणार आहे. व्यापक दृष्टीने महाराष्ट्रा बाहेरील व जगातील संस्कृत भाषेबद्दलची

परिस्थितीही उत्साहवर्धक आहे. ती सर्व स्तरांवर कशी प्रभावशाली व सर्वव्यापी होईल या दृष्टीने आस्थेवाईक विचारवंतांनी व समाजाने अचूक व सातत्याने, जोमाने प्रयत्न करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. शासनानेही याबाबतीत अधिक आस्थेने लक्ष घालणे समाजाच्या व विशेषतः तरूण पिढीच्या हिताचे आहे. संस्कृत भाषा, साहित्याचा हा नंदादीप अखंड तेवत रहावा व तो नेत्रदीपक व जीवन उजळून टाकणारा व्हावा ही मनःपूर्वक प्रार्थना.... ' प्रवहतां संस्कृतमन्दाकिनी । '

□

इंग्रजी भाषेचे अध्यापन : आव्हान आणि समस्या

डॉ. सी. जे. दासवानी

(अनुवाद– डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर)

इंग्रजी ही विश्व–संपर्क भाषा होय. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडात आपल्या देशात इंग्रजीच्या अध्ययन–अध्यापन प्रक्रियेमधील समस्यांचा साकल्याने विचार मांडण्याचा स्तुत्य प्रयत्न डॉ. सी. जे. दासवानी यानी केला आहे.

शिक्षणाचे नियोजक व भारतातील इंग्रजी भाषेचे विशेषज्ञ इंग्रजी भाषेच्या अध्यापनाविषयीच्या समस्यांचा विचार एकूण शिक्षण व्यवस्थेतील भाषा–अध्यापनाच्या समस्यांपासून अलग करुन करतात. त्याचप्रमाणे इंग्रजी भाषेच्या अध्यापनाला महाविद्यालयीन व विश्वविद्यालयीन पातळीवर विशिष्ट स्थान देतात ही वृत्ती का व कशी बळावली हे समजणे कठीण नाही. पण त्यामुळे इंग्रजीबाबत शिक्षणतज्ज्ञानी घेतलेली भूमिका न्याय ठरत नाही. मला असे म्हणायचे आहे की , भारतात इंग्रजीच्या अध्यापनाची प्रगति व त्यासाठी आलेला खर्च यांचे प्रमाण फारच विषम आहे आणि याचे कारण इंग्रजीच्या अध्यापनाचा विचार एकूण भाषा–अध्यापनाच्या संदर्भात न करण्याच्या मूलभूत प्रमादात दडलेली आहे. ब्रिटीशांच्या राजवटीत भारतातील शिक्षणव्यवस्थेत इंग्रजीचे जे विशिष्ट स्थान होते त्याचा स्वतंत्र भारताच्या शैक्षणिक धोरणांच्या संदर्भात गंभीरपणे पुनर्विचार झालाच नाही, त्यामुळे पूर्वी शिक्षणव्यवस्थेत इंग्रजी अध्यापनाची जी भूमिका होती तीच पुन्हा प्राप्त करून देण्याचा प्रयत्नच मुख्यत्वे करून केला गेला.

इंग्रजीचे वर्चस्व

अध्यापनाचे एकमेव माध्यम म्हणून शालेय शिक्षणातील इंग्रजीची मक्तेदारी १९२० च्या आसपास संपली होती आणि भारतांतील अनेक भागांत तथाकथित देशी भाषानी अध्यापनाचे माध्यम म्हणून इंग्रजीचे स्थान घेतले होते. मात्र महाविद्यालयीन व विश्वविद्यालयीन पातळीवर इंग्रजी हे एकमेव माध्यम राहिले होते. या द्विभाषी

माध्यम धोरणामुळे १९३० पासूनच अनेक महाविद्यालयीन व विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांना शाळेतून महाविद्यालयात आल्यावर भाषेच्या बदलाच्या जाचक समस्येला तोंड द्यावे लागे. पण त्यावेळी परिस्थिती तितकी कठीण व धोकादायक वाटली नव्हती. याचे कारण असे की , बरेचसे इंग्रजी तत्कालीन वातावरणात पसरलेले होते. त्यावेळी देशी भाषांतून शिक्षण घेणाऱ्यांना गरजेपुरते इंग्रजी शिक्षण औपचारिक वा अनौपचारिकरीत्या घेता येत होत. असे व्यक्तिशः वा प्रसंगोपात शिक्षण घेणे शक्य होते. याचे कारण एकूण शिक्षण वरच्या व मध्यमवर्गापुरते सीमित होते. त्याचप्रमाणे या वर्गांच्या सामाजिक आर्थिक जीवनात इंग्रजीचे वर्चस्वही होते.

वाढता उपक्रम

१९४७ नंतर जेव्हा शाळांची संख्या अभूतपूर्व वाढली आणि देशी भाषातून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या वाढली, ते महाविद्यालयाचे दरवाजे ठोठावू लागले तेव्हा परिस्थितीत नाटचमय बदल झाला. १९४७–५२ या दरम्यान शाळेत प्रवेश करणारे मूल १९५७–६२ च्या दरम्यान माहाविद्यालयात यायला सिद्ध झाले होते. नेमके याच वेळी विश्वविद्यालये/महाविद्यालये इंग्रजी अध्यापनाच्या पद्धती व शिक्षकांना प्रशिक्षित करण्याचे कार्यक्रम कसोशीने राबविण्याची धडपड करु लागली , या प्रांतीय भाषांतून शिक्षण देण्याचा वाढता उपक्रम करू लागली होती. लक्षणीय गोष्ट अशी आहे की , मध्येच हैदराबादमधील ' सेंट्रल इन्स्टिटयूट ऑफ इंग्लिश ' ने महाविद्यालयातील शिक्षकांची पहिली तुकडी इंग्रजी भाषेच्या अध्यापनाचे (ELT) प्रशिक्षण देण्यासाठी दाखल करून घेतली. दुसऱ्या शब्दात , या शतकाच्या सहाव्या दशकाच्या शेवटी ELT ने भारतात आगमन केले; शाळांच्या देशीकरणाच्या तीस वर्षानंतर आणि शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाच्या दहा वर्षानंतर !

इंग्रजीचा वाद

शाळा–कॉलेजांतील इंग्रजीच्या घसरत्या दर्जाबद्दलही चिंता आणि भारतात इंग्रजीचे स्थान व कार्य याबद्दलचा राष्ट्रीय वाद या दोन्ही गोष्टी एकाच वेळी सुरु झाल्या. इंग्रजीसह–शासकीय भाषा म्हणून चालू राहावी काय ? की तिची जागा हिंदी वा प्रांतिक भाषांनी घ्यावी ? ती विश्वविद्यालये व संशोधन संस्था यांमध्ये माध्यम–भाषा म्हणून चालू ठेवावी काय ? ती संपर्क–भाषा असावी काय ? ती ग्रंथालय–भाषा राहू शकेल काय ? या वादांत राजकारणी धुरंधराना निश्चित पण सामान्यतः अतर्विरोधी घोषणा करावयाच्या होत्याच. पण इंग्रजीचा जाणकार मात्र संदिग्ध होता. याचे कारण असे की, १९५० च्या शेवटी बहुतेक महाविद्यालयांतले व विश्वविद्यालयांतले इंग्रजीचे शिक्षक इंग्रजी वाङमयाच्या महान परंपरांत प्रशिक्षित झाले होते आणि संस्कृति, रीतिरिवाज, पेहराव इंग्रजीद्विपीय वातावरण यांत निपुण झाले होते ! इंग्रजीच्या घसरलेल्या दर्जाबद्दल

महाविद्यालयांतले इंग्रजीचे शिक्षक शाळेतील शिक्षकांस दोष देत होते आणि या समस्येवर उपाय म्हणून अधिक इंग्रजी साहित्याच्या अभ्यासाची शिफारस करत होते. परिणाम जगजाहीर होते. गमतीची गोष्ट अशी की, महाविद्यालयांतील विश्वविद्यालयांतील बहुसंख्य शिक्षक आज सुद्धा ELT (इंग्रजी भाषा अध्यापन) आपल्या समस्या सोडवू शकत नाही असा विश्वास बाळगून आहेत !

या ठिकाणी विद्यापीठ अनुदान मंडळाने १९६५ मध्ये महाविद्यालयीन इंग्रजी शिक्षकासाठी सुरु केलेल्या प्रशिक्षणाच्या कार्यक्रमाचा काहीसा निराशाजनक इतिहास थोडक्यांत नोंदणे अनुचित ठरणार नाही हा कार्यक्रम आखतांना मंडळाने असे धोरण स्पष्ट ठरविले होते की, सर्व विश्व विद्यालयांतील इंग्रजी विभाग १९७० च्या दरम्यान महत्वाचा घटक म्हणून ELT चा समावेश करण्याच्या दृष्टीने अभ्याक्रमाची पुनर्रचना करतील. म्हणजे ही इंग्रजीची उन्हाळी शिबीरे खूपच लोकप्रिय झाली. १९७० च्या दरम्यान सर्व इंग्रजी विभाग ही शिबीरे आयोजित करण्यात चढाओढ करु लागली. पण या विभागापैकी मूठभर विभागांनीही अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्याचा गंभीरपणे प्रयत्न केला नाही !

अनेक भाषांची गुंतागुंत

शिक्षणाचे नियोजन करणाऱ्यांची इंग्रजी विषयाची वृत्ति पाहिली तर असे दिसते की, इंग्रजी देशीभाषा प्राथमिक भाषा म्हणून आणि इंग्रजी विदेश वा दुय्यम भाषा म्हणून दीर्घ काळपर्यंत त्यांनी अंतरच केले नव्हते ! जरी इंग्रजी शाळांतून औपचारिकरीत्या आरंभापासून शिकवले जात होते तरी विद्यार्थ्याकडून अशी अपेक्षा केली जात होता की, त्याने जलद गतीने इंग्रजी देशी भाषेप्रमाणेच आत्मसात करावी ! म्हणून एखाद्या इंग्रजी माणसाप्रमाणेच इंग्रजी जीवन व साहित्य (मग ते दुसऱ्या वा तिसऱ्या दर्जाचे असो) त्याने आपलेसे करावे. याचा स्वाभाविक परिणाम असा झाला की, विद्यार्थ्यांच्या मातृभाषेकडे शालेय शिक्षणक्रमांत दुर्लक्ष झाले किंवा देशी साहित्याच्या अस्पष्ट व गुंतागुंतीच्या साहित्याच्या जाळ्यांतून त्याला कसेबसे फिरवून आणण्यात येऊ लागले. म्हणजे विद्यार्थ्याने इंग्रजीवर देशी भाषेसारखे प्रभुत्व मिळवावे आणि मातृभाषेसारखा तिचा उपयोग करावा म्हणून इंग्रजीकडे भाषा म्हणून (भाषेच्या पातळीवरून) लक्ष दिले जात नव्हते आणि विद्यार्थ्यांच्या मातृभाषेकडेहि लक्ष देण्याचे कारण नव्हते. कारण शेवटी तो त्यांची मातृभाषाच होती ! !

या सोप्या तर्कशास्त्राचा परिणाम असा झाला की, इंग्रजी कार्य किंवा देशी भाषा काय, विचार व संकल्पनांच्या संवाहक भाषा म्हणून विधिवत् शिकवल्याच गेल्या नाहीत. अभिव्यक्तीचे वैविध्यपूर्ण व शैलीदार माध्यम म्हणून शिक्षण दिलेच गेले नाही. परिणाम असा झाला की विद्यार्थ्यास इंग्रजीचे अगदी मर्यादित व पुस्तकी स्वरूपाचे प्रभुत्व मिळवता

आले तर आपल्या मातृभाषेचा उपयोग त्याने आपसांत समोरासमोर बसून अनौपचारिक अभिव्यक्ति करण्यापलीकडे कधी केलाच नाही.

औपचारिक शिक्षणव्यवस्थेतील इंग्रजी व मातृभाषांच्या दुर्लक्षाचा परिणाम शिक्षणाचा सर्वांगीण दर्जा घसरण्यांत झाला. आशयप्रधान विषय व भाषा दोन्हीचा दर्जा घसरला. याचा पुन्हा परिणाम अशा शालेयप्रणालीत झाला की, जी विशिष्ट दबावाच्या स्थितीत कांही ठराविक व सर्वज्ञात गोष्टी व माहिती विद्यार्थ्याकडून केवळ पुन्हा वदवून घेत होती. (म्हणजेच घोकंपट्टी व स्मरणशक्तीची परीक्षा होऊ लागली.) ही गोष्ट उघड आहे की, अशा प्रकारच्या प्रणालीतला कोणताही विद्यार्थी इंग्रजीतील वा मातृभाषेतील अभिव्यक्तीची कौशल्ये या प्रणालीशिवाय प्राप्त करू शकेल.

या पार्श्वभूमीचा विचार करता जे प्रश्न उभे राहतात ते असे : आमच्या शिक्षणप्रणालीत कोणत्याही भाषेचे स्थान काय आहे ? देशी वा प्रादेशिक भाषा तसे विदेशी व दुय्यम भाषा यांच्या भूमिकांत वा कार्यांत कांही फरक आहेत की नाही ? हे फरक आमच्या औपचारिक शिक्षणप्रणालीत कसे प्रतिबिंबित होतील ?

आता आपण शिक्षणाचे माध्यम म्हणून असलेली भाषा व एक विषय (कोणत्याही आशयप्रधान विषयासारखी) म्हणून असलेली भाषा यांच्या कार्याचा विचार करू. ज्या भाषेचा माध्यम म्हणून उपयोग करायचा आहे त्या भाषेत विद्यार्थ्याला विश्लेषण करणे, व्याख्या करणे, वर्णन करणे, अनुमान काढणे, अमूर्त विचार करणे, कल्पना करणे इत्यादी गोष्टी यायला हव्यात ही गोष्ट उघड आहे. या ठिकाणी एक गोष्ट विशेष लक्षांत ठेवायला हवी. विश्लेषण, व्याख्या करणे, वर्णन करणे, अनुमान वा तर्क करणे, अमूर्तीकरण व कल्पना करणे ही सर्व सामर्थ्ये वा कौशल्ये जाणीवपूर्वक विकसित करावी लागतात ती भाषेच्या माध्यमांतून शिकायची वा अभ्यासायची असली तरी याचा अर्थ असा की, मातृभाषा वा देशीभाषा या सामर्थ्यासाठी जाणीवपूर्वक शिकल्याशिवाय आपोआप वापरता येत नाही. म्हणजेच माध्यम–भाषा म्हणून विद्यार्थ्याच्या मातृभाषेचा उपयोग करायचा असला तरी त्या भाषेचे व्यवस्थित शिक्षण घ्यायला हवे–तरच वास्तवाचे खरे आकलन विद्यार्थ्याला होऊ शकेल. जेव्हा विदेशी किंवा दुय्यम भाषा माध्यम म्हणून वापरायची असेल तेव्हा त्या भाषेच्या विशुद्ध भाषिक पैलूंवर प्रभुत्व मिळवावे लागते तरच ती अधिक सूक्ष्म कार्यासाठी वापरता येणे शक्य होईल. आजच्या भारतीय शालेय शिक्षणप्रणालीमध्ये वर निर्देशिलेली कार्ये करण्यासाठी सामर्थ्य प्राप्त व्हावे या दृष्टीने इंग्रजी वा मातृभाषा शिकवल्या जात नाहीत. मातृभाषेबाबत हे गृहीत धरले जाते की, विद्यार्थी ही काय करण्यास समर्थच आहे आणि जिथे इंग्रजी माध्यम म्हणून वापरले जाते तिथे इंग्रजीची कांही मूलभूत भाषिक तत्त्वे शिकवली जातात व बाकीच्या गोष्टी विद्यार्थ्याच्या अंगभूत सामर्थ्यावर सोपविल्या जातात किंवा भाग्यावर अथवा दोहोंवर ! जेव्हा इंग्रजीची मूलभूत भाषिक तत्त्वेही आत्मसात करण्यास विद्यार्थी असमर्थ ठरतो असे

दिसते तेव्हा शिक्षणतज्ज्ञ खडबडून जागा होतो आणि तज्ज्ञाचा शोध घेऊ लागतो. आणि तो तज्ज्ञ इंग्रजीची केवळ भाषिक तत्त्वे अधिक कार्यक्षमतेने शिकवण्याचा पर्याय सुचवतो.

या ठिकाणी आवर्जून सांगण्याचा मुद्दा हा की, भारतांतील शिक्षण व्यवस्थेने माध्यम भाषा म्हणून भाषेची संकल्पना पुरेशी स्पष्ट करुन घेतलीच नाही आणि या नावाखाली जे काही केले जाते ते इतकेच की भाषेच्या केवळ भाषिक संरचनेवर जोर दिला जातो.

संकुचित प्रयत्न

या अशा परिस्थतीमध्ये ELT वर कोणती जबाबदारी दिली गेली आहे आणि गेल्या वीस वर्षांत ELT ने काय केले आहे ? भारतातील ELT चे सर्व प्रयत्न इंग्रजीच्या भाषिक संरचनेचे शिक्षण देण्याचे व त्यासाठी शिक्षणाची साधने पुरविण्याच्या दृष्टीनेच झाले आहेत. या धुरेभोवतीच असंख्य फेरबदल करण्यात आले आहेत. इंग्रजी भाषेचा माध्यम म्हणून उपयोग करण्याच्या दिशेने प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न शिक्षणव्यवस्थेत ELT ने केलाच नाही.

याउलट कार्यालयीन इंग्रजी वा विशिष्ट शिकविण्याचे सारे प्रयत्न विशिष्ट क्षेत्रांतील व्यावसायिक सामर्थ्य मिळवून देण्याच्या नावाखाली चाललेले असले तरी ते इंग्रजीचे संरचनेचे प्रशिक्षण अधिक संकुचित करीत आहेत. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर असे : जेव्हा आम्ही विज्ञानासाठी इंग्रजी, वैद्यकीय शिक्षणासाठी इंग्रजी, अर्थशास्त्र वा टेक्नॉलॉजीसाठी इंग्रजी असे अभ्यासक्रम शोधून काढतो तेव्हा विद्यार्थ्याने विशिष्ट कार्य करावे यासाठी इंग्रजीची भाषिक संरचना फक्त मर्यादित करतो – सामान्यतः विशिष्ट खात्याचे इंग्रजी विद्यार्थ्याने फक्त समजावे एवढीच मर्यादित अपेक्षा बाळगतो !

इंग्रजीला तृतीय पातळीवरही माध्यम भाषा कार्य करायचे नसेल तर शैक्षणिक व्यवस्थेतल्या इंग्रजीचे स्थान मूलतः बदलून जाईल. साहजिकच इंग्रजीला खरोखरच विदेशी भाषेचे स्थान घ्यावे लागेल. मर्यादित मौखिक अभिव्यक्तीसाठी किंवा विविध ज्ञानशाखात लिहिलेली साहित्य वा अन्य सामग्री उपयोगात आणता यावी इतके सामर्थ्य प्राप्त करण्याइतपतच या भाषच्या शिक्षणाचे प्रयोजन राहील.

गरजांसाठी इंग्रजी

पण आपण अजून सिद्धान्ताच्या जगातच आहोत. भारतीय जीवनात इंग्रजीचे जे प्रतिष्ठीत स्थान आहे ते विचारांत घेता व सामाजिक, राजकीय दृष्टया इंग्रजीचे आजचे महत्व लक्षांत घेता कोणत्या स्वरूपाचे ELT अभ्यासक्रम अपेक्षित आहेत ? इग्रजी भाषा म्हणून मर्यादित कार्यासाठी तिच्या आजच्या व भावी उपयोगकर्त्यांना उपलब्ध करून दिली पाहिजे. दुसऱ्या शब्दात, ELT (इंग्रजी फॉर स्पेशल पर्पजेस) अभ्यासक्रम आणि व्यावहारिक इंग्रजीचे अभ्यासक्रम, जे मर्यादित आकलनाचे सामर्थ्य

व संकुचित असलेले भाषेचे सर्जनात्मक व्यापार करण्याचे कौशल्य अनेक प्रकारच्या गरजांसाठी शिकणाऱ्यांना पुरेसे असतात ते पुरविले पाहिजेत. पण अशा अभ्यासक्रमांचे यश या गृहित समजावर अवलंबून आहे की अशा अभ्यासक्रमांतून विद्यार्थ्याला माध्यम म्हणून इग्रजी भाषेचे प्रभुत्व मिळवता येणार नाही.

अशा एकूण परिस्थितीत असा मोठा विद्यार्थ्यांचा वर्ग प्राप्त होण्याची शक्यता आहे की जो भाषिक आदान–प्रदानाच्या मर्यादित व विशिष्ट क्षेत्रांत इंग्रजीच्या मदतीने कार्य करीत असेल (अशा अभ्यासक्रमांचा तपशीलवार विचार आपल्याला या ठिकाणी करावयाचा नाही. तसेच लेखन प्रकार, शैली, कौशल्य, पातळी इत्यादी गोष्टीचाही) या ठिकाणी हे नोंदवायला हवे की , इंग्रजीचा एक महत्वाची अभिव्यक्तीची भाषा म्हणून वापर करणाऱ्या लोकांचे काही वर्ग भारतात असतीलच

खरे म्हणजे शेवटच्या भागात जे वर सांगितले आहे तेच आज भारतातील ELT मध्ये घडत आहे मला इथे एवढेच म्हणावयाचे आहे की, आपल्याला काय करायचे आहे, हे स्पष्टपणे आपण समजून घ्यावे आणि आज चाललेल्या प्रयत्नांची फलश्रुती काय संभवते याचाहि विचार करावा. आजच्या ELT च्या प्रयत्नांनी शैक्षणिक फलश्रुती काय आहे हे निश्चितपणे सांगणे शक्य असले आणि ते सर्वज्ञातही आहे तरीहि अनेकांच्या मनांत (विशेषत: शिकणाऱ्यांच्या) अशी आकांक्षा उत्पन्न झालेली आहे की या अभ्यासक्रमांमुळे मोठे अभिव्यक्तीचे संवाहक म्हणून इंग्रजीचा वापर करण्याची क्षमता प्राप्त होईल. हे न्याय्यही नाही आणि टिकण्यासारखेही नाही. आणि जेव्हा शिक्षणतज्ज्ञ व ELT तज्ज्ञ अशा तऱ्हेचा ग्रह जाणता वा अजाणता उत्पन्न करतात तेव्हां ती अधिक गंभीर गोष्ट म्हटली पाहिजे.

□

क्रीडा : यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली

डॉ. प. म. आलेगांवकर

क्रीडा म्हणजे आपल्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा एक सहज आविष्कार होय. क्रीडेच्या स्वरुपात मानवी संस्कृतीचा सुरेख सामाजिक आविष्कार भरुन राहिला आहे. व्यक्तिपासून ते राष्ट्राच्या जीवनापर्यंत क्रीडेतून निर्माण होणारा आनंद वाढविणे आवश्यक आहे. डॉ. प. म. आलेगांवकर यांनी क्रीडेसंबंधी मांडलेला शास्त्रशुद्ध विचार मननीय आहे.

शारीरिक क्षमतांच्या विकासामुळे व्यक्तीचे सामान्य जीवन सुखी होते. रोजचे दैनंदिन काम करताना तो सहजपणे न थकता न दमता उलट उत्साहाने, चापल्याने व सफाईदारपणे आपले काम करू शकतो हा विचार आपल्याकडे अजून म्हणावा तसा रुजला नाही. शालेय शिक्षणातून काही विषयांचे माध्यमातून बौद्धिक विकासाचा तूर्त विचार होत आहे. त्यामुळे त्या बुध्दीच्या जोरावर आपण वेगाने व दमदारपणे काम करू शकू असा लोकांचा समज झालेला आहे. पण प्रत्यक्षात असे दिसते की, देशोदेशीचे लोक जे काम वेगाने सहजतेने करतात त्या कामात आपल्या लोकांना एवढी गती प्राप्त झालेली दिसत नाही.

शारीरिक क्षमता

शारीरिक क्षमतांचा केवळ सामान्य परिचय म्हणून एक दोन क्षमतांचा विचार करू या. वेग ही एक शारीरिक क्षमता आहे (Speed as one of the physicial abilities) तसेच दमदारपणा व ताकद (Strength and Stamina) अशाही काही क्षमता आहेत. रानात हरिण समजा १२० कि. मी. वेगाने पळत आहे. आता हया स्थितीत वाघ हरिणाला कधी पकडू शकेल का ? पण सतत तास दीड तास १२० च्या वेगाने पळणारे हरिण आणि वाघ याच्या दमदारपणा व ताकद या क्षमतांमध्ये बराच फरक असतो वाघ त्याच्या ताकदीमुळे (Strength & Stamina) अजून त्याच वेगाने पळू शकतो. जसजसा काळ जाईल तसतशी हरिणाची ताकद जबाब देते... आणि

वेग हरिणाएवढा नसला तरी ताकदीमुळे वाघ आपले भक्ष्य पकडू शकतो ! शक्ती ही क्षमतासुद्धा स्वतंत्रपणे पाहता येते... वजन–वेग आणि विशिष्ट कृती मध्ये ती दिसते. एखाद्या वाघाने हत्तीवर एक दोन झडपा घेऊन हत्तीला पाडू शकत नाही. पण हत्तीने जर पळत येऊन धडक दिली तर त्याचे वजन आणि वेग यामुळे निर्माण होणारी शक्ती अधिक असते. त्यामुळेच आता कराटे, ज्युडो यासारख्या खेळात वजन आणि वेगाचा विचार करून ठोसे दिले जातात. बंदूकीची गोळी सहज फेकून मारली तर कोणी मरत नाही !

निरनिराळ्या दिशांना शरीर वळविता येणे (Agility) म्हणजे क्षणार्धात बदलविता येणारी दिशाभिमुखता ही सुद्धा एक स्वतंत्र शारीरिक क्षमता आहे. हत्ती, गेंडा असे अवजड प्राणी पळता पळता चटकन् दिशा बदल करू शकत नाहीत. म्हणूनच त्यांची धडक चुकविता येते व कधी ते करत असलेला पाठलाग टाळणेही शक्य होते.

कौशल्य व स्पर्धा

कोणत्याही स्पर्धेत दोन परस्पर विरुद्ध खेळणाऱ्या वा स्पर्धेत भाग घेणाऱ्या खेळाडूंचा दर्जा ठरविण्यासाठी जास्तीत जास्त समान नियमांनुसार स्पर्धा वा सामने आयोजित केले जातात. दोन्ही संघ समान आहेत दोघांची वये, वजने इ. दोन्ही संघांना दिलेला वेळ, दोन्ही बाजूला असलेले क्रीडांगण ही समान, दोघांनी किंवा अनकांनीही वापरावयाचे साहित्य (गोळा, भाला, थाळी यांचे वजन, आकार, लांबी इ.) सुद्धा समानच असते...आता कोण विजयी होणार हे दाखविलेल्या कौशल्यावर अवलंबून असणार. कौशल्य म्हणजे काय ? (Skill ?) 'कमीत कमी श्रमात जास्तीत जास्त काम करणे; त्यांतून पाहणारास एक सौंदर्यानुभूती व्हावी, आणि त्या व्यक्तीचे म्हणून 'आपले एक' वैशिष्टचही दिसावे' प्रत्येक खेळांच्या क्रीडाप्रकारांच्या अत्युच्च ध्येयप्राप्तीसाठी विविध कौशल्यांचा सराव करावा लागतो. पण तत्पूर्वी विशिष्ट क्रीडाप्रकारात प्रामुख्याने कोणत्या शारीरिक क्षमतांची आवश्यकता आहे यांचाही अभ्यास करावा लागतो, धावण्याच्या कमी अंतरांच्या शर्यतीत वेगाला अधिक महत्व असते तरी दीर्घ अंतर धावण्याच्या शर्यतीत वेग हवा पण त्यापेक्षा दमदारपणा, दमछाक (Stamina & Endurancce) यांची अधिक आवश्यता असते ती पायांच्या स्नायूंबरोबर हृदय व फुप्फुसे यांच्या हालचालीस अधिक महत्त्व आणते.तर जिमनास्टिकसला–वेग आणि दमदार पणा हवा असला तरी हालचालीची सहजता लवचिक पणामुळे अधिक प्रदर्शनीय व विशिष्ट शारीरिक कृतीस पोषक ठरते.

बौद्धिक जोड

कौशल्य प्राप्तींसाठी सराव आवश्यक आहे. हा सराव केवळ शारीरिक दृष्टीनेच केला तरी त्यात करावयाच्या कृतीचे आपण ती कृती का केली त्याचे ती कृती करणारास

व करवून घेणाऱ्यास ज्ञान असणे आवश्यक आहे. आता त्याला शारीरिक शिक्षण केवळ म्हणावयाचे केवळ शरीराभ्यास नाही. (It is physical education and not only physical training. In education we expect the how and Why of that particular activity. but not in training. There's not to question how & why but to do and die) सर्कसमध्ये क्रूर वाघाला, भयानक अस्वलाला, प्रचंड धूड असलेल्या हत्तीला आपल्याला पाहिजे ती क्रिया करायला लावताना आपण पाहिले आहे ! आगीला भिणारा वाघ आपले प्रचड शरीर, त्या एवढ्याशा पेटलेल्या कडीतून अलगद पलिकडे नेतो... कोणत्या भाषेत शिकवीत असतील वाघाला ? काय ? असे करू नको तसे करू नको, नाही तर मारीन वगैरे त्याच्याशी बोलता येईल? आपण बोललो तर त्याला ती भाषा समजेल का ? सर्कसमध्ये जीवावर उदार होऊन काम करणाऱ्या आणि अशा जंगली श्वापदांना आपल्याला हव तशी शिकविणाऱ्याना खरोखरच आपण मानतो ! एक दोन दिवस उपाशी ठवून मध्येच मांसाचा तुकडा ठेवून दोन्ही कडे दोन काठ्या ठेवून एखादा शब्द उच्चारून वगैरे अनेक मार्गांनी त्यांच्या प्रतिसादांना प्रतिक्षिप्त क्रियांसारखे स्वरूप आणले जाते (Conditioned reflexes) आणि मग वेळ येताच विशिष्ट व्यक्तीच्या हालचाली, गंध, स्पर्श, आवाज यानुसार इंद्रियांनी संवेदित झालेले हे प्राणी त्या व्यक्तीला हवी ती कृती करतात. मग ते प्रचंड धूड–मागील दोन पायावर, पुढाल दोन पायावर, एका छोट्या लोखंडी स्टूलावर सुरेख बॅलन्स करीत असता हत्तीच्या रूपात दिसते. तर माणसासारखे कपडे घातलेले अस्वल तोल सांभाळत, सायकल, मोटार सायकल चालवते !

अवयव आणि इंद्रियांबरोबर बुद्धीचा वापर करून एखादी गोष्ट जाणीवपूर्वक शास्त्रीय पायावर लवकर शिकणे, आमच्या शारीरिक शिक्षणात येणे आवश्यक आहे. आमचे शारीरिक शिक्षण हे आजही सर्कसमध्ये दिल्या जाणाऱ्या केवळ शारीरिक हालचाली पुरतेच मर्यादित राहते की काय अशी भिती वाटते...

बौद्धिक व शारीरिक विकास

ख्रिस्तोफर याने ३३५०० विद्यार्थ्यांची परीक्षा करून असे सिद्ध केले आहे की बुद्धिमत्ता, शालेय प्रगती आणि शारीरिक क्षमता व ॲथलेटिक क्षमता यांचा सहसंबंध आहे. तसेच प्रो. जे. जे ग्रुबर यांनाही हचा शारीरिक व बौद्धिक क्षमतामध्ये विविध प्रकारचे सहसंबंध आढळतात.

उदा. १) शारीरिक–कारक सुदृढता व बौद्धिक पात्रता ४ = ०.५२२) २) स्नायू मज्जातंतू अनुबंध व बौद्धिक संपादन क्षमता ४ = ०.४४ तर प्रो. रॉजर्स यांनी असे सिद्ध केले आहे की शारीरिक दृष्टचा असमर्थ मुलांना बौद्धिक कार्य करण्यास नेहमीच कठीण जाते.

प्रो. इस्माईल ए. एच् यांनी असे सिध्द केले आहे की, काही कारक कृती (Motor items) बुद्धिमापनातील विशेष घटक तसेच शालेय अभ्यास क्षमता यामध्ये धन

सहसंबंध आढळून येतो. त्यांनी वेग व ताकद (Speed & Strength) हे अबोधन घटक या समसंबंधासाठी घेतले होते. हा समसंबंध गुणांक ४ = ०.४३ आला आहे. तर डॉ. सोलन विल्यम यांनी स्नायवी कृतीमधील प्राविण्य व बुद्धिमत्ता यातील समसंबंध दाखविला आहे बाहेरील जगात माणसाच्या चौरस व जलद विकासाचे प्रयत्न चालू आहेत. शिवाय प्रयत्नांचा उपयोग अधिकाधिक मोठ्या समाजास कसा होईल हा ही विचार केला जात आहे

एका बाजूने असे संबंध शोधण्याचा प्रयत्न चालू आहे, निरनिराळ्या खेळांना क्रीडाप्रकारांना लागणाऱ्या मूलभूत शक्ती व शारीरिक कौशल्ये यांचा विचार चालू आहे, त्याचबरोबर दुसरीकडे मानवी हालचालीचा शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास चालू आहे.

क्रीडा : एक शास्त्र

खेळाची (Sports) ची व्याख्या करताना ' Sports is a science of human movement ' असे सांगितले जाते हया हालचालींचा शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करून सांध्यांच्या, स्नायूंच्या प्रकारातील तरफ–ताण–वजन–शक्ती यांचा या संदर्भात अभ्यास केला जातो. पदार्थविज्ञान शास्त्राचे नियमानुसार फेकलेल्या वस्तूला उदा. गोळ्याला जमीनीतून गतिमानता आणण्यासाठी, पायाच्या घोटयामध्ये, गुडघ्यामध्ये, कमरेत पाठीच्या स्नायूत–खांद्यांमध्ये–दंडातून कोपरांतून–मनगटातून–गती दिली जाते–जोर दिला जातो व शेवटी जमिनीशी हाताने केलेल्या ४२° ४३° अंशाच्या कोनातून गोळा फकला जाणे पदार्थ विज्ञानशास्त्रानुसार कसे परिणामकारक आहे. त्यासाठी कोणकोणत्या कृती करायला पाहिजेत याचे बौद्धिक पातळीवर शास्त्रीय व अभ्यासपूर्ण केलेले विवेचन शिकणाऱ्याला व अधिक प्रमाणात शिकविऱ्याला समजणे आवश्यक आहे.

शास्त्र, संशोधन आणि नवनिर्मिती यातून साधणारी प्रगती हे आमच्या रूढी प्रिय आणि नवीन काही करण्यास उत्सुक नसलेल्या शरीर व मनास रुचत नाही. आमच्या व्यायाम शाळांच्या निरनिराळ्या तथाकथित जुन्या व तोच तो पणाने भरलेल्या शारीरिक कृतीत बुद्धिवादी, यंत्रयुगाच्या नवीनतेने भारावलेल्या युवकास गतिमान–आधुनिक शारीरिक व्यायामप्रकार वा हालचाली नाहीत हे सुद्धा व्यायामशाळांची व आमच्या शाळांमधील क्रीडांगणे रिकामी पडण्याचे एखादे कारण होऊ शकेल

शारीरिक शिक्षण-क्रीडा

एकंदर समाज स्वास्थ्यासाठी आमचे शारीरिक शिक्षण, क्रीडा–मनोरंजन–सहली–शिबिरे–हे फार मोठ्या प्रमाणात शालेय विद्यार्थ्यांशी संबंधित राहिले आहे. आमचे अभ्यासक्रम पदव्या फक्त शालेय विद्यार्थ्यांना समोर ठेवून तयार करण्यात आलेले आहेत. त्यापेक्षा ' बॅचलर ऑफ स्पोर्टस् ' असा अभ्यासक्रम व त्यानुसार पदवी देण्यात यायला हवी. पुण्या मुंबईच्या परिसरात कारखान्यांचे, औद्योगिक क्षेत्रांचे प्रमाण वाढत आहे.

तेथील कारखान्यात 'उत्पादक–श्रम' पैसे मिळवून देत असतात. त्या त्या कारखान्यांजवळ शाळांपेक्षा पैसा जास्त आहे. त्याचा उपयोग कामगारांच्या, श्रमिकांच्या क्रीडास्पर्धा व मनोरंजन इ. साठी करता येईल. बरे, शाळा–महाविद्यालयातील विद्यार्थ्यांपेक्षा या श्रमिकांच्या मनावरील ताण हचा पर्यायी कृतीमुळे कमी करता येईल.

खेळ–क्रीडा–ही जीवनातील विशिष्ट शालेय वयातच अनुभवाची गोष्ट आहे हे विसरून संपूर्ण जीवनभर कोणत्या ना कोणत्या खेळाची आवड जोपासून खेळण्याचा आनंद व स्वस्थ शरीराचे समाधान सारे आयुष्यभर घेण्याची वृत्ती निर्माण झाली पाहिजे. दैनंदिन जीवनात मानसिक दृष्टचा खिलाडूवृत्ती व शारीरिक दृष्टचा अखंड उत्साहाने काम करण्याची क्षमता आणण्याचे खेळ–क्रीडा हे एक उत्तम साधन आहे. शाळा, समाज, शासन, आणि सामाजिक संस्था माझ्यासाठी काही करतील आणि मग मी खेळेन हा समज खेळाच्या आवडीस पोषक नाही. लहानमुले नाही का स्वतःच खेळत. त्याची जागा आणि साहित्य स्वतःच शोधतात. त्यात रमून जातात. आपणही दिवसातील काही काळ लहान व्हायला खेळायला शिकले पाहिजे. त्यात आनंद आहे ! समाधान आहे ! !

□

चित्रकला शिक्षणाचे महत्त्व

डॉ. भय्यासाहेब ओंकार

मनुष्याची पाच बोटे म्हणजे एक महाकाव्यच होय. म्हणून ज्यांच्या हातात कौशल्य आहे व नजरेत अचूकता आहे ते सौंदर्यसृष्टीबरोबर संशोधनाच्या ही नव्या वाटा शोधू शकतात. डॉ. भय्यासाहेब ओंकार यांनी कला शिक्षणाचे स्वरुप, समस्या व उपाय याविषयी केलेले मार्गदर्शन मोलाचे वाटते.

शाळेच्या व्यवहारात दोन शिक्षकांना बऱ्याच ठिकाणी स्वतंत्रपणे लेखले जाते. शारीरिक शिक्षण शिकवणारे आणि चित्रकला शिकवणारे. शिक्षकांच्या विश्रामिकेतही ते बाजूचा कोपरा धरतात. वेळापत्रकात इतर सर्व विषयांची सोय झाल्यावर जागे नुसार त्यांच्या तासिक ठरविण्यात येतात. बऱ्याच वेळा सरकारी आदेश बाजूला सारून तासिका कमीही देण्यात येतात. वार्षिक परिक्षेचा निकाल जाहीर करताना बहुधा या विषयात कोणी नापास होत नाही. झाला तर त्याचे गुण वाढविण्याचे काय मुख्याध्यापक आपल्या अखत्यारीत करून टाकतात. इतर विषयापेक्षा या विषयाचे महत्व कमीच समजले जाते. अनेकदा मनांत अशी शंका ही असते की ' शालेय अभ्यासक्रमात हे विषय कशासाठी ठेवले आहेत ? हे विषय शिकवले नाही तर विद्यार्थ्याचे काही नडणार आहे कां ? '

चित्रकलेकडे दुर्लक्ष का ?

शारीरिक शिक्षणावर बोलण्याचा माझा अधिकार नाही पण अनेक शाळांचे वेळापत्रकात मध्यान्हकाळी शारीरिक शिक्षणाचे तास ठेवलेले पाहून मनाला खटकते एवढे खरे. चित्रकला शिक्षणाच्या बाबतीत परिस्थिती निराळी नाही. उलट ती अधिक चिंताजनक आहे. पूर्वी चित्रकला हा विषय नववीपर्यंत सक्तीचा होता. हा विषय घेऊन एस. एस. सी. ला बसण्याची सोय होती आणि या संधीचा फायदा दरसाल साठ हजार विद्यार्थी घेत होते. आता ही परिस्थिती फार बदलली आहे. एस. एस. सी. ला हा विषय असला तरी परिक्षा शाळेतच घेतली जाते आणि गुणाऐवजी श्रेणी दिली जाते. शाळेतले शिक्षक कधीच या विषयात नापास करीत नसल्याने या विषयाचे शिक्षण देणारे आणि

घेणारे उदासीन असता. आता हा विषय जेमतेम आठवीपर्यंत शिकविण्याची सोय आहे. आणि बऱ्याच ठिकाणी प्रशिक्षित शिक्षका विरहितच हा विषय शिकविण्याची सोय करण्यात येते. अनेक शाळांत चित्रकला वर्गाची सोय नाही. जेथे पूर्वी चित्रकला वर्ग होते तेथेही ते आता राहिले नाहीत. त्यामुळे वस्तुचित्रासारखे विषय केविलवाण्या पद्धतीने शिकविले जातात. खरे म्हणजे हा विषय इतका दुर्लक्षित का केला जातो ? या विषयाचे शिक्षणाच्या दृष्टीने खरोखरच फारसे महत्व नाही का? एका दृष्टीने या विषयांचे महत्व अनन्यसाधारण मानायला हवे.

व्यक्ति विकासासाठी कला शिक्षण

मनुष्य ज्ञान संपादन करतो ते त्याच्या पंचेंद्रियाच्या द्वारे. त्यातही नेत्रांचे महत्व वादातीत आहे. मनुष्य जगाला कृतीद्वारे ज्या गोष्टी देतो त्या बहुतेक त्याच्या हाताने. या दृष्टीने हात हे ही फार महत्वाचे साधन आहे. नेत्र आणि हात या दोन्ही इंद्रियाचे कौशल्य वाढविण्यासाठी चित्रकला हा विषय अत्यंत उपयुक्त ठरतो. सध्याच्या शिक्षणात कार्यानुभवाला महत्व देण्यात येते. आजपर्यंत अभ्यासक्रमाची रचना बहुसंख्य पुस्तकी ज्ञानावर आधारीत होती. याला क्रियाशीलतेची जोड फक्त चित्रकला, हस्तकला, संगीत आणि शारीरिक शिक्षण यातच समाविष्ट होती आता हे सर्व विषय दुर्लक्षित झाले आहेत. ही गोष्ट शैक्षणिक दृष्टचा हितावह नाही. आणि त्यातही नेत्र आणि हात यांचे कौशल्य वाढविण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या चित्रकलेला बाजूला सारणे तर व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने फारच धोक्याचे आहे.

व्यक्तिमत्वविकासात कलाशिक्षणाला महत्वाचे स्थान आहे अमेरीकेच्या नॅशनल एज्युकेशनल असोसिएशनने प्रसिद्ध केलेल्या Music & Art in the public schools संशोधनात्मक अहवालात म्हटले आहे की, ' I hold that meaningful experience with the arts does help to equip a young person to deal with the problems of life, whether they be practical, moral psychological or spiritual. Can any one reasonably argue that the arts hold second Place to any other discipline of learning in heightening perception, sharpening the intellect, and in strengthening saviction ? the answer is they cannot because the qualities which the arts offer to educators are unique, they exist in no other discipine. '

आजकालच्या जमान्यात शिक्षणाला धंदेवाईक बनविण्यांचा अधिक प्रयत्न दिसतो. ताबडतोब मिळवता होण्याच्या दृष्टीने स्टोव्हदुरूस्तीपासून अनेक उद्योगधंद्याचे प्रत्यक्ष शिक्षणच शाळातून समाविष्ट करण्याचा प्रयत्न आहे. खरे पाहिले तर हे शिक्षण फारच जुजबी तऱ्हेचे दिले जाते आणि सामुदायिकपणे या शिक्षणाच्या सुविधाही हव्या तशा

उपलब्ध होत नाहीत. शिक्षणाचा हेतू एक ' अर्थार्जन ' हा जरूरच मानायला हवा–पण ' व्यक्तिमत्त्वविकास ' हा त्या हेतूचा पाया हवा. Policy of Industrial Education या पुस्तकात जे.देवे यांनी या बाबतीत सुस्पष्टपणे म्हटले आहे की-'In these places the aim has not been to turn the schools into preliminary factories supported at public expense, but to borrow from shops the resources and motives which make teaching more effective and wider in reach. ...In the second place, the aim must be efficiency of industrial intelligence, rather than trade efficiency.' कार्यानुभवाच्याद्वारे वेगवेगळचा धंद्यांच्या शिक्षणाचा उपक्रम वाईट नाही, पण तो प्रमुख मानून कलाशिक्षणाला दुय्यम स्थान देणं इष्ट ठरणार नाही श्री. देवे यांनी पुढे असेही म्हटले आहे की, केवळ धंदेशिक्षणाने त्या धंद्यातल्या नव्या संशोधनाला अगर प्रगतीला चालना मिळणार नाही. त्यासाठी व्यक्तिमत्त्वविकासाचेच महत्त्व मानायला हवे.

कला शिक्षण : सौंदर्य दृष्टीची जननी

ज्या विद्यार्थ्याचे हातात कौशल्य आहे, नजरेत अचुकता आहे आणि कल्पनेने एखादी गोष्ट अंतःचक्षूंपुढे उभी करण्याचें सामर्थ्य आहे तो कोणत्याही व्यवसायात शिरला तरी त्याला यश प्राप्त होईल एवढेच नव्हे तर त्या धंद्यातल्या संशोधनाच्या नव्या वाटा तो शोधू शकेल ही कल्पकता वाढायला चित्रकला हा विषय शालेय शिक्षणात फारच महत्त्वाचा ठरतो.

शालेय चित्रकलेच्या शिक्षणातून केवळ चित्रकार निर्माण व्हावेत ही अपेक्षा नाही. चित्रकला ही एक स्वतंत्र भाषा आहे. जागतिक स्तरावर विचार पटवून द्यायला उपयुक्त ठरेल अशी ही विश्वभाषा आहे नवीन यंत्रे करताना तिचे ज्ञान उपयुक्त ठरेल. कुठल्याही वस्तूच्या बनावटीत आवश्यक असणारी प्रमाणबद्धता चित्रकलेच्या शिक्षणाने साध्य होईल वैद्यकशास्त्रातही शल्यकौशल्यात आणि स्थापत्यशास्त्रातही एखाद्या वास्तूची कल्पना साकार करताना तिचे ज्ञान उपयुक्त ठरते. रोजच्या जीवनातही आनंददायी ठरणाऱ्या सौंदर्यदृष्टीची ती जननी आहे.

कलाशिक्षण : अन्य विषयांना पोषक

जगातल्या बहुतेक सर्व देशांतून हा विषय शिकविला जातो युनेस्कोने जिनिव्हा येथे १९६० साली झालेल्या इन्टरनॅशनल कॉन्फरन्स ऑन पब्लिक एज्युकेशन चे वेळी प्रसिद्ध केलेल्या अहवालावरून तर युनायटेड स्टेटस्, जपान, कोरिया, कॅनडा, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, स्कॉटलंड अशा अनेक देशांतून माध्यमिक शाळेच्या अखेरच्या इयत्तेपर्यंत या विषयाच्या शिक्षणाची सोय आहे असे दिसते. भाषा, गणित व शास्त्र या विषयांना शालेय

अभ्यासक्रमात महत्त्वाचे स्थान असले तरी कलाविषयाला गौण मानण्याचे कारण नाही. इंग्लंडमध्ये १९४३ साली कमिटी ऑफ द सेकंडरी स्कूल एक्झॅमिनेशन कौन्सिलने सादर केलेल्या अहवालात कलाविषयाचे अभ्यास क्रमातील महत्त्व पुढील शब्दात मांडले आहे. ' The matter may be put plainty thus–if through Literature or Languages or Mathematics, or whatever it may be, a boy is learning to appreciate form and design and structure and composition, he will lose much if he does not go on to appreciate them also in painting,Sculpture, music and the crafts; he will be incomplete... The special values of Art and Music will remain what they are, both for the artist and musician and their public and life is poorer without them. ' याच अहवालात कलाविषयाचा उपयोग इतर विषयांना होतो हे सांगताना म्हटले आहे, ' A little guidance in the technique of drawing would go a long way to help Pupil; to make the sketches and diagrams necessary in Biology, geography, Nature study and Field work, scouting, Local serveys and Local History, and no doubt in other subjets and activitiees '

कलाशिक्षण : एक सांस्कृतिक ठेवा

कलाशिक्षणाचे महत्त्व असे अनेक तऱ्हेने मान्य होण्याजोगे आहे. महाराष्ट्रात या शिक्षणाची व्यवस्था पूर्वी फारच उत्तम होती. एवढेच नव्हे तर इथल्या कलाशिक्षणाचा दर्जा भारतात अग्रेसर होता. गेल्या पन्नास वर्षांतील जागतिक कीर्तिच्या भारतीय चित्रकारांची यादी पाहिली तर त्या यादीत बहुसंख्य चित्रकार महाराष्ट्रातले आहेत. आबालाल रेहमान, धुरंधर, हळदणकर, देउस्कर, गोंधळेकर, गुर्जर, बाबूराव पेंटर, वडणगेकर, पळशीकर, अलमेलकर, चावडा, बेन्द्रे, हुसेन, लक्ष्मण पै, सडवेलकर, सातवळेकर, दलाल, मुळगावकर, गोडसे, एस्. एम्. पंडीत, बी. प्रभा, आरा, प्रफुल्ला डहाणूकर आणि असे अनेक नामवंत चित्रकार महाराष्ट्रातलेच आहेत. या चित्रकारांच्या कर्तृत्वाची बीजे त्यांच्या शालेय शिक्षणातील कलेच्या अभ्यासक्रमातच जोपासली गेली. देशाचा सांस्कृतिक ठेवा म्हणून जर कलेकडे बघितले जात असेल तर त्या कलेचे शिक्षण देणे हेही एक महत्त्वाचे राष्ट्रीय कर्तव्य ठरते. त्या शिक्षणातून रसिकता तरी निश्चितच वाढेल आणि देशाला ते उपकारक ठरेल.

ज्या महाराष्ट्रात हे कलेचे महत्त्व गेली अनेक वर्षे यासाठीच मानले गेले त्या महाराष्ट्रात तरी कलेच्या शिक्षणाची अबाळ होऊ नये. कलाशिक्षणाची बसलेली उत्तम घडी विस्कळीत होऊ नये. अजूनही वेळ गेलेली नाही. कलाशिक्षणाचा मोडकळीस आलेला सांगाडा दुरुस्त करता येईल आणि वैभवशाली इमारत उभी राहू शकेल. त्यासाठी पुढील

गोष्टीकडे लक्ष पुरवायला हवे.

१) शाळेत प्रशिक्षित कलाशिक्षक नेमणे.

२) आवश्यक ते साहित्य आणि जागा उपलब्ध करून देणे.

३) पूर्वीप्रमाणे शालान्त परीक्षेत बोर्डाकडून परीक्षा घेण्याची व्यवस्था करणे व इतर विषयांऐवजी चित्रकला हा विषय घेण्याचो सोय ठेवणे.

४) मेडिकल, इंजिनिअरिंग, वगैरे इतर शाखांतून एस्. एस् सी. ला चित्रकला हा विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेशात अग्रहक्क देणे.

□

आचार्यकुल : एक शाश्वत शैक्षणिक विचार

प्राचार्य प्र. द. पुराणिक

' ज्यांना जाणीव आहे त्यांनी जाणीव नसलेल्यांना मार्गदर्शन करावे. ' हा विचार शिरोधार्य मानून संपूर्ण देशाला सुजाण करण्यासाठी सतीचे वाण पत्करलेले आचार्य कुल हा आचार्यांचा धर्म बनावा. प्राचार्य प्र. द. पुराणिक यांनी आचार्य कुलाच्या विचार संपदेला घातलेली गवसणी मनोज्ञ आहे

आज देशामध्ये सर्वत्र कमी-अधिक प्रमाणात भ्रष्टाचार, दुराचार, अनाचार, स्वैराचार, स्वेच्छाचार बोकाळले आहेत. महागाईचा भस्मासूर सर्वांना छळतो आहे. समाजात सर्वत्र बेशिस्त माजलेली दिसत आहे.

देशाची अशी स्थिती वर्षा-दोनवर्षांतील नाही. ती स्थिती पाहून सदसद्विवेकबुद्धी जागृत असलेली अनेक नेतेही अस्वस्थ होऊ लागलेत. माजी राष्ट्रपती झाकीर हुसेन यांनी ही मनाची टोचणी टोचू लागली. त्यांनी आचार्य विनोबांजवळ आपली व्यथा कथन केली. आचार्य विनोबांनी त्यांना अत्यंत गंभीर चिंतनानंतर सांगितले की आपल्या देशात आचार्य-शक्ती विलयाला गेली आहे, ती पुन्हा निर्माण झाली पाहिजे. तीच देशाला तारू शकेल. या संदर्भातच आचार्य कुलाची स्थापना ६ मार्च १९६८ रोजी बिहारमध्ये कहोल मुनींच्या आश्रमस्थ कहोल गावी विधिवत झाली. अनेक शिक्षणमंत्री, विश्वविद्यालयांचे कुलपती, कुलगुरू, विद्वान प्राध्यापक आदी लोक या प्रसंगी उपस्थित होते. काही वर्षे याचा प्रसार, प्रचार झाला, पण आचार्य विनोबा व इतर सेवाभावी कार्यकर्ते, भूदान यज्ञात गुंतल्यामुळे हे कार्य गतिमान होऊ शकले नाही.

देशाच्या सध्याच्या परिस्थितीवर उपाय म्हणून आचार्य कुलाने वेदातले एक बोधवाक्य निश्चित केले आहे. ' चिकित्वांसी अचेतसम नयन्ति. ' ऐकायला कठीण वाटले तरी अर्थाला अतिशय सोपे आहे, पण आजपावेतो आचरणात आणले गेले नाही म्हणून मनात अतिशय खंत निर्माण करणारेही आहे. अर्थ किती सोपा आहे- ' जाणीव असलेले जाणीव नसल्याचे मार्गदर्शन करतात. ' ज्याला ज्याला जीवनाची थोडीशी जाणीव आहे त्यांनी जीवनासंबंधी अज्ञान असलेल्यांना मार्गदर्शन करावे. त्याने निश्चित लाभ होईल. नातवा-

जवळ वृद्ध आजोबा शिकवायला बसत हे रशियन क्रांतीचे बीज आहे. वेदांची ही शिकवण आपण जशी विसरलो तशीच पूज्य समर्थ रामदासांचे अमृतवाक्यही विसरलो. जे जे आपणासी ठावे, ते ते सकळासी शिकवावे, शहाणे करुनी सोडावे, सकळजन अल्पशा शिक्षणाने अहंकारित होऊन आपण सामान्य शेतकरी, कामकरी बंधूंशी स्नेहाने दोन शब्द बोलत नाही. ते सारे अस्वच्छ, अडाणी, अशिक्षित म्हणून त्यांची घृणाही करतो. अर्थ एकच असलेल्या वरील दोन सूत्रांचे प्रामाणिकपणं आचरण केले असते व व्यवहारात आणले असते तर आजची भीषण परिस्थिती ओढवली असती का ? एकप्रकारे दैनंदिन जीवनात अत्यावश्यक असलेली ही शैक्षणिक प्रक्रियाच नाही का ?

आचार्य कोण ?

आचार्य कुल संपूर्ण देशालाच सुजाण करू इच्छिते. सुजाण करण्याची ही प्रक्रिया शिक्षणकेंद्रित आहे. अर्थातच ही प्रक्रिया प्रारंभी शिक्षण केंद्रित होईल यासाठी आचार्य कुल आचार्यपदासाठी योग्य शिक्षक निर्माण करू इच्छिते. योग्य शिक्षक म्हणजेच आचार्य. आचार्य विनोबांनी आचार्याची चार शब्दांत व्याख्या केली आहे. ते म्हणतात ' आचार, विचार, प्रचार आणि संचार करतो तो आचार्य. ' या चारही शब्दांमध्ये फार गंभीर अर्थ आहे. आचार्य म्हणज आचरण करणे. अयोग्य गोष्टींचे आचरण करावयाचे नसते. जो नेहमी शुद्ध पवित्र व मंगल आचरण करण्यासाठी देशाच्या व समाजाच्या भल्यासाठी विचार करतो, त्याचा सातत्याने प्रचार करतो आणि त्या प्रचाराठी संचार करतो तो आचार्य. आपण म्हणाल, असे आचार्य तर अशक्यच. तसे नाही. आचार्य शब्दाला फार व्यापक अर्थात प्रयुक्त करायचे आहे. आचार्य शब्दाचा उच्चार करताच शंकराचार्य रामानुजाचार्य, वल्लभाचार्य, आचार्य कृपलानी, आचार्य नरेंद्रदेव. . . इत्यादी मूर्ती आपल्या डोळचासमोर उभ्या राहतील. ते बरोबरही आहे, पण आचार्य कुलाच्या परिभाषेप्रमाणे एखादा सामान्य, पण अत्यंत अनुभवी, निपुण शेतकरीही वरील चार शब्दांप्रमाणे आचरण करणारा असेल तर तोही आचार्य होऊ शकतो. लोहार, सोनार, शिंपी, तेली, तांबोळी आपापल्या व्यवसायात निपुण असतील व वरील चार शब्दांचे काटेकोरपणे पालन करीत असतील तर तेही आचार्य होऊ शकतील व समाजातील अनेक व्यक्तींचे प्रबोधन करू शकतील. सावता माळी, गोरा कुंभार, सेना न्हावी, नरहरी सोनार हे नाही का आचार्य झाले ?ढोंगी, शिक्षित पदवीधरांपेक्षा त्यांनाच याचा अधिकार अधिक आहे.

समाजाची विभागणी

आपण समाजाची साधारणपणे तीन वर्गांत विभागणी करतो. उच्च वर्ग,मध्यम वर्ग व कनिष्ठ वर्ग. १) उच्च वर्ग आपल्या संपन्न स्थितीमुळे व स्थापित स्वार्थामुळे समाजाविषयी व देशाविषयी बराच उदासीन असतो. त्याला महागाईचे चटके बसत

नाहीत की त्यांच्या मुलाबाळांची आबाळही होत नाही. २) कनिष्ठ वर्ग खूप असमंजस अशिक्षित व स्वत:च्या स्थितीविषयसुद्धा बेखबर असतो. त्यांतील दहा टक्के व्यक्ती थोड्या असमंजस असतात त्या दारिद्राने लाचार, दु:खी, कष्टी, हतोत्साह होतात व ईश्वरावर भार टाकून जीवनाविषयी निराश होतात. ३) मध्यम वर्गाचे दोन भाग आहेत अ) उच्च मध्यम वर्ग ब) निम्न मध्यमवर्ग उच्च मध्यम वर्ग आर्थिक स्थितीने बेताचा असला तरी त्याची स्थिती दयनीय नसते. त्याला जीवनाचा गाडा रेटताना त्रास होत नाही. तो डोक्याला कशाला कटकट करून घ्या म्हणून देशाविषयी थोडा बेफिकीर व निष्क्रिय असतो. निम्न मध्यम वर्ग मात्र नेहमीच महागाईच्या चक्रातून पिळून निघतो. जीवनमूल्यांचे पालन करता करता घायकुतीस येतो. त्याला समाजमूल्यांची बांधिलकीची जाणीव असते. म्हणून तो अधिकाधिक अस्वस्थ होतो, या अत्यंत्य अस्वस्थतेतूनच समाज परिवर्तनाची म्हणजेच आमूलाग्र अहिंसक क्रांतीची शक्यता निर्माण होते फ्रेंच राज्यक्रांती व रशियन राज्यक्रांतीचे मूळ याच वर्गात आहे. पण हा वर्ग ही एकूण वातावरणामुळे गलितगात्र झाला आहे. प्रथमत: या वर्गाला आणि क्रमश: नंतर प्रत्येक वर्गाला आचार्य कुलात समाविष्ट करावयाचे आहे.

आचार्य कुलाच्या निष्ठा —

आचार्य कुलात समाविष्ट करताना त्या व्यक्तीला तीन निष्ठांचे पालन करायचे आहे या तीन निष्ठा अशा आहेत – १) विद्यार्थी-निष्ठा, २) ज्ञान-निष्ठा, ३) समाज-निष्ठा, यांचे अति थोडक्यात स्पष्टीकरण असे - जो जो जिज्ञासू तो तो विद्यार्थी. त्याला हातचे काहीही राखून न ठेवता ज्ञान द्यायचे ही विद्यार्थीनिष्ठा. ज्ञानाचे अनेक विषय आहेत. पण समाजजीवन आणि तद्वारा देश जीवन प्रगत होईल अशा विषयांचेच अधिक चिंतन, मनन करून त्याचा प्रचार करणे म्हणजे ज्ञाननिष्ठा. प्रारंभी समाजातील एका समूहाची निवड करून त्या समूहाच्या सर्व समस्या सोडवण्यासाठी मार्गदर्शन करणे म्हणजे समाजनिष्ठा.

आचार्य कुलातील व्यक्तीने १) निर्भय २) निर्वैर ३) निष्पक्ष राहून आपले आचार्यपदाचे श्रेष्ठत्व टिकवले पाहिजे जो स्वत: भित्रा, द्वेषाने व वैरभावनेने पछाडला. आहे, सीमित विचारांच्या पक्षाच्या बांधिलकीने बांधला गेला आहे तो इतरांना शुद्ध मार्गदर्शन कसे करू शकेल ? आचार्याला वेदात ' गातुवित ' म्हटले आहे. खेळातल्या पंचाप्रमाणे न्याय द्यायची त्याची निष्पक्ष भूमिका आहे, जो स्वत: भ्रष्टाचारी आहे तो नैतिकतेवर मार्गदर्शन कसे करू शकेल? जो पक्षात आहे तो निष्पक्षपणे विचार कसा करणार? जितके ज्याचे मन शुद्ध तितकी त्याची मानसिक व नैतिक शक्ती अधिक.

आचार्य—कुलाच्या चार शक्ती

अनेक प्रकारचे अत्याचार होताना आसपासचे काही लोक अस्वस्थ होतात पण

अगतिक होऊन पाहण्यापलीकडे काही करीत नाहीत. त्यांना दुष्ट म्हणायचे का? नाही. ते सज्जन आहेत का? हो. मग गप्प का बसतात? त्याची दोन कारणे आहेत. ते निर्भय नाहीत आणि निष्क्रिय आहेत आचार्य-कुल सज्जनांची निष्क्रियता आणि भय घालवून त्यांना सक्रिय व निर्भय करून संघटित करू इच्छिते. यालाच आचार्य विनोबा सज्जन शक्ती म्हणतात.

हे सर्व सज्जन बुद्धिमान असतीलच असे नाही. त्याला बुद्धिवंतांनी मार्गदर्शन करायचे आहे. त्याला आचार्य विनोबा विद्वत् शक्ती म्हणतात. पण हे सर्व विद्वान निःस्पृह व त्यागी असतीलच असे नाही. त्यांच्यावर पूर्ण नियंत्रण करायला आचार्य म्हणजे आचार्य शक्ती हवी. सज्जन शक्ती, विद्वत् शक्ती व आचार्य शक्ती यांच्या सहकार्याने ग्रामशक्ती निश्चितपणे निर्माण होईल आणि ग्रामविकास घडू लागेल.

कुल म्हणजे कुटुंब. त्यात गुण्यागोविंदानें एकत्र येऊ या. त्यासाठी प्रत्यक्ष आचरण हवे. यासाठी आचार्य विनोबा म्हणतात, 'पढना एक गुना (वाचन एक पट). चिंतन दो गुना (चिंतन दुप्पट) और आचरण चार गुना (आणि आचरण चार पट)' म्हणजे प्रत्येक व्यक्तीने सुविचाराप्रमाणे निष्ठेप्रमाणे आणि तत्त्वाप्रमाणे संघटितपणे आचरण करायलाच प्रारंभ केला पाहिजे. तरच सद्यस्थिती बदलेल व सामान्य जनता कायम सुखी होण्याच्या मार्गाला लागेल. त्यासाठी आपले मन, व प्रवृत्ती सुधारली पाहिजे.

□

वृत्तपत्र आणि लोकशिक्षक

प्रा. ल. ना. गोखले

वृत्तपत्र म्हणजे लोकशिक्षणाचे एक प्रभावी साधन होय. सर्व समाज सावध, उन्नत आर्थिकदृष्टचा सुव्यवस्थित करण्यासाठी या समनुयोग माध्यमांचा उपयोग व्हावा, तसेच राष्ट्रीय एकता आणि एकात्मता संवर्धित करणारी बंधुता सतत जागती राहावी यासाठी वृत्तपत्रांनी सदैव दक्ष राहिले पाहिजे. प्रा. ल. ना. गोखले यांनी वृत्तपत्र आणि लोकशिक्षकाचे नाते उकलून दाखविण्याचा केलेला हा एक यशस्वी प्रयत्न.

वृत्तपत्रव्यवसाय आणि लोकशिक्षण यांची सांगड भारतात वृत्तपत्रे सुरू झाली तेव्हापासून लागली असली, तरी लोकशिक्षण म्हणजे नेमके काय आणि वृत्तपत्रांनी त्या बाबतीत आपला वाटा उचलावयाचा म्हणजे खरोखरीच काय करावयाचे याची चर्चा संपलेली नाही. म्हणूनच 'वृत्तपत्रे आपले कर्तव्य चोखपणे बजावीत आहेत' असे म्हणणे एका बाजूला, तर 'वृत्तपत्रे सामाजिक अपेक्षा मुळीच पुऱ्या करीत नाहीत' असा आक्षेप दुसऱ्या बाजूला हे दृश्य दिसते. तेव्हा प्रश्न उत्पन्न होतो तो हा की, लोकशिक्षणाचा अविकसित देशात अर्थ काय, आणि लोकसमनुयोग माध्यमांना सामाजिक संदर्भ असला पाहिजे, नव्हे तशी त्यांची बांधिलकीच हवी हे तत्त्व व्यवहारात उतविण्याचा मार्ग कोणता? पूर्वी धर्म म्हणून समजण्यात येणारा वृत्तपत्र-व्यवसाय हा स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मोठ्या प्रमाणात धंदा बनला याचे देशहिताच्या दृष्टीने परिणाम कोणते?

महायुद्धाचे परिणाम

स्वातंत्र्यप्राप्तीचा टप्पा या अशा चर्चेत गृहीत धरला तरी विचार निश्चिती किंवा सामाजिक बदल या गोष्टी कोणतीही लक्ष्मण रेषा मानीत नाहीत. सर्व प्रकारची शास्त्रीय प्रगती, सांस्कृतिक उन्नती आणि वैज्ञानिक संशोधनाची घौडदौड यांच्या बाबतीतील टप्पे

वा उच्चांक नेमके निर्देशिता आले तरी त्यांच्या पाठीशी असणारी तयारी वा प्रक्रिया तपासणी करून समजावून घेता येते. १५ ऑगस्ट १९४७ पर्यन्त भारतातील साऱ्याच उद्‌बोधनाचे ध्येय स्वराज्य प्राप्ती हे होते आणि प्रत्यक्षत: देश स्वतंत्र झाल्यानंतर एकदम सामाजिक उद्‌दिष्टांमध्ये बदल झाला असे घडलें नाही. दोन जागतिक महायुद्धांच्या दरम्यानच्या काळात भारतात वृत्तपत्र आणि वृत्तपत्रसंस्था यांच्या कार्यकक्षा सर्व दिशांनी वाढल्या.याच काळात भारतात रेडिओ या दुसऱ्या समनुयोग माध्यमाच्या उपयोगास प्रारंभ झाला. दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभापासून देशात आणि जगात घडलेल्या घटनांचा, तंत्र–ज्ञानातील नव्या संशोधनाचा आणि लोकशिक्षणाच्या प्रसाराचा वेग एवढा विलक्षण वाढला की वृत्तपत्रांचा चेहरामोहरा तर बदललाच परंतु पुढे प्राप्त झालेले दूरदर्शन, संदेशवाहक उपग्रह आणि गणकयंत्रे यांच्या योगाने आता भविष्यकाळाचे निराळेच अपूर्व दर्शन घडू लागले आहे. जगात सर्वत्र श्रीमंत अधिक श्रीमंत झाले आणि अविकसित देशातील गरिबी लोकसंख्या वाढीच्या उद्रेकाबरोबर सतत वाढत राहिली.

वृत्तपत्रे : व्यवहार व कार्यामध्ये फारकत

भारतात गेल्या तीस–पस्तीस वर्षात, पूर्वी कधी कल्पनाही केली नव्हती अशी सुबत्ता वृत्तपत्रांना लाभली असली तरी कामगार संघटनांच्या आणि राजकारणाच्या दबावांमुळे विलक्षण सुबत्ता लाभलेल्या बडया वृत्तपत्रांमध्येही मोठ्या प्रमाणात अस्थैर्य निर्माण झाले. वृत्तपत्रास सर्वाधिक खप लाभणें आणि तेच पत्र आकस्मिकपणे बंद होणे महाराष्ट्राने तरी अलीकडेच पाहिले आहे. माहिती मिळविण्याचा लोकांचा अधिकार मान्य केल्यानंतर ' माहिती कोणती–किती–आणि कशी दयावयाची ' त्याबद्‌दलच्या अपेक्षाही व्यक्त होऊ लागल्या आहेत. अर्थात, उत्क्रांतीच्या या अवस्थेस कोणतेही निर्णायक स्वरूप प्राप्त झालेले नसल्यामुळे वैचारिक आणि व्यावहारिक अशा दोन्ही पातळयांवर एक प्रकारची गोंधळाची अवस्था दिसून येते. वृत्तपत्रात द्रव्य ओतणारा भांडवलदार आणि हा सगळा विचारांचा व बुद्धीचा विषय आहे असे मानणारा संपादक यांच्या हितसंबंधात आणि हक्कात, व्यवहारात आणि कार्य पद्धतीत द्वैत उत्पन्न झाले आहे. म्हणूनच या प्रश्नांची सर्वांगीण चिकित्सा होणे आत्यावश्यक ठरते.

वृत्तपत्र व्यवसायाचे अधिष्ठान : विचारस्वातंत्र्य

आज काही शब्द अतिवापरामुळ अर्थवाहकता गमावून बसले आहेत. स्वातंत्र्य, विचार–स्वातंत्र्य, मुक्ती, पुरोगामी, सत्य, मानवी हक्क, हे सारे शब्द असे आहेत की जे सरळ सुटे वापरले असताना नेमका अर्थबोध होतोच असे नाही. त्यांच्या उपयोगामधून वृत्तपत्रे रोज जे ठसवितात ते कित्येकदा नेमके काय असते याचा पत्ता लागत नाही आणि ज्या देशात वर्तमानपत्र वाचणारे वाचक अतीव अल्पसंख्य आहेत किंवा जेथे सरकारी व्यवहाराचा संदेश लोकांना छापील शब्दाने कळविला जात नाही त्या देशात या शब्दांनी

व्यक्त होणाऱ्या कल्पना केवळ कागदावरच राहतात. जगातील अविकसित देशांमध्ये अलीकडच्या प्रगतीचा अनुभव असा आहे की तिच्यासाठी व्यक्तिस्वातंत्र्याची किंमत द्यावी लागली आहे आणि धडधडींत सत्य हे बेजबाबदारपणाचे ठरले आहे किंवा जबाबदार बनण्याचा अर्थ सत्य दडपून ठेवण्याशी जोडला गेलेला आहे. लोकशाही राष्ट्रांमध्ये सुद्धा राष्ट्रीय अस्मिता म्हणजे लोकांची सर्वसामान्य इच्छा अथवा सर्वसामान्य मत असे आढळून आले आहे. विचार-स्वातंत्र्याच्या बळावर वृत्तपत्राचा संपादक जे म्हणणे मांडतो ते समाजाच्या सर्वंकष हिताचेच असते असे छातीठोकपणे कसे म्हणावयाचे ? चर्चा चिकित्सा, मतभेद या गोष्टी लोकशाहीला पोषक असल्या तरी व्यापक जनहिताच्या निकषावर त्यांच्यामुळेही जेव्हा घात होण्याचा संभव उद्‌भवतो तेव्हा या मूल्यांचा फेरविचार करण्याची गरज उत्पन्न होते. वृत्तपत्र-व्यवसाय हा निर्जिव मालाचा व्यवहार करणारा धंदा नाही. तो केवळ कागद, शाई, यंत्रे यांच्याशी संबंधित असणारा मामला नाही. विचार आणि त्या विचाराची स्वतंत्रता, त्याचा मोकळपणा, त्याचा मूलगामीपणा हे या व्यवसायाचे अधिष्ठान आहे परंतु, विचारांच्या उंचीस समाजहिताची फूटपट्टी लावून किंवा त्यांचा वजनदारपणा जोखण्यात लोकांच्या अस्तित्वाचा तराजू वापरून काय निष्पन्न होते हे पाहिले पाहिजे.

लोकशिक्षणाचे आधारस्तंभ

पाश्चिमात्यांनी आपल्याला राजकीय क्षेत्राच्या अनुषंगान स्वतंत्रता, लोकशाही आणि व्यक्तिस्वातंत्र्याशी संबंधित असणारे हक्क यासंबंधीची मूल्ये दिली. त्या सर्वांस कालप्रवाहाच्या बदलत्या अनुभवानुसार काही एक अर्थ प्राप्त झाला. परंतु सुधारणा आणि तथाकथित उच्च विचार यांचे ठेकेदार बनलेली स्वतंत्र राष्ट्रे एकीकडे आणि दारिद्र्याच्या खाईमध्ये वर्षानुवर्षे जीवन जगणारे, धडपणे पोषणही न होऊ शकणारे कोट्यवधी लोक दुसरीकडे, असेच जर नव्या जगाचे चित्र उभे राहिले असेल तर उच्च कल्पनांचा आणि थोर वैचारिक अधिष्ठानाचा काय उपयोग ?' वैचारिक स्वातंत्र्याशिवाय विकास अशक्य आहे आणि नवनवीन विचारांचा प्रादुर्भाव संपला त्या समाजाच्या सांस्कृतिक जीवनाचा शेवट जवळ आला ' या म्हणण्यामधील इत्यर्थ लक्षात घेण्यासाठी सुद्धा आर्थिक विकासाची काही एक मजल गाठलेली असावयास हवी. विचार संशोधनाची जो समाज प्रयोगशाळा ठरावयाचा त्याचे अस्तित्व प्रथम प्रतीत झाले पाहिजे. ते उत्पन्न करण्याच्या कामी लोकसमनुयोग माध्यमांना पुष्कळ काही करता येईल. मात्र त्यासाठी वृत्तपत्रांसह सर्वच माध्यमांनी आपल्या जीवितहेतूंचा पुनर्विचार केला पाहिजे. सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जाची व संधीची समानता, या गोष्टींची लोकशाही गणराज्य घडविण्याच्या अनुषंगाने भारताच्या संविधानाने हमी दिली आहे. या सर्वांमध्ये व्यक्तीचो प्रतिष्ठा आणि राष्ट्रीय एकता आणि एकात्मता संवर्धित करणारी बंधुता सतत जागती ठेवण्याचा या

संविधानाचा निर्णय आहे. वृत्तपत्रांनी जे लोकशिक्षण करावयाचे त्याचा हा सर्व आधार आहे. कलह, प्रक्षोभ आणि विद्वेष यासारखे दुर्गुण त्याच्याजवळसुद्धा येता उपयोगी नाहीत. परंतु दुर्दैवाने प्रत्येक बाबतीतच संघर्ष, दंगल आणि आक्रस्ताळेपणा यांचा एवढ्या सहजपणे अवलंब केला जातो आणि त्यासंबंधीची चित्रे वृत्तपत्रे अशा काही गडद रंगात रंगवतात की त्यामुळे कित्येकदा, विनाशाकडेच वाटचाल सुरू झाल्यासारखी वाटते.

समाज विकासासाठीच समनुयोग माध्यम

'वृत्तपत्रे सामाजिक अपेक्षा मुळीच पुऱ्या करीत नाहीत' असे देशातील वृत्तपत्रांबद्दल सरकारतर्फे जेव्हा म्हणण्यात येते तेव्हा त्या वर्णनाचा अर्थ असा असतो की आताची वृत्तपत्रे लोकांना मार्गदर्शन करण्याऐवजी केवळ लोकाराधन व लोकानुरंजन करीत आहेत. म्हणजे, एकप्रकारे लोकच वृत्तपत्रांस मार्गदर्शन करीत आहेत! वाचकांना केवळ जास्तीत-जास्त उत्तेजित करणारा मजकूर-बातम्या, चित्रे, अन्य लिखाण पुरविला जातो. नेमके काय घडले हे सांगता सांगता काही एक दृष्टिकोण पुरविणे आपले काम आहे किंवा बातम्या देतानाही त्यांचा अर्थ सुचविणे शक्य आहे, हे कितीतरी वृत्तपत्रांच्या गावीही नाही. त्यामुळेच घात-अपघात-उत्पात, संघर्ष-विद्वेष आणि कलह यांच्या रंगांनी रंगलेले समाजाचे चित्र वाचकाच्या डोळ्यांसमोर उभ राहते. वृत्तपत्रे जी उद्दिष्टे साधतात त्यात लोकांची करमणूक होणे हेही एक उद्दिष्ट असते हे खरे आहे; परंतु करमणूक याचा अर्थ निकृष्ट दर्जाच्या भावनांची चाळवाचाळव किंवा गंभीर विचार दूर सारणारे विषय असा घेतला जातो आणि त्यालाही लोकशिक्षणाचेच नाव दिले जाते ! लोकशिक्षणाचा विषय म्हणजे वृत्तपत्राचा खप कमी करून घेण्याचा मार्ग असे एक चुकीचे समीकरण बसून गेले आहे. जणू काही लोकशिक्षण ही चमत्कारिक जोखीम आहे आणि त्याबाबतीतील मार्गाचा अवलंब निव्वळ काटचाकुटचांनी भरलेला आहे अशा धर्तीचा व्यवहार वृत्तपत्रांमध्ये व्यक्त होतो. गमतीची गोष्ट अशी की, दहावीच्या आणि अकरावीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणास सहायक होणारा अभ्यासाचा मजकूर देणारी वृत्तपत्रेही केवळ खपवाढीचे लक्ष्य डोळ्यांपुढे ठेवतात आणि लोकशिक्षणाचे व्यापक ध्येय दुर्लक्षून आपली महत्त्वाची जागा दहावी-अकरावीतल्या वाचकांच्या सोयीखातर खर्च करतात ! तेव्हा हे लक्षात घेतले पाहिजे की लोकशिक्षण म्हणजे दहावी-अकरावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षांची तयारी करणे नव्हे किंवा दूरदर्शनवरील शालेय कार्यक्रम नव्हे. **समनुयोग माध्यमांचा शैक्षणिक उपयोग हा समाज सावध, उन्नत आणि आर्थिकदृष्ट्या सुस्थित करण्यासाठीच झाला पाहिजे.**

पत्रकारिता जेव्हा पीतवर्णाकडे झुकते.

हा सारा साम्यवादी दृष्टिकोण आहे आणि साम्यवादी राष्ट्रांमध्ये या बाबतीत तत्त्वज्ञानाचे आणि विचारांचे जसे आकर्षक ठोकळे बनविण्यात आले आहेत ते आपल्या

समाजापुढे मांडण्यात काहीच अर्थ नाही अशातऱ्हेची समजूत या विचारास विरो करणाऱ्यांमध्ये दिसून येते. वास्तविक दारिद्र्यनिवारण करणे आणि लोकस्थिती सुधारणे हे अविकसित राष्ट्राच्या अस्तित्वास खरे आव्हान आहे. ते स्वीकारण्यातील एक भाग म्हणज लोकशिक्षण, ते खऱ्या प्रकाराने करण्यासाठी पाश्चिमात्यांच्या वर्षानुवर्षाच्या राजकीय दबावामुळे उत्पन्न झालेल्या कल्पना नेमक्या कोणत्या आहेत हे हेरून त्यांचा त्याग केला पाहिजे आज सामाजिक संघटनेचा आदर्श म्हणून किंवा सर्वांगीण उत्कर्षाचा प्रमुख घटक या अर्थाने स्वातंत्र्याचे स्थान उरले आहे काय याचा शांतपणे विचार केला तर क य दिसते ? सर्व जगाला लागू पडणाऱ्या सार्वत्रिक नीतिमूल्यांचा पश्चिमी राष्ट्रांमार्फत होणारा आग्रह म्हणजे एक प्रकारचा सांस्कृतिक वसाहतवाद आहे. स्वातंत्र्य मग ते व्यक्तीचे असो व्यापाराचे असो, माहितीच्या खुल्या संचाराचे असो, किंवा सांस्कृतिक देवघेवीचे असो त्याच्या उपयोगात धनिक वर्गाची आणि श्रीमंत समाजाची सोय पाहिली जाण्याची विपरीत पद्धत अविकसित राष्ट्रे अनुभवीत आहेत. या स्वातंत्र्याच्या कल्पनेमुळेच पाश्चात्त्यांना आपले बहुराष्ट्रीय औद्योगिक प्रकल्प हाती घेता आले आणि अविकसित देशावर ते लादता आले ! परिणामी या देशातील खरी संपत्ती घटू लागली आणि दारिद्र्यात अफाट वाढ झाली, म्हणजे एकप्रकारे स्वातंत्र्याचा उपयोग चुकीची औषधयोजना पद्धतशीरपणे करण्यात झाला. परकीय संस्कृतीच्या भटटीत बनलेली ही औषधे असल्यामुळे मागास आणि दुर्बल समाजांचा स्वाभिमान, संस्कृती आणि अस्मिता सतत शबल होत गेली आणि या देशांमध्ये वैचारिक स्वातंत्र्य असूनही नव्या विचारांचा उदय झाला नाही. नवा विचार हा निश्चयाने लोकस्थिती सुधारण्याचाच असू शकतो. ज्या समाजात त्याचा प्रादुर्भाव संपतो त्याच्या संस्कृतीचे झरेच आटल्यासारखे होतात; विकासाचे नवे धुमारे तकलादू ठरतात. पत्रकारिता 'पूत' न बनता पीतवर्णाकडे झुकते !

नवी जागृती—नवे वळण

यूनोमध्ये १९४६ सालापासून या विषयाची चर्चा सुरू झाली. अगदी पहिल्या ठरावात म्हटले होते की, "माहिती स्वातंत्र्याचा उद्देश मनात काहीही वाईट इच्छा न धारण करता अथवा कोणताही पक्षपात न करता ज्ञानाचा निखळपणे प्रसार करणे" हा असला पाहिजे. अलीकडच्या तीन वर्षांत मॅकब्राइड कमिशनची नेमणूक झाल्यापासून तर या विषयाच्या चर्चेस जगभर अक्षरशः उधाण आले होते. माहिती आणि तिच्याबाबतचे स्वातंत्र्य, माध्यमे आणि त्यांची स्वायत्तता, विकासोन्मुख राष्ट्रे आणि त्यांची जबाबदारी, अविकसित राष्ट्रांच्या सरकारांचे समाजाशी आणि व्यक्तींशी असणारे संबंध इत्यादी अनेकानेक विषयांसंबंधी बांडुंग परिषदेपासून (एप्रिल १९५५) ही चर्चा सुरू झाली ती कानकुन परिषदेअखेर (ऑक्टोबर १९८१) चालू असलेलीच दिसते. या साऱ्या मंथनातून स्पष्ट झालेले चित्र उद्‌बोधक आहे. अमेरिका आणि रशिया यांच्या भूमिका स्पष्ट

झाल्या आहेत. चर्चेचा एक फायदा असा झाला आहे की आशिया खंडातील किंवा जगाच्या दक्षिण भागातील अविकसित आणि मागास राष्ट्रांमध्ये जागृतीची जणू लाटच उसळली आहे. विचारांचे आणि तत्त्वांचे हुकमी एक्के आपल्याच हाती आहेत आणि आपल्या सुबत्तेच्या बळावर दुर्बल राष्ट्रांना आपण नामोहरम करू शकू हा बडया राष्ट्रांचा विश्वास हादरला आहे. नव्या जागृतीस 'तिसऱ्या जगतात' कोणते नवे वळण मिळते आणि नव्या आर्थिक रचनेच्या जोडीनेच माहितीविषयक नवी व्यवस्था निर्णायकपणे कोणता आकार घेते हे येत्या काही वर्षांत पक्के ठरेल.

वृत्तपत्राची बांधिलकी

या बाबतीतील विचार करताना भारताने काही मूलभूत गोष्टी विसरता उपयोगी नाही आपली राज्यघटना बव्हंशी पश्चिमी राष्ट्रांच्या राज्यघटनांशी नाते सांगणारी आहे. लोकशाहीची, न्यायपद्धतीची आणि वृत्तपत्र-स्वातंत्र्याची काही एक स्वतंत्र वाट आपण काढली आहे. खुल्या लोकशाही समाजातील लोकांना सर्व प्रकारती माहिती अनिर्बंधपणे मिळाली तरच त्यांची प्रगती होईल ही पश्चिमी राष्ट्रांची पारंपरिक दृष्टी आंपल्या समाजास लागू करताना मिळालेला अनुभव आपल्या गाठी आहे. त्याचप्रमाणे वृत्तपत्र-स्वातंत्र्यास वेसण घातली असता, म्हणजे सेन्सॉरशिपपुढे काय घडते तेही आणीबाणीच्या काळात चांगले समजले. तेव्हा यापुढील वाटचाल ही नव्या भक्कम विचाराच्या आधाराने करणे शक्य आहे. कोणतेही सरकार आणि लोक यांच्या दरम्यानच्या संबंधांची बिजागरी म्हणजे अचूक आणि झटपट मिळणारी माहिती होय. माहिती हा कच्चा माल गोळा करून निवड करण्याच्या आणि महत्त्व देण्याच्या प्रक्रियांच्या आधाराने वृत्तपत्रे नानाविध प्रकारचा माल-मसाला सरकारच्या आणि लोकांच्यापुढे ठेवतात. लोकांची मंडळे किंवा लोकप्रतिनिधिगृहे सत्ताधारी पक्षाच्या बहुसंख्येच्या देण्यामुळे कित्येकदा भ्रष्ट वा अनैतिक व्यवहारांवर पांघरूण घालतात आणि निकृष्ट शक्ती काबूत न ठेवता आल्याने साऱ्या समाजाची अवस्था काय होते हे वृत्तपत्रे दाखवून देऊ शकतात लोकहिताच्या विषयांबाबतही वृत्तपत्रांना परस्परविरोधी माहिती पुरविताना मोठी जबाबदारी पाळावी लागेल. लोकांच्या प्रतिक्रिया सरकारला समजणे, हाती पडणाऱ्या मालाच्या आवडी-निवडीबाबत उत्पादकाला जाणीव करून देणे, व्यापक धोरणे समाजाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोचण्याच्या प्रक्रियेत नेमकी उद्दिष्टे कितपत साधतात यावर बारीक लक्ष ठेवणे या गोष्टी वृत्तपत्रांनी प्रामाणिकपणे केल्या पाहिजेत. लोकमत कित्येकदा फसवं असू शकतं हे समजण्याची गमके तरी कोणती, त्याच्या सर्वसामान्य स्वरूपाचा कानोसा घेतला असता काय जाणवतं, वस्तुस्थितीचा विशिष्ट अर्थ निश्चित करणारे घटक कोणते आहेत इत्यादी गोष्टी समजविण्याच्या सर्व बाजू वृत्तपत्रांना खुल्या आहेत.

विकासोन्मुख पत्रकारितेची गमके

दुसऱ्याच्या मनावर परिणाम करून त्यास क्रियाशील बनविणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट

असल्याने तेच सर्व माध्यमांचे प्राथमिक काम मानले पाहिजे. भारताच्या विशिष्ट परिस्थितीत रेडिओ आणि टी. व्ही. ही प्रभावी माध्यमे सरकारच्याच ताब्यात राहणार आणि वृत्तपत्रेंही लोकांच्या हातात असली तरी त्यास प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष ताबेदारीचे लगाम लागत आहेत. परंतु, लोकशिक्षणाच्या सर्वसामान्य धोरणाबाबतची स्वतंत्रता कायम आहे. या साऱ्या विषयाचे तंत्रज्ञान आणि अत्यावश्यक असणारी ध्येयदृष्टी उपलब्ध करून देणाऱ्या वृत्तपत्रविद्या शिक्षणाची सोय झाली आहे. विकासोन्मुख पत्रकारितेची (डेव्हलपमेंट जर्नॅलिझम)--गमकेही स्पष्ट आहेत. वृत्तपत्रांनी--करावयाच्या शिक्षणाचा अर्थ, लोकशिक्षण कशास म्हणावयाचे आणि ते नेमके कोणी करावयाचे या प्रश्नांची उत्तरे या नव्या संदर्भातच शोधली पाहिजेत.

□

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मानद सचिव

गुरुवर्य बाबूरावजी घोलप

यांची

मुलाखत

आदरणीय गुरुवर्य बाबूरावजी घोलप यांनी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मानद सचिव म्हणून अखंड ४१ वर्षे काम केले. एवढ्या प्रदीर्घ कालखंडामध्ये स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील महाराष्ट्रातील शैक्षणिक घडामोडींचा एक चालता-बोलता इतिहासच मनात भरतो. रविवार दिनांक ४।४।१९८२ रोजी प्राचार्य रा. तु. भगत यांनी आदरणीय बाबूरावजी घोलप यांची मुलाखत घेतली. अत्यंत मनमोकळेपणाने दिलेल्या या मुलाखतीमध्ये पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचा जन्म, कार्यविस्तार व कार्यप्रेरणा यांचा परिचय तर होतोच त्याबरोबरच महाराष्ट्राच्या ग्रामीण शिक्षण-प्रसाराची वाटचाल, अशा शिक्षण-प्रसारामागील ध्येय-ध्यास आणि सतीचे वाण पत्करून या शिक्षण प्रसारासाठी रात्रंदिवस धडपडणारे कार्यकर्ते यांचाही सहजपणे परिचय होतो. पूर्वीचे व आजचे शिक्षण, विद्यार्थी व शिक्षक यांविषयीचे सारगर्भ विचारही ऐकावयास मिळतात आणि म्हणून महाराष्ट्रामध्ये जाणतेपणाने शिक्षण-क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना विचारवंतांना, शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना या मुलाखतीमधील विचार अत्यंत उद्‌बोधक व मार्गदर्शक ठरतील असा विश्वास वाटतो.

दारावरच्या बेलचे बटण दाबले. कुर्र्र् असा आवाज झाला. फार वेळ वाट पाहावी लागली नाही. लगेच दार उघडले. 'या या' च्या स्वागतपर शब्दांबरोबरच मी बैठकीच्या खोलीत आलो. खोलीत चौफेर नजर टाकली. नजरेत भरणारे एकच वातावरण जाणवले. ते म्हणजे साधेपणाचे. साधेपणाचे सौंदर्यच आगळे असते. त्यामध्ये आपुलकीही असते. आपुलकीने मला आपलेसे केले. तोच आतून घोलपसाहेब खोलीत येताना दिसले. 'नमस्कार, साहेब' म्हणतच मी उठून उभा राहिलो. 'बसा-बसा' हे प्रेमळ शब्द ऐकत ऐकतच मी खाली बसलो. 'आता तब्येत कशी काय आहे?' असं मी सहज

विचारलं. कारण दीर्घ आजारातून ते नुकतेच उठले होते. 'आता थोडं बरं वाटतयं– संध्याकाळी घरासमोर थोडं फिरतोही.' माझ्या मनात हत्तीचं बळ वाढत होतं. 'आपण पुणे जिल्हा लोकल बोर्डाचे चीफ ऑफिसर म्हणून सव्वीस वर्षे काम केले. मग या शिक्षण प्रसाराकडे कसे वळला ?' असे मी बोलून गेलो. ते म्हणाले, 'खेडे गावाशी जसा माझा संबंध येऊ लागला, तशी तेथील परिस्थिती मला आव्हान देऊ लागली. अगोदरच आपण पारतंत्र्यात. त्यामुळे अज्ञानाचा सर्वत्र सुकाळच होता.विशेषत: मावळ भाग तर अज्ञानाच्या अंधकारात बुडला होता. गावचा पाटीलही आंगठेबहाद्दरच असायचा. सगळा डोंगराळ भाग. प्रवासाच्या सोयीच नसायच्या. मैल न् मैल पायी डोंगर तुडवत जावं लागायचं. अशावेळी शंकरराव झुंझाररावांची मला ओळख झाली. फार चांगला मनुष्य. त्यांनी मला मागासलेल्या भागात शिक्षण–प्रसार करण्याविषयी आग्रह केला. यावेळी 'सक्तीचे शिक्षण करा' असे लोकल बोर्डाचे सारखे ठराव ही यायचे. त्यामुळे शिक्षण प्रसाराकडे माझे मन वळू लागले.' 'अशा सक्तीच्या शिक्षणासाठी सरकारने काय केले?' मी प्रश्न विचारला. ते म्हणाले, 'सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची गावोगावी सोय करावी, असे बोर्डाचे सारखे ठराव यायचे. पण सरकार म्हणायचे पैसा नाही त्यावेळी बाळासाहेब खेर शिक्षणमंत्री होते. त्यांनी शिक्षणास चालना दिली. त्यातून सन १९३६–३७ च्या दरम्यान व्हॉलंटरी शाळांचा जन्म झाला. 'त्यावेळी या शाळा कशा काय चालत होत्या ?' मी जिज्ञासेने विचारले त्यावर ते बोलले 'अशा शाळांसाठी सरकारने थोडी थोडी आर्थिक मदत देऊ केली. त्यावेळी वर्षाअखेर शिक्षकास १०० रुपये मिळायचे. अशा शाळा अनेक व्यक्ती चालवायच्या. पुढे व्यक्तींचे गट झाले व गटांच्या संस्था झाल्या. प्रथम आम्ही मावळ भागात व्हॉलंटरी शाळा सुरू केली. लोहगड किल्ल्यावर आम्ही शाळा उघडली. अशा शाळेसाठी गाव देईल ती जागा घ्यायची. धनिकाकडून मिळतील ते पैसे घ्यायचे. हळूहळू लोकांनाही अशा शाळांचे महत्त्व पटले. जो शिकविणारा असेल तो शिक्षक व्हायचा. इयत्ता ४ थी ५ वी शिकलेलाही शिक्षक व्हायचा. थोडी थोडी शिक्षणाबद्दल गोडी वाढू लागली. मग महाराष्ट्रभर अशा शाळांचे लोण पसरले. पश्चिम महाराष्ट्रातही अनेक शाळा निघाल्या. या सगळ्या शाळा खेड्यापाड्यात निघाल्या. धुळे भागात डॉ. घोगरे, जळगाव भागात के. व्ही. पाटील व नासिक भागात भाऊसाहेब हिरे यानी फार चांगले काम केले. नगरमध्ये बाळासाहेब काळे व बापूसाहेब भापकर यानी तर फार कष्ट केले. ही सर्व मंडळी शेतकरी वर्गास शिक्षण द्यावे याच इच्छेने भारावलेली होती. त्यामुळे हजारो व्हॉलंटरी शाळा निर्माण झाल्या. शेवटी सरकारनेच १९५२–५३ ला या सर्व व्हॉलंटरी शाळा ताब्यात घेण्याचे धोरण जाहीर केले. त्याप्रमाणे अनेक व्हॉलंटरी शाळा स्कूल बोर्डाकडे सुपूर्द केल्या. याप्रमाणे स्वातंत्र्यपूर्व काळात चाललेल्या प्राथमिक शिक्षण प्रसाराची ही गोष्ट अशी आहे.'

'आपण स्वत: शिक्षक म्हणून किती वर्षे काम केले ?' मी विचारले. गुरुवर्य

घोलप म्हणाले– ' १९२४ साली मी बी. ए. झालो नंतर १९२४ ते २७ च्या दरम्यान एल. एल. बी. झालो . सन १९१८ साली कोल्हापूरच्या राजर्षी शाहूंच्या प्रेरणेने पुण्यात श्री शिवाजी मराठा सोसायटीची स्थापना झाली. या वेळी भोरचे राजे पंतसचिव यांच्या वाड्यात गुरुवर्य बाबूराव जगतापानी खाजगी शाळा सुरू केली होती. तिचेच पुढे शिवाजी मराठा हायस्कूलमध्ये रूपांतर झाले. या हायस्कूलमध्ये मी १९२४ ते १९२७ पर्यंत शिक्षक होतो. त्यामुळे शाळेच्या कामकाजाचा जवळून अभ्यास करावयास मिळाला. त्यात गुरुवर्य बाबूराव जगतापांचेही मार्गदर्शन लाभले. '

' हो, तेही खरेच आहे. पुणे जिल्ह्यातल्या शिक्षण प्रसारात मला चार बाबूराव आघाडीवर असलेले दिसतात. पहिले बाबूराव जेधे, दुसरे गुरुवर्य बाबूराव जगताप, तिसरे बाबूराव सणस आणि चौथे आपण (बाबूराव रामचंद्र घोलप)'मी चार बाबूरावांचा उल्लेख करताच घोलपसाहेब मध्येच म्हणाले की, ' बाबूराव जगताप यांना आम्ही गुरुवर्य मानत असू. आम्ही त्यांचे बरोबर काम केले आहे. बाबूराव जेधे हा फार चांगला मनुष्य. गोड स्वभावाचा.शिक्षणाबद्दल फार कळकळ.सरकारशी संधान साधून त्यानी अरण्येश्वरला सोसायटीस खुली जागा मिळवून दिली. त्यावेळी ' जेधे–मॅन्शन ' हे शिक्षणाचे व राजकारणाचे केंद्रच होते. कोल्हापूरचे शाहू महाराज आले की थेट बाबूराव जेध्यांकडे जायचे. शाहू महाराजांच्या प्रेरणेतून ते काम करत होते. त्यासाठी खर्चही करायचे. गुरुवर्य बाबूराव जगताप हे बाबूराव जेध्यांच्या पेढीवरूनच पैसे घेऊन जायचे. बाबूराव सणस, शंकरराव मोरे, गणपतराव शेडगे, शं. द उर्फ अण्णासाहेब उरसळ ही माणसेसुद्धा शिक्षण प्रसाराच्या कामात रस घेत असत. त्यांनी कर्मवीर भाऊरावांच्या शिक्षणप्रसाराच्या कामाला गती दिली.


श्री. शंकरराव मोरे यांच्यानंतर मी स्वतः बरीच वर्षे पुण्याच्या श्री शिवाजी मराठा सोसायटीचे ऑनररी सेक्रेटरी म्हणून काम केले. माझ्या ज्येष्ठ चिरंजिवांच्या अकाली निधनामुळे हे पद मी सोडले. माझ्यानंतर श्री. विठ्ठलराव सातव हे ऑनररी सेक्रेटरी म्हणून काम पाहू लागले ते नेहमी अभ्यास करून बोलत असत. आजही ते हे काम सांभाळत आहेत.


श्री शिवाजी मराठा सोसायटीमध्ये काही माणसे फार चांगली येऊन गेली. शिवाजी मराठा सोसायटीव्यतिरिक्त माझा अखिल भारतीय शिक्षण परिषद, डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन, शिवाजी मिलिटरी स्कूल, धुळे, पुणे विद्यापीठ इत्यादी अनेक शिक्षण संस्थांशीही बराच जवळचा संबंध आला.'मग आपण पुणे जिल्हा शिक्षण मंडळाकडे कसे वळला?'मी औत्सुक्याने विचारले. 'खेडेगावातल्या मुलांना खेडेगावतच चांगले शिक्षण मिळाले पाहिजे, असे मला नेहमी वाटायचे. त्यासाठीच आम्ही व्हॉलंटरी शाळांचा यशस्वी प्रयोग केला. पुढे या शाळा स्कूल बोर्डाकडे गेल्यानंतर सात सप्टेंबर १९४१ रोजी पुणे

जिल्हा शिक्षण मंडळाची स्थापना करून माध्यमिक शिक्षण प्रसाराचे काम करावे असा विचार त्यावेळचे लोकल बोर्डाचे अध्यक्ष अण्णासाहेब आवटे यांना मी बोलून दाखविला. त्यांना माझी कल्पना पसंत पडली. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या स्थापनेपासून मी या संस्थेचा ऑनररी सेक्रेटरी आहे. धुळे जिल्हा लोकल बोर्डाचा चीफ ऑफिसर असतानाच एक सामाजिक कार्य म्हणून मी या मंडळाचे काम पाहू लागलो.' घोलपसाहेब बोलत होते. 'तुम्ही संस्था काढली. ती इतकी वाढली. या कामी आपणास कोणी-कोणी मदत केली ?' संस्थेची प्रगती समजावी म्हणून मी विचारले. लगेच घोलपसाहेब म्हणाले 'खेडयात इंग्रजी शाळा काढावी ही कल्पना मामासाहेब मोहोळ यांनी प्रथम मांडली. त्याप्रमाणे १९५६ साली नसरापूरला पहिली इंग्रजी शाळा काढली. ही शाळा रामाच्या देवळात भरायची. ३०-३५ मुलांवरून ही शाळा वाढत वाढत आज १३०० मुले तेथे शिकत आहेत. ज्यु. कॉलेजची इमारतही लवकरच होतेय, यासाठी भोर तालुक्यातील लोकांनी खूप मदत केली. लोकांच्या मदतीवरच एवढी प्रगती करता आली.तशी ही संस्था शून्यातूनच जन्माला आली.पण आज दीड कोट रुपयांचे बजेट आहे. १९६५ पासून मामासाहेब मोहोळ या मंडळाचे अध्यक्ष झाले. तेव्हापासून माझ्या कामाला चांगली साथ मिळाली कारण मामाना बहुजन समाजातील मुलांना शिक्षण मिळावे याची फार तळमळ.त्यामुळे शाळा कॉलेजसाठी देणग्या देणारे अनेक लोक भेटले. ओतूरचे तांबे, हडपसरचे अण्णासाहेब मगर, दत्तोबाशेठ लांडगे, अण्णासाहेब वाघिरे, राजाभाऊ शिंदे यांनी मोठी मदत केली. संस्थेचे काम चांगले चालत असल्यामुळे लोकांकडून पैसा जमा होत असे, पण कॉलेज काढताना पैसा कमी पडायचा. मग मामासाहेबांनी कर्ज काढावयाचे व ते मी फेडायचे अशी पद्धतच पडून गेली. आज या संस्थेच्या ४६ माध्यमिक शाळा असून तीन महाविद्यालये आहेत.' संस्थेच्या विस्ताराची व कामाच्या दर्जाची कल्पना आल्यानंतर मी आज काम करणाऱ्या शिक्षकाविषयी आपणास काय वाटते, असे विचारले. ते म्हणाले 'पूर्वी गुरुशिष्य संबंध फार चांगले होते. स्कॉलरशिप परीक्षेला बसायचे. खूप अभ्यास करायचा. गुरुला भजायचे. पण अलीकडे सर्वच शिक्षकांचे शिक्षणाकडे थोडे कमी लक्ष आहे. पूर्वी लाईफ मेंबरशिप असायची. शिक्षक उत्तम काम करायचे.आता अशी माणसे कमी होऊ लागलीत. आपण समाजासाठी काम करतो आहोत हा विचार आजच्या राजकारणामुळे निघून जात आहे. म्हणून 'तुम्ही समाजाचे शिक्षक आहात' हे मी आवर्जून सांगत असतो. आमच्या संस्थेत शिक्षक चांगले काम करतात. चांगल्या कामाबद्दल संस्थेच्या चार शाळांना उत्तेजनार्थ अनुदान मिळाले आहे चऱ्होली येथील हायस्कूलला कै. बन्सीलाल अगरवाल ट्रस्टकडून विद्यमान शिक्षण संचालक मा. वि.वि.चिपळूणकर यांच्या प्रयत्नाने नुकतीच पाच लाख रुपये देणगी मिळाली आहे.म्हणून सर्व शिक्षकांनी बांधिलकीने काम केले तरच समाजाची प्रगती होईल' शिक्षकांच्या समाजातील स्थानाचे मार्मिक उत्तर मिळताच, 'आपल्या नंतर आपल्या संस्थेचे पुढे

काय? ' हा प्रश्न सहज माझ्या तोंडून बाहेर पडला. लगेच घोलपसाहेब म्हणाले, ' मी गेली ४१ वर्षे काम करतोय, मी दिवा लावलाय. त्याला सांभाळणारे हात हजार आहेत. आज जे शिक्षक शाळा चालवितात त्यांचीच ही संस्था आहे. तशा तऱ्हेचा योग्य तो बदल संस्थेच्या घटनेत करण्याचे काम चालू आहे. त्यामुळे माझ्या नंतरही संस्थेचे काम जोमाने चालेल. मामासाहेब मोहीळ हे या संस्थेचे मोठे घटक आहेत. त्यांचे मार्गदर्शन सर्वांना लाभले ' असे सांगत असतानाच त्यांचे डोळे पाणावले व आवाज गंभीर झाला. एवढ्यात चहाचे कप समोर ठेवले गेले. श्री. मुकुंद खराडे व श्री. प्रतापराव घोलप यांचेशी बोलत बोलत मी चहा पिऊन कप खाली ठेवला. ' बरं, चलतो मी- नमस्कार !! ' असे म्हणून मी बाहेर पडलो.

□




REFBK-0023923